## प्रकरण पहिले

# प्रस्तावना व संशोधन पध्दती

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना व संशोधन पध्दती

## प्रस्तावना

भारतीय रिपब्लिकन पक्षाने दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली केलेला भूमिहीनांचा सत्याग्रह हा भारतीय इतिहासातील एक महत्वपूर्ण लढा होय. या देशातील आंबेडकरी चळवळ, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्वांसाठी सातत्याने संघर्ष करीत होती. आंबेडकरी चळवळीला या देशात ज्याप्रमाणे सामाजिक समता अभिप्रेत होती, त्याचप्रमाणे आर्थिक समतासुध्दा अभिप्रेत होती. 'जमीन' त्यामध्ये विशेषत: शेतजमीन हा एक संवेदनाक्षम विषय केवळ जमिनीसाठीच नाही, तर जमिनीच्या मालकीसाठी खून आणि मारामाऱ्या होतात. भारतीय माणसाची मानसिकता लक्षात घेता स्वत:ची जमीन असणे ही फार महत्वाची व प्रतिष्ठेची गोष्ट आहे. जमिनीच्या मालकीशी प्रतिष्ठेची संकल्पना जोडली गेली आहे. समाज परिवर्तनासाठी देखील अस्पृश्य, भूमिहीन, श्रम करणाऱ्या व्यक्तीला जमीन मिळणे म्हणजे एका अर्थाने त्याला प्रतिष्ठा प्राप्त करुन देणे होय. जमिनीचा मालकी हक्क हा जसा उपजीविकेच्या साधनांसाठी आवश्यक आहे तसाच तो समाजात प्रतिष्ठेने जगण्यासाठी आवश्यक आहे. दादासाहेब गायकवाड यांनी केलेल्या भूमिहीनांच्या सत्याग्रहातून या भूमिहीनांना उपजिविकेचे साधन मिळवून देण्याबरोबरच त्याला आतापर्यंत नसलेली प्रतिष्ठा मिळवून देणे हा एक महत्वाचा भाग त्यात होता.

स्वातंत्र्योत्तर काळात जी काही आंदोलने या देशात झाली त्यापैकी सर्वांत मोठे व दीर्घकाळ चाललेले, रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून व दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली जनआंदोलन म्हणून भूमिहीनांच्या सत्याग्रहाचा आपणाला विचार करावा लागेल. या देशातील स्वातंत्र्योत्तर काळातील सर्व आंदोलनाचा विचार केला तर दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्षाने केलेले भूमिहीन सत्याग्रहाचे आंदोलन येथील समाजव्यवस्थेला एक नवा आयाम देणारे आंदोलन होते. जमिनीच्या प्रश्नांवर संघर्षात्मक कार्यक्रम हाती घेऊन घोषणा करतात की, ''कसेल त्याची जमीन, नसेल त्याचे काय?'' असा प्रश्न उपस्थित करुन सर्व दलित, आदिवासी, कष्टकरी भूमिहीन मग तो कोणत्याही जाती धर्माचा असो त्यांना भूमिहीनांच्या लढ्याच्या मैदानात उतरवितात म्हणून जमिनीच्या मालकीच्या संदर्भात आंबेडकरी चळवळीचा विशेषत: दादासाहेब गायकवाड यांनी केलेल्या भूमिहीनांच्या सत्याग्रहातील कार्याचा शोध घेण्यात आला आहे.

## समस्या विधान

या देशात प्राचीन काळापासून आर्थिक विषमता दिसून येते. या देशात भूमिहीनांचा सत्याग्रह करण्याची आवश्यकता का निर्माण झाली? याचा विचार केला तर उत्पादनाचे साधन असणारी जमीन ही उच्चजातीय लोकांची मक्तेदारी होती. या देशातील उत्पादन व्यवस्था जातिव्यवस्थेवर आधारित असल्यामुळे जमीन मालकीचा अधिकार उच्च जातीय लोकांकडे होता.

दलित, आदिवासी, भटके विमुक्त, स्त्रियां यांना जमिनीच्या मालकीचा हक्कच नाकारण्यात आला होता. त्यासाठी धर्मशास्त्रानेही मोठी मदत केली. उत्पादक श्रम करणारे जाती वर्ग उत्पन्नाच्या साधनावर आपली मालकी मिळवू शकणार नाहीत. अशी जन्माधिष्ठित उत्पादन पध्दती निर्माण केली गेली. कष्टाची कामे हीन मानली गेली. त्यामुळे देशातील सर्व उत्पादन व्यवहार, उत्पादनसंबंध जन्माधिष्ठित विषमतेवर व कनिष्ठ जात वर्गीयांच्या शोषणावर उभे राहिले होते. आजपर्यंत जमीन मालकी कोणत्या जातवर्गाकडे किती प्रमाणात राहिली हे तपासले तर या देशाच्या अगदी प्राचीन इतिहासापासून ते एकोणिसाव्या शतकापर्यंत जमिनीच्या मालकीपासून दलित, आदिवासी, भूदास व गुलाम इत्यादींना वंचित केल्याचा व राबवून घेतल्याचा वस्तुनिष्ठ इतिहास आपल्यासमोर उभा राहतो.

## पूर्व अभ्यास अवलोकन

''दादासाहेब गायकवाड आणि भूमिहीनांचा सत्याग्रह'' या लघुसंशोधन प्रकल्प विषयाच्या अनुषंगाने विचार केला तर, दादासाहेब गायकवाड यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणारे, पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड - भावना भार्गवे, दादासाहेब गायकवाड जीवन व कार्य - ॲड. हरिभाऊ पगारे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड : काल आणि कर्तृत्व (संपादित - रावसाहेब कसबे व इतर), कर्मवीर दादासाहेब गायकवाड अभिवादन ग्रंथ (संपादित - दिलीप जाधव), कर्मवीर दादासाहेब गायकवाड - लोकराज्य विशेषांक (संपादित - महाराष्ट्र शासन) या वरील काही लेखकांच्या चरित्रात्मक व संपादित ग्रंथातून दादासाहेब गायकवाड यांच्या जीवन कार्याचा व दलितमुक्ती चळवळीतील योगदानावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. परंतु त्यांनी भूमिहीन लोकांच्यासाठी देशपातळीवर जो सत्याग्रह केला याचा अभ्यास वरील ग्रंथ साहित्यातून व संशोधनाच्या माध्यमातून ही झालेला दिसून येत नाही.

दादासाहेब गायकवाड यांच्याविषयी श्री अविनाश फुलझेले या संशोधकांनी त्यांच्या जीवन व कार्यावर संशोधन केलेले आहे. हे सर्व संशोधन दादासाहेब गायकवाड यांचे दलित चळवळीतील योगदान या अंगाने झाले आहे. त्यांच्या राजकीय कार्यावर प्रा.डॉ. रणदिवे यांनीही संशोधनाच्या माध्यमातून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच प्रा.डॉ.व्ही.बी. वाघमारे यांनी दलितमुक्तीच्या चळवळीसाठी दादासाहेबांनी केलेल्या सत्याग्रहाचा ऐतिहासिक पध्दतीने अभ्यास केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सोबत व नंतरच्या कालखंडात त्यांनी आंबेडकरी चळवळ कशा पध्दतीने राजकारण व समाजकारण करुन पुढे नेली याचाही अभ्यास करण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु या भूमिहीनांच्या प्रश्नांच्या संदर्भात दादासाहेब गायकवाड यांनी जो मुलगामी विचार करुन सत्याग्रह केला त्या प्रश्नाच्या संदर्भात गांभिर्याने संशोधन झालेले दिसून येत नाही.

दादासाहेब गायकवाड यांनी या भूमिहीन लोकांच्यासाठी केलेला सत्याग्रह हा भारतातील जातीय अर्थव्यवस्थेला एक प्रकारे प्रश्नांकित करुन या प्रश्नांचे गांभिर्य समाजातील सर्वहारा

लोकांच्यापर्यंत पोहचविले. आदिवासींच्या वनजमिनीच्या प्रश्नाच्या संदर्भात ही दादासाहेब गायकवाड यांची भूमिका व त्यांनी दिलेला लढा त्याचा ही संशोधात्मक दृष्टिने अभ्यास होणे गरजेचे आहे. कारण आज वनजमिनीवर होणारे अतिक्रमण हे आदिवासी लोकांच्या जीवन जगण्यावर प्रश्न निर्माण करताना दिसत आहे.

दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या भूमिहीनांच्या सत्याग्रहातून फक्त जमीन मिळविणे एवढ्या पुरताच मर्यादित अर्थ नसून या देशातील जातीवर आधारित असलेल्या आर्थिक विषमतेच्या अंगाने ही याचा अभ्यास होणे गरजेचे वाटते. या देशातील सर्वसामान्य माणसाच्या जीवन जगण्याचा स्त्रोत हा मुख्यत: शेती होय. आपल्या देशात श्रेणीबधद् समाजरचना असल्यामुळे हा स्त्रोत कांही मूठभर उच्चवर्गीय व भांडवलदार वर्गाकडे असलेला दिसून येतो. आजच्या संदर्भात ही या प्रश्नांचे औचित्य मोठे आहे. त्यामुळे या भूमिहीन सत्याग्रहाच्या संदर्भात दादासाहेब गायकवाड यांनी जो मुलगामी विचार करुन कृती केली त्याचे संशोधन होणे हे आजच्या भूमिहीन, कष्टकरी, दलित, कामगार, आदिवासी इ. यांच्या जगण्याचे प्रश्न सोडविण्यासाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरतील.

## संशोधनाची उद्दिष्टे

या लघुसंशोधन प्रकल्प विषयाच्या संशोधन पूर्तीसाठी पुढील उद्दिष्टये निश्चित करण्यात आली आहेत.

१. भूमिहीनांच्या सत्याग्रहातील दादासाहेब गायकवाड यांच्या व्यापक लढाऊ संघर्षाचा अभ्यास करणे.
२. भूमिहीनांच्या सत्याग्रहातील नैतिक अधिष्ठान व व्यापक लोकचळवळीची जाणीव करुन देणे.
३. दादासाहेब गायकवाड यांची सत्याग्रहाच्या संदर्भातील कार्यपध्दतीचा अभ्यास करणे.
४. दलित, शेतमजूर, पीडित, आदिवासी इ. यांच्यासाठी दादासाहेब गायकवाड यांनी केलेल्या कार्याची उपेक्षा थांबविणे.

## संशोधन पध्दती

या लघुसंशोधन प्रकल्पासाठी खालील संशोधन पध्दतीचा गरजेनुसार वापर करण्यात आला.

१. ऐतिहासिक संशोधन पध्दती
२. विश्लेषणात्मक संशोधन पध्दती
३. मूल्यमापनात्मक संशोधन पध्दती

**प्रकरण कार्य योजना**

प्रस्तुत लघु संशोधन प्रकल्पाच्या अभ्यासाची मांडणी करण्यासाठी पुढीलप्रमाणे प्रकरण योजना केली आहे.

१. प्रकरण पहिले - प्रस्तावना व संशोधन पध्दती

२. प्रकरण दुसरे - कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची जडणघडण

३. प्रकरण तिसरे - भूमिहीनांच्या सत्याग्रहातील कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे योगदान

४. प्रकरण चौथे - दादासाहेब गायकवाड यांच्या कार्याचे विविध पैलू

५. प्रकरण पाचवे - निष्कर्ष

## प्रकरण दुसरे

# कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची जडण-घडण

### प्रकरण दुसरे

## कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची जडण-घडण

### प्रास्ताविक

या देशाच्या २० व्या शतकातील पूर्वार्धाच्या इतिहासाकडे पाहिले तर एकीकडे स्वातंत्र्य चळवळीचा लढा चालू होता. तर दुसरीकडे या देशातील अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांचा आपल्या जीवन जगण्याच्या अस्तित्वाचा संघर्ष चालू होता. स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये देशातील सर्व समाज घटकातील लोकांनी भाग घ्यावा असा आग्रह काही स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांनी केला. परंतु या मिळणाऱ्या स्वातंत्र्यात 'आमचे स्थान कोणते राहिल?' या प्रश्नाचे उत्तर ते देऊ शकत नव्हते. कारण अस्पृश्य लोकांना सामाजिक समतेच्या न्याय हक्काचा लढा महत्त्वाचा वाटत होता. याचा अर्थ ते स्वातंत्र्य चळवळीच्या विरोधात होते असा नसून ही अस्पृश्यांची सामाजिक समतेच्या न्याय हक्काची चळवळसुध्दा महत्त्वाची होती. कारण या दलित मुक्तीच्या चळवळीने काही प्रश्न स्वातंत्र्य चळवळीच्या नेत्यांच्या समोर उभे केले होते. त्याचे उत्तर कोणालाही देता आले नाही. म्हणून ही सामाजिक समतेच्या न्याय हक्काची चळवळ जोमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली सुरु झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली या देशात मानव मुक्तीसाठी संघर्ष सुरु झाला. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्या काही सहकाऱ्यांमध्ये ज्यांनी निष्ठापूर्वक व कृतिशीलपणे आपल्या जीवाची पर्वा न करता साथ दिली. त्यामध्ये कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचा सर्वात वरचा क्रमांक लागतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली व त्यांच्यानंतर बाबासाहेबांच्या चळवळीचा वारसदार म्हणनूही त्यांनी स्वतंत्रपणे कार्य केले.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची जडणघडण कोणत्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक वातावरणात झालेली आहे. याचा आपणाला शोध घ्यावा लागेल कारण त्या सर्व घटकांचा दादासाहेबांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीत प्रभाव कसा पडला व त्यातून दादासाहेबांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी होत गेली हे लक्षात येईल. म्हणून ज्या-ज्या घटकांचा दादासाहेबांच्या व्यक्तिमत्वावर प्रभाव पडला त्यातून त्यांची जडणघडण झाली व त्यांनी आपले सर्व आयुष्य पुढील दलितमुक्तीच्या व मानवमुक्तीच्या लढ्यासाठी अर्पण केले.

कोणत्याही व्यक्तीच्या कर्तृत्व किंवा नेतृत्त्वाचा सखोल अभ्यास करताना त्या कर्तृत्वाला प्रभावित करणाऱ्या वातावरणाचा अभ्यास करणे महत्त्वाचे असते, असे मत मनोवैज्ञानिकांचे आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अभ्यासाच्या दोन पध्दती आहेत.

१. वंशपरंपरा, २. वातावरण.

मानवविज्ञान मनोअभ्यासक यांच्या निष्कर्षानुसार वंशपरंपरेपासून मानवाला शरीररचना, बुध्दि, मन, प्रतिभा, रंग, आदि गोष्टी परंपरेनुसार मिळू शकतात. वातावरणाने घर, परिवार, जात, मित्र, थोड्या प्रमाणात जसे वातावरण आहे त्यानुसार बाहेरील रंग मिळतो. या दोन सुत्राच्या योगाने माणूस बनतो. बऱ्याच ठिकाणी असे पाहण्यात आले आहे की, प्रतिभा आणि बुध्दी सामान्य असून सुध्दा विशिष्ट जातीमुळे माणूस मोठा मानला जातो. परंतु वर्ण आणि वर्ग व्यवस्थेच्या चक्रव्यूहामध्ये अत्यंत प्रतिभासंपन्न असलेला माणूस समाजाच्या कक्षेच्या बाहेर फेकला जातो. सवर्णाच्या जीवनामध्ये संघर्ष नाममात्र असतो. बऱ्याच वेळेस सांगितले जाते की, सवर्णामध्येसुध्दा गरीबी व दारिद्र्यता आहे त्यांना पण संघर्ष करावा लागतो. परंतु उच्चवर्णीयांच्या संघर्षामध्ये व दलितांच्या संघर्षात फार मोठा फरक आहे. परंपरेने नाकारलेल्या समाजाला त्याचे अस्तित्व व संरक्षण यासाठी पहिल्यांदा संघर्ष करावा लागतो. यानंतर तो आपली अस्मिता व अधिकारासाठी लढत असतो.

अन्य व्यक्तीचा जीवनपट व दादासाहेब गायकवाडांचा जीवनपट यामध्ये खूप मोठे अंतर आहे. त्याचे कारण असे की, लहानपणापासूनच दादासाहेबांच्या जीवनाचा संघर्ष हा बहुआयामी राहिलेला आहे. प्रश्न व्यक्तीच्या जातीचा नाही तर जातीमुळे व्यक्तीला ज्या यातनेतून आणि संघर्षातून जावे लागते त्या व्यवस्थेचा आहे. ज्या व्यवस्थेमुळे प्रारंभिक काळामध्ये दादासाहेबांना यातना भोगाव्या लागल्या त्यांच्याच काळातील गरीब असणाऱ्या कोणत्याही उच्चवर्णीयांना निश्चितच भोगाव्या लागल्या नसतील. याचे कारण म्हणजे या देशात फार पूर्वीपासून समाजामध्ये माणसाला माणसापासून दूर करणारा जाती नावाचा एक कलंक अत्यंत तीव्रतेने काम करत होता व आहे.

माणूस हा एखाद्या निर्जीव यंत्रासारखा नाही तर तो एक सजीव प्राणी आहे. परंतु तो केवळ इतर सजीव प्राण्यांसारखा नसून त्याच्याकडे सर्जनक्षमताही आहे. अस्तित्वाने वातावरणातील बदल व्हायचा तेवढाच होतो. परंतु माणसाचे तसे नसून तो आपल्या उद्दिष्ट, ध्येयपूर्तीसाठी बाह्य परिस्थितीत बदल घडवून आणतात व त्यावर वर्चस्व निर्माण करतात. या अशा फरकाचा विचार

केल्यास त्याचे मूळ मानवाच्या श्रमशक्तीत असल्याचे दिसून येते. म्हणून थोर पुरुष आपल्या कर्तृत्वाने कालखंडावर स्वत:च्या पाऊलखुणा निर्माण करत असतात. या महापुरुषांच्या विषयी हेगेल सारख्या विचारवंतांनी मौलिक विचार मांडलेले आहेत, हेगेलच्या मते महापुरुष अशाच व्यक्तीला म्हणता येईल, ''जी आपल्या युगाची इच्छा शब्दबध्द करते, आपल्या युगाची इच्छा काय आहे हे सांगत असते आणि तिची परिपूर्ती करीत असते.''[१] म्हणून या महापुरुषांचा मोठेपणा मान्य करुन प्रसिध्द इतिहासकार इ.एच. कार म्हणतात त्याप्रमाणे, ''महापुरुषात ही एक अद्वितीय व्यक्तीच असते की जी एकाच वेळी ऐतिहासिक प्रक्रियेचे आपत्य आणि प्रतिनिधी जशी असते, तशीच जगाचे रूप आणि मानवी विचार यांना बदलणाऱ्या सामाजिक शक्तीची निर्मिती आणि प्रतिनिधीही असते.''[२] म्हणूनच थोर पुरुषांचा विचार करीत असताना त्या कालखंडाचाही विचार करावा लागतो त्याशिवाय त्या पुरुषाची जडणघडण, त्याचे कर्तृत्व व काळाने घातलेल्या मर्यादा आणि या महापुरुषाने आपले सर्वस्व पणाला लावून जनशक्तीच्या सहाय्याने त्यावर केलेली मात यातून इतिहासाची जडणघडण होत असते. म्हणून दादासाहेब गायकवाड यांच्या विचारांची आचारांची, मनाची, शरीराची जडणघडण कशी होत गेली ते पाहिल्याशिवाय त्यांच्या मानवमुक्तीच्या कार्याचा शोध घेणे शक्य होत नाही. म्हणून या प्रकरणात त्यांच्या जडणघडणीचा अभ्यास केला आहे.

महाराष्ट्रातील त्या काळचे समाज जीवन अत्यंत निकृष्ट पातळीचे होते. अंधश्रध्दा, धार्मिक कर्मकांडे, जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रियांची अवहेलना, निरक्षरता, अज्ञान, दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, व्यसनाधीनता, रोगराई इ. या साऱ्या विकृतींनी समाज जीवन काळवंडून गेले होते. ब्राह्मण वर्चस्वाचा कहर झाला होता. दलितांना, स्त्रियांना जिणे नको झाले होते. बालविवाह हाच नियम होता. विधवांना मानाने जगणे मुश्किल होते. साऱ्या गावच्या घाणीला तोंड लावून आलेल्या कुत्र्याला जवळ घेतले जाई, पण महार-चांभाराची सावलीसुध्दा चालत नसे. अशी ही एकंदरीत तत्कालीन महाराष्ट्राची स्थिती होती.

### २.१ जन्म व बालपण

महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्याची भूमी ही जशी सनातनी परंपरेची जननी आहे तशीच ती परिवर्तनशील संस्कृतीची उद्गातीही आहे. या मातीने मानवी रूपाचे असे अनेक मौल्यवान अंकुर आपल्या कुशीतून जन्माला घातले जे पुढे भविष्यात त्यांच्या वाटचालीत अनेक वादळवाऱ्यांत

आपल्या अस्मितेचा डोलारा लिलया जोपासून त्यांचे वटवृक्षात रूपांतर करते झाले. अशा या नाशिक जिल्ह्यात कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचा जन्म १५ ऑक्टोबर, १९०२ रोजी नाशिकपासून १२ मैल अंतरावर असणाऱ्या 'दिंडोरी' तालुक्यातील 'आंबे-दिंडोरी' या गावी झाला. अवतीभोतवी आंब्याच्या झाडांची दाटी असल्यामुळे त्या गावाचे नाव 'आंबे' झाले असावे. त्यांचे वडील कृष्णराव तथा किसनभाऊ महितपराव गायकवाड. तर आई, पवळाबाई होय. किसनभाऊ व पवळाबाई या दोघांना रंभाबाई, येसूबाई, ठकूबाई आणि साळूबाई अशा चार मुली होत्या. त्यांना मुलगा नव्हता. त्यामुळे किसनभाऊ व पवळाबाई यांना आपल्याला मुलगा व्हावा असे मनोमन वाटत होते. म्हणून त्यांनी देवाला नवस केले त्यांना कोणी तरी सांगितले होते की, ''सप्तशृंगी ही गडावरची देवी स्वयंभू दैवत आहे. नवसाला पावणारे ते दैवत आहे. तू त्या देवाला नवस कर, मुलगा झाला तर लगेच दर्शनाला घेऊन येईन असं म्हण.'' पवळाबाईनी देवीला नवस केला पण थोडा वेगळ्या पध्दतीने, ''मुलगा पाच वर्षाचा झाला की मी त्याला तुझ्या दर्शनाला घेऊन येईन.''[३] अशा प्रकारचा श्रध्दापूर्वक नवस केला व त्यांना पाचवा भाऊरावाच्या रूपाने मुलगा झाला. पुढे तो नवस बोलल्याप्रमाणे पूर्णही केला गेला. पुढे त्यांचे नावही 'आंबेगावात' येणाऱ्या 'भाऊराव' या नावाच्या मराठा गृहस्थावरुन ठेवण्याचे किसनभाऊनी निश्चित करुन ठेवले गेले.

भाऊरावाचे वडील किसनभाऊ हे त्या काळी 'आंबे'गावातील एक सधन शेतकरी होते. जवळजवळ ७० ते ८० लोकांचे एकत्र कुटुंब चालवित असत. अस्पृश्य समाजात जन्मले असूनही त्यांनी स्वत:च्या कर्तृत्वाने शेती मिळवून एक सधन शेतकरी म्हणून त्यांनी आंबेगावात नावलौकिक मिळवला होता. आंबे या गावात गायकवाड कुटुंबाचा मोठा दबदबा होता. गावातील लोक त्यांना 'बड्या घरची माणसं'[४] अशा प्रकारे उल्लेख करीत असत. यावरून त्यांना व त्यांच्या कुटुंबाला मान दिला जात असे. ते सधन शेतकरी असल्यामुळे त्यांच्या शेतावर त्या काळी मराठे, कोळी, भिल्ल अशा जातीतील लोक मजूर म्हणून काम करीत असत, असे असले तरी अस्पृश्यता ही अत्यंत कटाक्षाने पाळली जात होती. उच्चवर्णीयांच्या विहिरीवर पाणी भरण्याची परवानगी नव्हती. यावरून त्या काळातील अस्पृश्यांवरील कठोर बंधने किती मजबूत होती हे लक्षात येईल. महाराष्ट्रातील नाशिक जिल्हा हा धार्मिक व वैचारिक चळवळीचा क्रांतिकारी जिल्हा म्हणून ओळखला जातो. भाऊरावांचा जन्म हा दलितातील परंतु आर्थिक संपन्न परिवारात झाला असला

तरी समाजामध्ये ओळख ठेवण्यासाठी फक्त आर्थिक सुबत्ताच कामाला येत नाही. त्यासाठी जात पाहिली जाते. दादासाहेबांच्या घरी संपन्नता असताना देखील फक्त जातीमुळे त्यांच्या लहानपणापासून त्यांना वेगळे अनुभव मिळाले.

## २.२ कुटुंबातील धार्मिक व अध्यात्मिक वातावरणाचा प्रभाव

दादासाहेबांचे वडील दलित असूनही त्यांना गावात मोठा मान होता. ते धार्मिक वृत्तीचे व देवभोळे होते. देवावर त्यांची श्रध्दा व भक्ती होती. दरवर्षी ते आपल्या कुटुंबासह नासिक, त्र्यंबकेश्वर, वणी येथे यात्रेला जात असत. त्यांच्या यात्रा कधी चुकल्या जात नसत. अशा या धार्मिक व अध्यात्मिक वातावरणाचा परिणाम दादासाहेबांवर लहान वयात होणे साहजिचक होते. त्या काळात रामायण, पांडवप्रताप, ज्ञानेश्वरी, शिवलिलामृत इ. धार्मिक ग्रंथांचे पारायण होत असे. श्रावण महिन्यातील सप्ताहाच्या वातावरणाचाही मोठा परिणाम होत असे. भाऊरावाचे वडिल हे व्यासंगी, सुशिल, धर्मशील आणि भजनप्रिय तसेच शिक्षणाविषयी तळमळ असणारे होते. या तळमळीचा चांगला परिणाम कुटुंबावर झालेला दिसतो. लहान मुलांनी देवासमोर बसून अभंग आणि भजने म्हणावी अशा प्रकारची किसनभाऊची शिस्त होती. या लहानपणातील वडिलांच्या शिकवणुकीच्या व संस्काराच्या आठवणी दादासाहेब गायकवाड यांना होताच ते मोठ्या सद्‌गदित अंत:करणाने म्हणत, ''त्यावेळी धर्म आणि धार्मिक शिक्षण मनुष्याच्या जीवनात अत्यंत आवश्यक आहे, हे आता मलासुध्दा पटत आहे.''[५] दादासाहेबांचे वडील हे आस्तिक होते, त्यांची श्रध्दा ही संस्काराचा विचार व प्रेरणा देणारी होती. तसेच ते स्वत:चा शेतीचा व्यवसाय हा अत्यंत निष्ठेने करीत असत. त्यामुळे गावात त्यांना मान होता. त्यांच्याजवळ निपक्षपातीपणाने कोणाची ही बाजू न घेता, न्याय, व निर्णय देण्याची कुवत होती. त्यामुळे ते रोज चावडीवर बसल्यावर त्यांच्याकडे अनेक तक्रारी येत असत. त्या तक्रारीचे निवारण ते विवेकबुध्दीने करत असत. परंतु त्यांना चावडीच्या पायरीवरच बसून न्यायनिवाडा करावा लागत होता.

दादासाहेबांना आपल्या वडिलांबद्दल नितांत आदर वाटत असे. ते सांगतात की, ''माझे वडील आंबेगावचे सर्वस्व होते.'' कृष्णराव नेहमीच निपक्षपातीपणे निर्णय देत, म्हणूनच आंबेडकर मंडळींच्या समस्या त्यांच्यासमोर पेश केल्या जात. गावातील ब्राह्मण, मराठे सारे म्हणत, ''हे आपल्याला नाही समजायचं, 'किसनभाऊला' विचार. किसनभाऊ योग्य निर्णय देतील.''[६] या सर्व धार्मिक व अध्यात्मिक वातावरणाचा परिणाम संवेदनशील अशा भाऊरावांच्या बालमनावर होत

होता व आपल्या वडीलांचेही दुर्मिळ गुण त्यांच्या अंगी बाणवत गेले व अस्पृश्यतेची जाणीव बालवयातच भाऊरावांना होत गेली. त्याचप्रमाणे वडिलांच्या अध्यात्मिक व लोकसेवेच्या कार्याचा मोठा प्रभाव बालवयातच दादासाहेबांवर पडलेला दिसून येतो.

## २.३ शिक्षण

भाऊरावांना वयाची पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांचे नाव प्राथमिक शाळेत टाकण्यात आले. त्याकाळाच्या रितीरिवाजाप्रमाणे 'भावड्या किसन महार'[७] अशा प्रकारची नोंद शाळेत करण्यात आली. भाऊराव हे बुध्दीने तरतरीत होते व बांध्याने बळकट होते. परंतु अस्पृश्यतेच्या चटक्याची जाणीव बालवयातच होत गेली. दुकानदार हे आईपुढे कपडे, साहित्य दुरुनच टाकत असत. शाळेत त्यांना दूर बसावे लागत होते. शिक्षकांनाही स्पर्श करता येत नव्हता. मुलांशी खेळता येत नव्हते. सर्व व्यवहार हे दुरुनच करावे लागत. त्यामुळे अशा हीनदीन जीवनाची वाढत्या वयानुसार जाणीव होऊ लागली. भाऊरावाने खूप शिकावे असे त्यांच्या वडिलांना नेहमी वाटत असे. ते नेहमी म्हणत, ''भाऊ, तू फार फार शिक, मोठी किर्ती मिळव आणि आपल्या कुळाचं नाव जगात गाजवं!''[८] यावरुन वडील शिक्षणाच्या बाबतीत किती जागृत होते हे लक्षात येते. आंबेगावातील शाळा ही चौथीपर्यंतच होती. त्याच दरम्यान भाऊरावाचे मराठी तिसरीतच असताना नासिक येथील रखमाजी दाणी यांची सहा ते सात वर्षे वयाच्या सीताबाई नावाच्या मुलीशी लग्न झाले.

जीवनाच्या सर्वच क्षेत्रापेक्षा शिक्षणक्षेत्र हे पवित्र मानले जाते. कारण शिक्षण हे भेदभाव विसरण्यासाठी प्रवृत्त करते. परंतु ज्या शाळेमध्ये दादासाहेब शिकत होते तिथे त्यांना फक्त विशिष्ट जातीमुळे वेगळे अनुभव नशिबी आले. वर्गामध्ये उच्चवर्णीय विद्यार्थ्यांपासून दूर बसावे लागत होते. ज्यांना गुरु मानावे अशा शिक्षकांकडून जातिभेदाची व छळवणुकीची आणि अपमानाची वागणूक मिळायची. दादासाहेबांच्या बालमनाला हे सर्व कशामुळे होते याची पूर्ण माहिती नव्हती. तरी इतर विद्यार्थ्यांपेक्षा आपल्याला दूर ठेवले जाते, वागणूक वेगळी दिली जाते हे सर्व त्यांना बालवयात समजून चुकले होते. कोवळ्या वयामध्ये समता व विषमता समजत नसते. परंतु विषमतेचे विष एवढे जहाल असते की, त्या बालवयातसुध्दा जातीमुळे मिळालेले वेगळेपण लक्षात येते. आंबे गावातील चौथीपर्यंतच्या त्यांच्या शालेय प्रवासामध्ये हे वेगळेपण त्यांना समजून चुकले होते. वडील हे धार्मिक आणि आध्यात्मिक वृत्तीचे असल्यामुळे आपल्या मुलाने शिकले पाहिले यासाठी

त्यांनी दादासाहेबांना नाशिकच्या राजेबहादूरच्या सरकारी शाळेत दाखल केले. नाशिकच्या शाळेत भाऊ आला तेव्हा त्याचे तालिम मास्तर पाठक सर एकदा त्याला म्हणाले, ''काय रे ए, ... तुझं नाव काय?'' भाऊने सरळ हजेरी बुकातले नाव सांगितले, ''भावड्या किसन महार.'' पाठक सर व वर्ग शिक्षकांनी त्याचे नाव बदलले व नोंद केली ती, ''भाऊराव कृष्णराव गायकवाड''[१] शहरातील वातावरण बऱ्याच अंशी वेगळे असल्याची जाणीव दादासाहेबांना वाटत होती. त्यांना सुरुवातीला असे वाटले की, कमीत कमी या ठिकाणी तरी गावापासून दूर असल्यामुळे व अनोळखी असल्यामुळे आणि जात माहित नसल्यामुळे वेगळेपण अनुभवाला मिळेल. परंतु पवित्र कार्य करणाऱ्या शिक्षकांनीच वर्गातील मुलांना जातीच्या आधारावर वेगळे केले. जे अनुभव त्यांना त्यांच्या स्वत:च्या गावातील शाळेत आले तेच अनुभव शहरामध्ये पण अनुभवास मिळाले. बालपणापासून गावाच्या बाहेर शाळेमध्ये दूर, दुकानामध्ये वस्तू घेताना दुकानदाराने वस्तू अंगावर फेकल्याचे शल्य हे सुरुवातीच्या काळात त्यांनी आपल्याजवळ साठवून ठेवले. वाढत्या वयाबरोबर आपल्याशी असा भेदभाव का याचे कारण आपण अस्पृश्य जातीत जन्माला आलो आहोत हे आहे असे कळून आले व त्या दृष्टीने ते गंभीर होऊन विचार करु लागले. पुढे बाबासाहेबांच्या सहवासानंतर या शल्याचा स्फोट होतो व हा नायक समाजउध्दारासाठी आयुष्य झोकून देतो.

समाजाच्या जीवनामध्ये उच्चवर्णीयांचे आघात-प्रघात हा खूप मोठा इतिहास आहे. आजवरचा इतिहास पाहिला तर असे दिसून येते की, एकीकडे समाजाचा विरोध तर दुसरीकडे निसर्गाचा कोप या समाजाच्या नशिबी दिसून येतो. दादासाहेबांची पारिवारिक स्थिती संपन्न असताना देखील त्यांच्या वडिलांची शिकण्याची इच्छा असताना देखील निसर्ग आडवा येतो. दरम्यान इ.स.१९१४ मध्ये पहिल्या महायुध्दाचा वणवा पेटलेला असतानाच नाशिकमध्ये प्लेगच्या महाभयंकर साथीला सुरुवात होते त्यामुळे शिक्षण अर्धवट सोडून गावी जावे लागते व पुन्हा ते नाशिक येथे शिकण्यासाठी येतात. त्यावेळेला ते इयत्ता ६ वी इंग्रजी या वर्गात असतानाच इ.स. १९१८ ला पुन्हा प्लेगची साथ येते. या प्लेगच्या साथीच्या रोगामुळे भाऊरावांना शिक्षण अर्ध्यावरच सोडावे लागते. शाळा सोडल्याचे शल्य त्यांना नेहमी बोचत राहिले. त्यावेळची ६ वी इंग्रजी म्हणजे आताची १० वी होय. या अल्प शालेय यात्रेतून दादासाहेबांना अंधारातला प्रकाश, चमत्कार समजला होता. त्यामुळे भयंकर महामारी, प्लेगच्या संकटापुढे न डगमगता ते आपल्या

गावी जाऊन स्वत:च्या शेतीमध्ये काम करु लागले. दादासाहेब शेतीतील सर्व कामामध्ये तरबेज झाले होते. हे सर्व करत असताना जातीचे विषारी अनुभव या ठिकाणीही त्यांना अनुभवास मिळाले.

इ.स. १९१७ च्या आसपासचा हा काळ महाराष्ट्रात जोरदारपणे सुरु असलेल्या सामाजिक प्रबोधनाचा काळ होता. तसेच अस्पृश्यांच्या चळवळीनेही जोर धरला होता. ''आम्हाला सामाजिक हक्क द्या व माणसाप्रमाणे वागवा आम्हांवरील धार्मिक, सामाजिक, आर्थिक जी गुलामगिरी लादलेली आहे ती, नष्ट करा. अशी चळवळ सुरु झाली. आम्हांला सक्तीचे मोफत शिक्षण द्या, स्कॉलरशिप द्या, वसतिगृहे बांधा, सरकारी नोकऱ्यात प्रवेश द्या, आणि राजकीय हक्क द्या.''[१०] अशा प्रकारची अस्पृश्यांची चळवळ पुढील काळात सुरु झाली. तसेच विठ्ठल रामजी शिंदे व चंदावरकर यांच्या अस्पृश्यांच्या कार्याचा प्रभाव पडलेला होता. तसेच प्रत्यक्ष अस्पृश्य पुढारी शिवराम जानबा कांबळे हे अस्पृश्यांच्या चळवळीत काम करीत होते. ''दलितामध्ये जागृती व्हावी म्हणून शिवराम जानबा कांबळे यांनी सोमवंशीय मित्र या नावाने मासिक सुरु केले होते. भारतातील पहिली अस्पृश्यांची परिषद बोलाविण्याचा मान या कर्तृत्ववान नेत्यांचा आहे.''[११] याच काळात सत्यशोधक चळवळीने चांगला जोर धरला होता. या सर्व वातावरणाचा व चळवळीचा परिणाम भाऊरावांच्या संवेदनशील मनावर होत होता. आपण काही तरी समाजसेवेचे व लोकसेवेचे काम करावे असे त्यांना मनोमन वाटू लागले. त्यांच्या वडिलांनीही भाऊरावांना या बाबतीत प्रोत्साहन दिले. आई-वडील हे दोघेही धार्मिक होते. त्यामुळे भाऊरावांवर लहान वयात तर धार्मिकतेचा प्रभाव होताच परंतु जेव्हा त्यांची आई निधन पावली तेव्हा मात्र त्यांचा देवाधर्मावरील विश्वास उडाला. 'देवाची इतकी आराधना करुन काय उपयोग?' असा प्रश्न त्यांच्या बालवयातच त्यांना पडला. त्यानंतर ते नास्तिक बनत गेले व अस्पृश्यतेच्या संदर्भात धर्मचिकित्सा त्यांच्या मनामध्ये सुरु झाली. प्लेगच्या साथीमुळे इयत्ता ६ वीपासून त्यांनी शाळेला कायमचा रामराम ठोकला व गावाकडे शेती करु लागले. त्यांचे मन काही शेतीमध्ये लागत नव्हते कारण त्यांच्या समोर अनेक प्रश्नांची गर्दी झाली होती. पुढे जीवनात काय करावे? असे प्रश्न होते. पुढे ते नाशिकला आले व नोकरी करावी असा विचार त्यांच्या मनात आला.

## २.४ नोकरी व सामाजिक कार्य

दादासाहेबांना नेहमी वाटायचे आपण काही तरी केले पाहिजे व करुन दाखविले पाहिजे. त्यासाठी ते पुढे नाशिकला आले. त्यांना नाशिकच्या एक्साईज खात्यात नोकरी मिळाली. परंतु ही

नोकरी पाच ते सहा महिने झाल्यानंतर बदली झाली ती मनमाडला व तेथेही काही दिवस काम केल्यानंतर त्यांची एकदम बदली झाली ती मुंबईला ट्रामवे मिठागऱ्याकडे. मुंबईला जाऊन नोकरी करावी असा विचार भाऊरावांच्या मनात होता. पण वडिलांना विचारावे म्हणून आंबेगावला आले. वडिलांना बदली हुकूम दाखवताच वडील तात्काळ उद्गारले, ''नोकरी सोडून दे भाऊ. आपल्याला नोकरीची गरज नाही. तू येथेच राहा. शेती कर, हळूहळू तुला तुझ्या आयुष्याचा पुढचा मार्ग दिसेल. तू मोठा होशील पोरा, निश्चित मोठा होशील. माझा आशीर्वाद आहे तुला!''[१२] पुढे भाऊराव आंबेगावी राहू लागले. परंतु काही दिवसानंतर त्यांना 'पोस्ट अँड टेलिग्राफ' खात्यात कारकूनाची नोकरी मिळाली. पुढे पोस्ट अँड टेलिग्राफमध्ये नोकरी करीत असतानाचा एक वर्षाच्या आत त्यांची बदली बगदादला झाली. त्या बदलीच्या हुकूमात पगार होता रु. ५००. परंतु नोकरीसाठी बगदादाला जायचे का? व नोकरी फक्त पैशासाठी करायची का हा विचार त्यांना सतावू लागला. माझे माझ्या देशासाठी काय योगदान आहे. जग नोकरीच्या पाठीमागे धावत असताना त्यांनी नोकरी सोडून दिली. हा त्यांच्या जीवनातील निर्णायक क्षण आहे. वडीलांनी त्यांना बगदादला जाऊ दिले नाही. उलट 'आपल्याकडे नोकर-चाकर असताना तू नोकरी करावी हे मला पटत नाही. तू शेती बरोबर समाजसेवा कर' असा उपदेश वडिलांनी त्यांना दिला. नंतर दोन वर्षे त्यांनी गावीच घालवली. तरीसुध्दा त्याकाळात नाशिकला त्यांचे येणे-जाणे चालूच होते. दरम्यान त्यांना काही गोष्टी सतावत होत्या. रामनवमीला नाशिकला मोठी यात्रा असते. त्यासाठी सर्व लोक एकत्र येत असतात. त्यावेळेस त्यांच्या असे लक्षात आले की रामकुंडावर सर्वांनाच आंघोळ करता येत नाही. जातीच्या कारणास्तव आंघोळ नशिबात नाही. त्यामुळे त्यांचे मन अस्वस्थ होत असे. तर कधी विद्रोहाने पेटायचे. त्यांनी समाजाचा बारकाईने अभ्यास करावयास सुरुवात केली. अंधश्रध्देमुळे होणारे नुकसान ते जाणून होते. त्यांच्यावर उपाय म्हणजे ज्ञान होय हे त्यांना समजून चुकले. अशा बऱ्याच घटनातून आपण एका विशिष्ट जातीमुळे वेगळे आहोत. याची जाणीव त्यांना वेळोवेळी होत गेली. हे सर्व करत असताना शब्द आणि अक्षरांमध्ये असलेले सामर्थ्य त्यांना एकीकडे खूणावत होते. त्यामुळे मिळालेला प्रत्येक कागदाचा तुकडा ते अत्यंत आत्मीयतेने वाचतयातूनच वाचण्याविषयी त्यांची अधीरता समोर येते. त्यामुळे त्यांनी शेती करता-करता वाचण्याचा सपाटा लावला. ते नाशिकला सायकलीने जात व त्यावेळी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा, 'विजयी मराठा', 'केसरी', 'चित्रमय जगत' इ. वर्तमानपत्रे नियमित वाचत असत. ते

वाचनालयात दोन-दोन तास घालवित असत. या वाचनातून त्यांना सामाजिक जग समजू लागले. सामाजिक वातावरण लक्षात आले. घरी कितीही आर्थिक सुबत्ता असली तरी समाजामध्ये नोकरीशिवाय सामाजिक प्रतिष्ठा नाही हेही त्यांच्या लक्षात आले. हे दिवस पारतंत्र्याचे होते. पारतंत्र्याच्या वेदना दुसरीकडे त्यांना सतावत होत्या. आपण काही तरी केले पाहिजे ही अस्वस्थता मनामध्ये सतावत होती.

### २.४.१ शाहू छत्रपती बोर्डिंगचे अधीक्षक व सार्वजनिक कार्याचे स्थान

याच दरम्यान म्हणजे इ.स. १९२४ ला अस्पृश्य मुलांसाठी के.बी. जाधव चालवित असलेल्या शाहू छत्रपती बोर्डिंगचे अधीक्षक म्हणून त्यांची नेमणूक के.बी. जाधव यांनी केली. दादासाहेबांनी ही नोकरी लगेच स्वीकारली. कारण त्यांना समाजसेवा करता येणार होती आणि कर्तव्याची व आत्मविश्वासाची जाणीाा त्यांना होऊ लागली म्हणून त्यांनी शाहू बोर्डिंग येथे अधीक्षक पदाची नोकरी स्वीकारली. खऱ्या अर्थाने त्यांनी ही नोकरी सार्वजनिक कार्याचे स्थान म्हणून पत्करली. तसेच या पदामुळे प्रतिष्ठा लाभणार होती व त्यातून अधिक उपयोग अस्पृश्यतेच्या निर्मूलनासाठी होणार होता. अस्पृश्य मुलांच्या शिक्षणाकडे बारकाईने लक्ष देता येईल व यातून मानवतेची दृष्टी देण्याचे काम होईल अशी दादासाहेबांची खात्री होती.

शाहू छत्रपती बोर्डिंगमध्ये ४०/५० विद्यार्थी होते. हे वसतिगृह घारपुऱ्यात इ.स. १९२० साली सुरु झाले होते. अस्पृश्य मुलांनी शिक्षण घेऊन समाजाबरोबर यावे व यातून स्वत:ची उन्नती स्वत:च करुन घ्यावी या हेतूने या वसतिगृहाची स्थापना झाली होती. खऱ्या अर्थाने वसतिगृहाचा अधीक्षक त्याकाळी मोठा माणूस समजला जात असे आणि येथूनच त्यांच्या सार्वजनिक जीवनाला सुरुवात झालेली दिसते.

### २.४.२ सार्वजनिक वाचनालय व गांधी विचारांचा प्रभाव

इ.स. १९२० ला टिळक युगाचा कालखंड संपून राजकीय क्षितिजावर गांधीजींच्या नेतृत्वाचा उदय झाला होता. हे दिवस म्हणजे गांधीजींच्या विचाराने मंतरलेले होते. गांधीजींनी श्रमप्रतिष्ठेचे तत्त्व अंगिकारले होते. कोणतेही काम कमी दर्जाचे नाही अशा प्रकारची शिकवण ते देत असत आणि स्वत: ते त्याप्रमाणे वागत असत. तसेच विविध वर्तमानपत्रातून देखील गांधीजींचा श्रमप्रतिष्ठेचा विचार समाजासमोर येऊ लागला. दादासाहेबांवर गांधींजींच्या या शिकवणूकीचा खूप प्रभाव पडला होता. हा गांधीजींचा विचार व शिकवणूक दादासाहेब आपल्यामध्ये रिचवत व पचवत

होते. बोर्डिंगचे अधीक्षक असूनही ते स्वत:ची कामे स्वत: करीत असत. स्वत:ची खोली स्वत: साफ करणे, शेणाने सारविणे, तसेच मुलांचे जेवण झाल्याशिवाय ते जेवत नसत. मुले जेऊन शाळेत गेल्यानंतर ते सार्वजनिक वाचनालयात जात असत व येथेच त्यांनी गांधी, मार्क्स, एंगल्स, लेनिन, टॉलस्टॉय यांची इंग्रजी आत्मचरित्रेही वाचून काढली. त्यामुळे त्यांच्या इंग्रजी वाचनाने ज्ञानकक्षा तर वाढल्याच परंतु इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वही वाढले. दररोजच्या सार्वजनिक वाचनालयातील त्यांच्या वाचनामुळे त्यांना व त्यांच्या विचारांना एक वेगळीच दिशा मिळत गेली. कारण त्यांचे वाचन हे एखाद्या व्यक्तीच्या आत्मचरित्रापुरतेच मर्यादित नव्हते तर वेगवेगळ्या देशांचा इतिहास सुध्दा वाचनात आला. त्याचप्रमाणे ऐतिहासिक महापुरुषांची चरित्रे वाचणे हा त्यांचा मोठा छंदच बनला होता. विशेष म्हणजे त्यांना टॉलस्टॉयचे जीवन चरित्र फार आवडले होते. त्या चरित्रातील महत्त्वाची काही वाक्ये ते टिपून ठेवीत असत. टॉलस्टॉयच्या एका वाक्यांचा दादासाहेबांच्या मनावर मोठा प्रभाव पडला होता ते वाक्य, ‘‘जो कोणी एखाद्या व्यक्तीच्या श्रमावर जगतो, त्या श्रम करणाऱ्या या पहिल्या व्यक्तीला चैनीत राहण्याचा अधिकार नाही.’’[१३] या वाक्याचा दादासाहेबांनी वसतिगृहाच्या दैनंदिन जीवनात पुरेपुर आचरण करण्याचा प्रयत्न केला होता.

सुरुवातीच्या काळात दादासाहेबांवर गांधीजीच्या श्रम प्रतिष्ठेच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. दादासाहेब गायकवाडांच्या वैचारिक चरित्राचा अभ्यास करताना असे दिसून येते की, सार्वजनिक वाचनालयाचा त्यांच्या जीवनामध्ये व जीवनाच्या जडणघडणीमध्ये मोलाचा वाटा आहे. त्याचे कारण असे की, जी पुस्तके त्यांना या वळणावर मित्रासारखी भेटली त्या पुस्तकांनीच त्यांना विचार आणि दृष्टी दिली. त्यांच्या वाचनाची भूक सतत वाढत राहिली. कारण त्यांना माणूस समजून घ्यावयाचा होता. तसेच जगही समजून घ्यावयाचे होते. इंग्रजी भाषेचा अडसरही त्यांनी ते ज्ञान घेऊन दूर केले व आपल्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावल्या. त्यांचा पोषाख हा महारीव खादीचा होता. महारिव खादी म्हणजे महारांनीच सुत काढून विनलेली खादी होय. याच दरम्यान त्यांना खादीच्या धाग्यामध्ये मंतरलेल्या विचारांची ओढ निर्माण झाली. खादी म्हणजे एक कपडा नसून विचार आहे हे त्यांना पटले होते. त्यावेळेपासून त्यांनी खादी वापरायला सुरुवात केली. आपण खादी वापरत नाही तर पांघरतोय असा विश्वास त्यांच्यामध्ये निर्माण झाला. सार्वजनिक वाचनालय त्यांचे विश्व बनले होते. कारण पुस्तकांच्या माध्यमातून त्यांना विश्व समजत होते. वसतिगृह आणि

सार्वजनिक वाचनालय ही दोन्ही ठिकाणे त्यांच्यासाठी मानबिंदू ठरली होती. पुढे इ.स. १९२६ साली दादासाहेबांची नाशिक शहराच्या सार्वजनिक वाचनालयाच्या कार्यकारी मंडळावर सभासद म्हणून निवड झाली होती. कारण वाचनालयातील त्यांच्या नेहमीच्या संपर्कामुळे त्यांना एक वेगळीच वैचारिक, सामाजिक जाणीव निर्माण झाली होती. तसेच नाशिक नगरपालिकेवरही सरकार नियुक्त सदस्य म्हणून त्यांची नेमणूक झाली होती. या माध्यमातून दादासाहेबांना सामाजिक सेवा करण्याची एक नामी संधी आली होती. त्याचा त्यांनी अत्यंत जाणीवपूर्वक उपयोग करून घेतला.

दादासाहेबांना सभेत बोलता येत नव्हते म्हणून त्यांनी वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांसाठी वादविवाद स्पर्धा भरवून, ते स्वत:ही स्पर्धेत भाग घेऊ लागले व आपल्यामध्ये त्यांनी बोलण्याचे कौशल्य निर्माण करुन घेतले. हेच वक्तृत्वाचे कौशल्य त्यांना पुढील आयुष्यात लोकनेता म्हणून समाज माणसात स्थान देऊन गेले.

## २.४.३ सामाजिक विषमतेविरुध्द व्यक्तिगत चळवळी

इ.स. १९२३ ते १९२४ च्या काळात महाराष्ट्रात अत्यंत महत्त्वपूर्ण घटना घडून आल्या. त्या घटनांचा भारताच्या इतिहासावर फार मोठा परिणाम झाला आहे. ४ ऑगस्ट, १९२३ रोजी मुंबई विधिमंडळात सी.के. बोले यांनी अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठे, धर्मशाळा, विद्यालये या सार्वजनिक ठिकाणी मुक्तद्वार असावे अशा प्रकारचा ठराव पास करुन घेतला. याच काळात वि.दा. सावरकर ब्रिटिश सरकारच्या कैदेतून सुटले, पण ठरलेल्या अटीप्रमाणे त्यांना स्थानबध्द केले गेले व राजकीय चळवळीत भाग घेण्यास बंदी घातली गेली. यामुळे त्यांनी सामाजिक प्रश्नांकडे लक्ष देऊन अस्पृश्यताविरोधी चळवळीस मदत करण्यास सुरुवात केली होती. गांधीजींनीही खिलापत चळवळीच्या अपयशानंतर अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीकडे लक्ष देण्यास सुरुवात केली होती. या सर्व घटनांपेक्षा जास्त महत्त्वपूर्ण घटना म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इ.स. १९२४ मध्ये मुंबईत बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली होती. भाऊरावांनी बाबासाहेबांविषयी ऐकले होते. आपल्या समाजातील ते सर्वात जास्त शिकलेले व बॅरिस्टर आहेत. त्याबद्दल त्यांना अभिमान व आकर्षण होते. तरुण असणाऱ्या भाऊरावांवर या सर्व घटनांचा जबरदस्त प्रभाव पडला.

या सर्व घटनांचा भाऊरावांच्या मनावर खोल परिणाम होत होता. आपणही समाजात जागृतीचा काही प्रयत्न करावा म्हणून सामाजिक विषमतेविरूध्द लहान-मोठ्या चळवळी व्यक्तिगत पातळीवर सुरु केल्या. त्यापैकी एक म्हणजे त्यांनी भंगी मित्राकडे दूध पिण्याचा कार्यक्रम मनोमन

ठरवला. जातिव्यवस्थेचे वैशिष्टये असे की तिने प्रत्येक जातीमध्ये उच्च-नीच भावनेचे विष पेरले. अस्पृश्य जातीमध्येही ते पूर्णपणे भिनले आहे. अस्पृश्य जातीतील भंगी जातीला सर्वात खालचे मानले जात होते. इतर असणाऱ्या अस्पृश्य जातीतील लोक त्यांच्याशी रोटी-बेटी व्यवहार करीत नाहीत. दादासाहेबांनी त्यांचे मित्र रामभाऊ पाला मारु यांच्याकडे त्यांच्या भंगी वाड्यात जाऊन भजनाचा कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात भाऊराव भंग्यांच्या घरचे दूध प्याले म्हणून त्यांच्या जातीने त्यांना जवळजवळ बहिष्कृत केले. एवढेच नव्हे तर भाऊरावाचे सासरेही त्यांच्यावर चिडले व त्यांनी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. सर्वांना भाऊरावांचे वर्तन हे धर्मबाह्य वाटत होते. या घटनेनंतर दादासाहेबांनी कोणाच्याही विरोधाची पर्वा न करता आपले सामाजिक जागृतीचे काम मोठ्या जोमाने सुरु ठेवले. भाऊराव फक्त दूध पिले म्हणून ही महार मंडळी चिडली होती असे नाही तर दुधाच्या प्रकरणानंतर दादासाहेब हे खेड्यापाड्यात जाऊन अस्पृश्यांची सभा घेऊन त्यांना सांगत असत की, ''आपण मृत जनावरांचे मांस खाणे सोडले पाहिजे. गावात उष्टे, शिळे अन्न भीक म्हणून मागण्याचे सोडून दिले पाहिले, आपली तथाकथित वतने नष्ट झाली पाहिजेत, त्याशिवाय तुम्ही या दास्यातून मुक्त होणार नाहीत.''[१४] अशा भाषणाच्यामुळे मेहतरे मंडळी दादासाहेबांवर चिडली होती. यावर खुद्द भाऊरावांचे चुलते म्हणाले, ''हा कालचा पोरगा आला काय आणि आमच्या वंशपरंपरागत हक्कांवर गदा आणतो म्हणजे काय? त्याचे हे म्हणणे आम्हाला बिल्कुल मान्य नाही.''[१५] म्हणजे सुधारणांना घरातूनच विरोध सुरु झाला. या घटनेतून आपल्याला कल्पना येते की सामाजिक सुधारणेची चळवळ त्या काळात किती अवघड बाब असेल. अस्पृश्यता निवारणाला महार जातीतील सनातनी लोकांचा फार मोठा विरोध होता. आपली वतने नष्ट होतील अशी भीती त्यांना वाटत होती. अशा या कारणांमुळेच त्यांनी दादासाहेबांच्या समाज जागृतीच्या कार्यात सुरुवातीला अडथळे आणले परंतु दादासाहेबांनी तेवढ्याच आत्मविश्वासाने प्रसंगाला तोंड दिले व अस्पृश्यांच्या समाज जागृतीच्या कार्यात कधी मागे सरकले नाहीत. त्यांना आपल्यामधीलच या जातिभेदाची फार चीड येत असे. त्यामुळे त्यांनी आपल्या मनाशी ठरविले की, आपल्यामधीलच उच्च-नीच भेद नाहीसे करावेत. खऱ्या अर्थाने भाऊरावांना जीवनातील या संघर्षाला मोठ्या जिद्दीने तोंड द्यायचे होते. म्हणून सभेतून ते सांगत, ''यमराज जरी माझ्यासमोर येऊन उभा राहिला तरी मी स्वीकारलेल्या मार्गापासून अगदी केसभर देखील ढळणार नाही. माझ्या बांधवांनो, तुम्हाला कोणी अस्पृश्य मानू नये, तुमचा विटाळ कोणी पाळू नये, तुमची स्थिती

सुधारावी. तुम्हाला समाजात मानाचे स्थान प्राप्त व्हावे हीच माझी अपेक्षा आहे.''[१६] यावरून ते आपल्या विचारांवर किती ठाम होते हेच दिसून येते.

### २.४.४ अस्पृश्यतेचा कटू अनुभव

दादासाहेबांचे बोर्डिंगचे काम अतिशय चांगल्या पध्दतीने चालू होते. समाज कार्यनिही चांगलाच जोर धरला होता. बाहेरील चळवळीत भाग घेऊन दादासाहेबांनी बोर्डिंगकडे आपले लक्ष केंद्रित केले होते. विद्यार्थ्यांचे दादासाहेबांवर मोठे प्रेम होते. कारण दादासाहेबांनी विद्यार्थ्यांच्या फक्त पोटाचीच काळजी घेतली नसून त्यांच्या प्रकृतीकडे व अभ्यासाकडेही विशेष लक्ष दिले होते. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांच्यामध्ये आपण ज्या उपेक्षित जातीत जन्माला आलो आहोत त्या जातीचा व समाजाचा विकास करण्यासाठीची जाणीव त्यांनी हळूहळू त्यांच्यामध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला. दादासाहेबांच्या या वसतिगृहातील कार्यामुळे व विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केलेल्या शिस्त व स्वावलंबनाच्या जागृतीमुळे ज्या-ज्या मोठ्या लोकांनी वसतीगृहाला भेटी दिल्या त्यात बॅ. सावरकर, महात्मा गांधी यांनी त्यांच्या कार्याचा मोठेपणा मान्य केला आहे.

याचवेळी त्यांना जातिव्यवस्थेच्या आणखी एका दाहक कटू प्रसंगाला सामोरे जाण्याचा निर्णय घ्यावा लागला. भाऊरावांचे वडील हे सधन शेतकरी होते. त्यांच्या शेतात अन्नधान्याच्या उत्पादनाबरोबरच ते ऊसाची बागायती शेती करीत असत. ''जगातील सारेच मार्क्सवादी माणसाच्या 'परात्मते'संबंधी खूप बोलत असतात. माणूस स्वत:च्या श्रमाने जी निर्मिती करतो तिच्यापासून तो परात्म कसा होतो आणि पुढे तो समाजापासून आणि स्वत:पासूनही 'परात्म' कसा होतो याचे विवेचन मार्क्सवादी चिंतन विविध अंगांनी करते, परंतु भारतीय जातिव्यवस्थेने निर्माण केलेल्या समाज रचनेतील परात्मतेला एक वैशिष्टयपूर्ण परिमाण होते हे भारतीय मार्क्सवाद्यांच्या लक्षात येणे शक्य नव्हते. स्वत: दादासाहेबांनी एक अस्पृश्य म्हणून त्याचा अनुभव घेतला होता.''[१७] त्यावेळेस नाशिकमध्ये साखर कारखाने दोन तीन होते. पण ऊसावर प्रक्रिया करुन घरच्या घरी गुऱ्हाळ लावून गूळ तयार करण्याची प्रक्रिया सर्वांना माहित होती. ऊस आल्यानंतर ऊस तोडणी करुन वर्षातून दोन-तीन महिने भाऊरावांच्या घरी गुऱ्हाळ चालत असे. ऊस परिपक्व होईपर्यंत शेतावर अस्पृश्य मजूर काम करीत असत पण गंमत अशी की ऊसापासून गूळ करण्याच्या सर्व प्रक्रियेत भाऊरावांच्या घरातील एकाही माणसाचा सहभाग नसे. गुळाला विटाळ होऊ नये म्हणून ही सर्व प्रक्रिया सवर्ण मंडळीच करीत असत. दादासाहेबांच्या कुटुंबात ७०/८०

माणसे होती. पण अस्पृश्यतेमुळे त्यांना गुळाच्या प्रक्रियेत भाग घेता येत नसे. परिणामी सवर्ण कामगारांना मजुरी देऊन हे गूळ करण्याचे काम करावे लागे.

दादासाहेबांनी या प्रथेला विरोध करण्याचा निर्णय घेतला. सवर्ण लोक आपल्या गुऱ्हाळाशेजारी बसून गरमगरम ऊसाची काकवी पितात व ताजाताजा गूळ खातात आणि आपण मालक असूनही त्यांच्याकडून तो मागून खायचा. ही बाब भाऊरावांच्या संवेदनशील मनाला पटेना. त्यांची सुधारणावादी वृत्ती केवळ भंग्याच्या घरी दूध प्राशन करण्यापुरती समाधानी नव्हती. त्यांनी स्वत:च्या घरच्या लोकांकडून गूळ स्वत:च तयार करण्याचे ठरविले. त्यांनी आपल्या वडिलांना निक्षून सांगितले व अट घातली की, ‘‘यापुढे मी कढईतील काकवी दुसऱ्याकडून मागून खाणार नाही. एवढेच नव्हे तर गूळ आपण स्वत: तयार करावयाचा. मान्य असेल तर मी यापुढे आंब्याला येईन, नाहीतर येणार नाही.’’[१८] भाऊरावाचे वडील म्हणाले, ‘‘भाऊराव, तुझे म्हणणे अगदी योग्य आहे. तसेच ते न्यायाचेही आहे. मलाही वाटते आपण स्वत: घरच्या घरी गुऱ्हाळ लावावे. गूळ तयार करावा. पण मुख्य अडचण आपल्यात ‘गुळ रांधे’ कुठे आहेत?’’[१९] यावर भाऊरावांनी गुळ तयार करण्यासाठी आवश्यक असणारी सर्व तयारी केली व आपल्या जातीतील सर्व माणसेही तयार केली. वडिलांनी ते सर्व मान्य केले. खऱ्या अर्थाने त्या काळात ती एक मोठी क्रांतिकारक घटना होती. त्यामुळे अस्पृश्य जनतेमध्ये स्वाभिमानाची व स्वावलंबनाची एक तेजस्वी लहर पसरत गेली. गूळ घरी तयार केला गेला. परंतु बाजारात त्याला गिऱ्हाईक मिळेना. अस्पृश्यांनी गूळ तयार केला आहे ही बातमी वाऱ्यासारखी संपूर्ण नाशिक जिल्ह्यात पसरली. सवर्ण हिंदुंनी या गुळावर बहिष्कार घातला. अखेरीस भाऊरावांनी तो गूळ अस्पृश्य जनतेत फुकट वाटला. पण एक निर्णय मनाशी पक्का घेतला की गूळ विको अथवा न विको दरवर्षी गूळ आपणच तयार करायचा. या प्रसंगाचा अर्थ असा की, अस्पृश्य समाजाच्या उध्दारासाठी कार्य करत असताना स्वत:च्या जीवनातील कोणत्याही क्षेत्रामध्ये कितीही नुकसान झाले तरी त्याची पर्वा नाही परंतु पाठीमागे हटणार नाही हाच त्यांचा आत्मविश्वास यातून दिसून येतो आणि तो त्यांनी कायम पाळला.

अस्पृश्य जातीमधील भेदभाव घालवण्यासाठी या काळात दादासाहेबांनी अनेक प्रयत्न केले. भंगी, चांभार, मांग, गारुडी इ. जातीच्या लोकांना ते घरी बोलवित, जेवण वाढीत. स्वत: त्यांच्या घरी जाऊन जेवण करीत. घरातून सुरुवातीला वडिलांच्या व्यतिरिक्त इतर मंडळी विरोध करीत पण हळूहळू भाऊराव जे करतो ते समाजाचे भले करणारे आहे याची खात्री सर्वांना पटत गेली. डॉ.

बाबासाहेब आंबेडकरांची भेट होण्यापूर्वीच दादासाहेबांनी सामाजिक क्रांतिचा हा 'गृहपाठ' अगदी पक्का केला होता. त्यांच्या जाणीवा या पक्क्या बनत गेल्या होत्या. एका युगपुरुषाचा शिष्य होण्यासाठी योग्यता त्यांनी पूर्णपणे आपल्या अंगी बनवली होती.

## २.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दादासाहेब गायकवाड यांची पहिली भेट

इ.स. १९२६ साल हे दादासाहेबांच्या जीवनातील सोनेरी पहाट होय. ज्या कारणामुळे त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली त्या प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भेट याच दरम्यान झाली. इ.स. १९२६ साली भल्या पहाटे दादासाहेबांची आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पहिली भेट छत्रपती शाहू बोर्डिंगमध्ये झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर एका कोर्टाच्या कामानिमित्ताने नाशिकला आले होते त्यामुळे ही भेट घडून आली होती. या भेटीनंतर बाबासाहेब आंबेडकर जेव्हा जेव्हा नाशिकला शाहू बोर्डिंगमध्ये उतरत, तेव्हा तेव्हा दादासाहेब मनोभावे त्यांची सेवा करीत. या वेळेपर्यंत बाबासाहेबांची किर्ती ही सर्वदूर अस्पृश्य समाजात पसरली होती. त्यांच्याबद्दल प्रचंड आदर निर्माण झाला होता. या आदरापोटीच दादासाहेबांनी त्यांची सर्व देखभाल केली. बाबासाहेबांना देखील हा हरहुन्नरी व हुशार तरूण आवडला. कारण दादासाहेबांचा चौकस स्वभाव, निटनेटकेपणा, वाचनाची आवड हे गुण त्यांना त्यांच्या जवळ घेऊन जाणारा वाटला. म्हणून त्यांनी दादासाहेबांना चांदवडच्या केसमध्ये होणाऱ्या साक्षी उतरुन घेण्याचे काम सोपविले. त्यांच्या स्वच्छ व वळणदार अक्षराने बाबासाहेबांना प्रभावित केले. भविष्यात बाबासाहेब जातिव्यवस्थेच्या विरूध्द पेटविणार असणाऱ्या महान रणसंग्रामातील साथी होण्याचा तो एक प्रारंभ होता.

बाबासाहेबांची भेट ही भाऊरावांच्या जीवनाला कलाटणी देऊन गेली. क्रांती करुन गेली. म्हणून "फुलासंगे मातीस वास लागे"[२०] या न्यायाप्रमाणे बाबासाहेबांच्या संगतीने दादासाहेबांचे जीवन पल्लवित झाले. त्यांच्या कार्याला धुमारे फुटले या त्यांच्या भेटीने दादासाहेबांच्या जीवनाला उद्दिष्ट मिळाले, नवी दिशा मिळाली. या भेटीत दोन गोष्टी साध्य झाल्या. एक म्हणजे दादासोहबांच्या विचारांना व कार्याला आवश्यक खतपाणी मिळाले आणि आपल्या विचारांचे विश्लेषण करुन सामान्य लोकांपर्यंत पोचविणारा कृतिशील भाष्यकार बाबासाहेबांना मिळाला व पुढे गुरु-शिष्यांची ही निखळ जोडी तयार झाली.

महार वतनामध्ये महार समाज गावगाड्याच्या आणि सरकारच्या गुलामीत चाकरी करीत होता. या संदर्भात महार वतनबिल डॉ. बाबासाहेबांनी तयार केले होते. या बिलामध्ये वतन म्हणून ज्या जमिनी महारांना देण्यात आल्या आहेत त्या त्यांच्याजवळच राहिल्या पाहिजेत. परंतु गाव कामगार म्हणून त्यांच्याकडून करुन घेतले जाणारे काम थांबविले पाहिजे, गाव काम करण्यासाठी कामाचे तास ठरवून सरकारी पगारी नोकर म्हणून नेमले पाहिजे असा या बिलाचा एकंदरीत आशय होता. पण या बिलाविरूध्द उलटा प्रचार केल्यामुळे महार समाजातच एक विरोध करणार गट तयार झाला होता. आपल्याकडील जमीन जाणार अशाप्रकारे प्रचार करून या बिलाविरूध्द पर्यायाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविरूध्द वातावरण निर्माण केले जात होते. त्यामुळे जनतेच्या मनातील या बाबतीतला गैरसमज दूर करावा म्हणून नाशिक परिसरातील अस्पृश्य जनतेची एक टोलेजंग सभा दादासाहेबांनी आयोजित केली. या सभेत बाबासाहेबांनी बिलाच्या संदर्भात गैरसमज दूर करुन ते कसे आपल्या फायद्याचे आहे ते सांगितले होते.

परंतु त्यादिवशी सकाळी सभेपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दादासाहेब सोबत पोहायला गेले असता ते पाण्यात थकून बुडू लागले असताना अचानक दादासाहेबांनी त्यांना पाहिले. जीवाची बाजी लावून त्यांना वाचविले. त्यानंतर झालेल्या सभेत दादासाहेबांबरोबर उपस्थित असणारा सर्व अस्पृश्य समाज रडत होता. या घटनेमुळे अस्पृश्यांचा तारणहार नाहीसा झाला असता, या कल्पनेने दादासाहेबांना आणि उपस्थित असणाऱ्या जनसमुदायाला रडू आवरले नाही. म्हणून नेहमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर दादासाहेबांचा उल्लेख करताना म्हणतात, ‘‘भाऊराव आमचे जीवनदाते’’[२१] आहेत. यावरुन त्यांच्यातली जवळिकता स्पष्ट करुन जाते.

इ.स. १९२४ ते १९२९ या कालावधीत त्यांनी जे वसतिगृहात अधिक्षक म्हणून काम केले त्या काळात त्यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने जाणीवपूर्वक लक्ष दिले होते. आजचा विद्यार्थी हा उद्याचा नागरिक आहे, ‘‘देश उत्तम घडवायचा असेल तर ही राष्ट्रीय संपत्ती जपली पाहिजे, प्रज्ञावंत विद्यार्थी ही देशाची संपत्ती आहे. या हिऱ्यांना पैलू पाडण्याचे काम वसतिगृहातच चांगल्या प्रकारे होऊ शकते.’’[२२] हा विचार त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यावरुन स्वीकारला होता. वसतिगृहातील प्रत्येक विद्यार्थी त्यांना आदराने ‘दादा’ म्हणायचे. एवढेच नव्हे तर अडचणी घेऊन येणारा प्रत्येक व्यक्तीही मुलांचे ऐकून ‘दादा’ म्हणू लागला. कारण दादासाहेबांनी सर्वसामान्य अस्पृश्य, कष्टकरी, शेतकरी, मजूर यांच्या अडीअडचणी अत्यंत

जाणीवपूर्वक त्रास सोसून सोडविल्या होत्या. म्हणून पुढे हेच 'दादा' महाराष्ट्रातील अस्पृश्यांचे 'दादासाहेब' झाले आणि बाबासाहेब व दादासाहेब महाराष्ट्रातील दलित मुक्ती चळवळीचे ठळक नाव ठरले.

दादासाहेबांचे वयाच्या ९ व्या वर्षी सीताबाईशी लग्न झाले होते. परंतु वयाची २६ वर्षे झाले तरी मुलबाळ झाले नाही म्हणून घरातील मंडळीनी व सीताबाईनेच दुसरे लग्न करण्याचा आग्रह धरला. परंतु समाज सुधारक भाऊरावांच्या मनाला ही बाब न पटणारी होती. म्हणून ते लग्नाला तयार होत नव्हते, पण पहिल्या पत्नीने म्हणजेच सीताबाईने डोळयात पाणी आणून भाऊरावांना विनवून सांगितले, ''तुम्ही दुसरं लग्न केलंच पाहिजे. माझ्या समाधानासाठी तरी केलंच पाहिजे. माझी कूस नाही तर नाही उजवली, पण आता दुसरीची तरी उजवू दे. मी तिचा मुलगा माझा म्हणून मानीन.''[२३] शेवटी सर्वांच्या मर्जीसाठी दादासाहेब दुसऱ्या लग्नाला तयार झाले. ते लग्न सीताबाईची लहान बहीण गीताबाईशी होणार होते. परंतु दादासाहेबांनी कुटुंबातील सर्वांना निक्षून सांगितले की हे लग्न अगदी साध्या पध्दतीने होईल आणि तशाच पध्दतीने ते लग्नही झाले. कारण दादासाहेबांच्या सामाजिक विचारांची जडणघडण या लग्नाच्या काळापर्यंत परिपक्व झाली होती. म्हणूनच त्यांनी समाजाच्या समोर साध्या पध्दतीने लग्न करण्याचा विचार पूर्ण केला होता. कारण त्यांना लग्नापेक्षाही अनेक समस्या विचार करायला लावत होत्या व समाजाकडे बारकाईने पाहण्याची दृष्टी मिळत होती.

## २.६ आंबेडकरी जलशातून समाजजागृती

महार वतन बिलाच्या संदर्भात दादासाहेबांनी आयोजित केलेल्या सभेनंतर दादासाहेब हे अस्पृश्यांच्या मुक्तीच्या लढ्यातील एक नेते म्हणून पुढे येत होते. समाज जागृतीसाठी ते रात्रंदिवस धावपळ करु लागले. गावोगावी जाऊन छोट्या सभा-मिटिंगा घेऊ लागले. त्याचवेळी त्यांच्या लक्षात आले की 'सत्यशोधक जलशा'सारखे जलसे आपणही निर्माण केले पाहिजेत. दादासाहेब गायकवाड यांनी मोरे यांचा जलसा अनेक वेळेला बघितला होता. त्यामुळे त्यांच्या मनावर मोरेंच्या जलशाचा चांगलाच प्रभाव पडला होता. मोरेंच्या जलशातून स्फुर्ती घेऊन त्यांनी ''मुंबईचे भीमराव कर्डक, केरुजी धेगडे, कांबळे, अंडागळे व गायकवाड या जातीवंत कलावंतांना त्यांची कला लोक शिक्षणाकरिता व सामाजिक प्रबोधनाकरिता उपयोगात आणा.''[२४] अशी कळकळीची विनंती केली होती. त्यांच्या प्रोत्साहनामुळे वामन दादा कर्डक यांनी 'आंबेडकरी जलसे' सुरु केले. कलेच्या

माध्यमातून जनतेत चांगली जागृती करता येईल. कारण ते स्वत:ही अशा सत्यशोधकी जलशांमधूनच नवीन विचारांकडे ओढले गेले होते. हे आंबेडकरी जलसे इतके गाजले होते की खुद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, ''माझ्या दहा सभा, मिटिंगा आणि कर्डक व मंडळींचा एक जलसा बरोबर आहे.''[२५] असे प्रशंसनीय उद्‌गार काढले आहेत.

सत्यशोधक आणि आंबेडकरी जलशातील विषय पाहिले की आपल्याला त्या काळाच्या व्यापक समाज चळवळीची कल्पना येते. शिक्षण प्रसार, सावकारी पाश, मंदिर प्रवेश, अस्पृश्यता निवारण, गुरुबाजी, दारुबाजी, ढोंगबाजी यावर प्रहार, भुताखेतांचे थोतांड, हिंदू-मुस्लीम ऐक्य, आंतरजातीय विवाह, अंधश्रध्देचे उच्चाटन इ. समाजातील सर्वच प्रश्नांना हे जलसे भिडत असत आणि जागृती करीत असत. लोकशिक्षण व समाजप्रबोधनासाठी जलसा हे एक उत्कृष्ट साधन आहे हे त्यांना गणपत मोरे यांच्या जलशातून समजले होते. लोकशिक्षणातून समाज प्रबोधन, समाज प्रबोधनातून माणूस घडवणे, माणसा माणसातला भेद मिटविणे, अस्पृश्यता नष्ट करण्याचे धडे देणे अशा कार्यक्रमातून सफल होईल असा त्यांना विश्वास होता. म्हणूनच हे महत्त्व ओळखून दादासाहेबांनी आंबेडकरी जलसे उभे करुन समाज जागृतीसाठी एक हत्यार जनतेच्या हाती दिले. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली जी ऐतिहासिक आंदोलने झाली त्या मानव मुक्तीच्या आंदोलनाच्या प्रचारासाठी व जागृतीसाठी आंबेडकरी जलशांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यामुळेच स्वाभिमानाची जाणीव होऊन गुलामगिरीच्या बेड्या तोडून टाकण्यास जलशाचा मोठा फायदा दादासाहेबांनी करुन घेतला.

याच दरम्यान अस्पृश्यांच्या दृष्टीने दोन महत्त्वाच्या घटना दादासाहेबांच्या वाचनात आल्या त्या म्हणजे, ''. . . त्रावणकोर संस्थानातील 'व्हायकोम' ह्या गावातील ज्या रस्त्यावर ब्राह्मणांची घरे होती, तो रस्ता अस्पृश्य बांधवास खुला व्हावा म्हणून मद्रासमधील एक ब्राह्मणेत्तर रामस्वामी नायकर यांनी सत्याग्रह सुरु केला होता . . .''[२६] तसेच त्या प्रांतातील नायर लोकांत अनेक विस्मयकारक अशा प्रकारच्या चालीरीती आहेत, ''. . . नायरहून खालच्या जातीतील स्त्रिया राजरोसपणे रस्त्यातून उघड्या छातीने हिंडतात. वरिष्ठ जातीपुढे नंबुद्री (नंबुद्री – नंबु = श्रध्दा आणि द्री = श्री म्हणजे श्रध्दास्पद असा अर्थ आहे.) छातीवर वस्त्र घेऊन जाणे म्हणजे त्यांचा उपमर्द करण्यासारखे आहे असे कनिष्ठवर्गीय स्त्रिया समजत . . .''[२७] तसेच दुसरी घटना म्हणजे ''मुर्गेसन या नावाच्या एक अस्पृश्याने मद्रासमधील एका मंदिरात बंदी मोडून प्रवेश केला. मद्रास

प्रांत म्हणजे त्या काळी 'अधर्मी सनातन्याचे रोम' तेथे महात्मा फुल्यांसारखे महात्मे जन्मास आले नव्हते. मंदिर प्रवेशापायी मुर्गेसनला न्यायालयात शासन झाले. देवदर्शनाचे ते फळ पाहून देवळातील दगडाच्या मूर्तीत देव नसतो हे त्याला कळावयास वेळ लागला नसेल.''[२८] या दोन घटनेचा दादासाहेबांच्या मनावर फार मोठा परिणाम झाला. त्यांच्या मनामध्ये आपणही सत्याग्रह करावा अशा प्रकारचे विचार येऊ लागले. पुढे नाशिकला जो काळाराम मंदिराचा सत्याग्रह झाला तो त्यांच्या प्रेरणेची ती वाटचाल होती असेच आपणाला म्हणावे लागेल.

**सारांश**

दादासाहेब गायकवाड यांच्या जडणघडणीचा इतिहास पाहता त्यांचे बाह्य व्यक्तित्व, आंतरिक व्यक्तित्व व वैचारिक व्यक्तित्व अभ्यासताना या गोष्टी स्पष्ट होतात की, त्यांना पाहताक्षणी या महाराष्ट्रातील दीन-दलितांचा उध्दारकर्ता पुढारी आहे असे वाटते. डोक्यावर निळी टोपी, खादीचा शर्ट, त्यावर खादीचेच जॅकेट, स्वच्छ प्रतिमेची साक्ष देणारे स्वच्छ व सुंदर धोतर, पायामध्ये साधी परंतु दिसायला सुंदर चप्पल असा पेहराव होता. आंतरिक व्यक्तित्वाबद्दल सांगायचे झाले तर, गावाच्या बाहेर राहणाऱ्या दीनदुबळ्यांचे उघडे संसार पाहून भाकरीसाठी टाचा घासणारी माणसे पाहून, तहान लागली तरी निसर्गाने सर्वांसाठी दिलेले पाणी आपल्या बांधवांना मिळत नाही हे पाहून मातेसारखे ज्यांचे हृदय पिळवटून निघते असे एकीकडे मातृहृदयी दादासाहेब, व स्वत:च्या आयुष्याचा जमा-खर्च न पाहता पूर्ण आयुष्य दलितमुक्तीच्या चळवळीसाठी खर्च करणारा, प्रसंगी समाजातील बांधवाच्या पाठीशी पहाडासारखा उभा राहणारा सखा म्हणून त्यांच्याकडे पाहिजे जाते. समाजाला मुक्तीच्या दिशेने घेऊन जाणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे अमृत पिवून सवर्ण व्यवस्थेच्या समोर निर्भीडपणे मत मांडणारा नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. म्हणजेच त्यांच्या आंतरिक व्यक्तित्वाच्या संबंधी थोडक्यात सांगायचे झाले तर लढवय्या शिलेदार, प्रसंगी मातृहृदयी,आणि दलित मुक्ती लढ्याचा लोकनेता अशी रूपे आपल्या समोर येतात.

त्यांच्या वैचारिक व्यक्तित्वावर सर्वात मोठा प्रभाव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा दिसून येतो. एक विलक्षण वैचारिक नेतृत्व म्हणून संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्याकडे पाहतो. एकाचवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, कार्ल मार्क्स, एंगल्स, लेनिन, टॉलस्टॉय इ. धुरंदर विचारांची व नेतृत्वाची एक आकृती किंवा शिल्प म्हणून दादासाहेबांकडे पाहिले जाईल.

जगभरातल्या ज्या-ज्या नेत्यांनी मानवमुक्तीची हाक दिली, मानवमुक्तीसाठी काम केले मग तो कोणत्याही जाती-धर्माचा किंवा देशाचा असो, ज्यांचे विचार आत्मसात करुन आपल्या गावाबाहेरच्या माणसाला नेटाने पुढे आणणारा लोकनेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. म्हणजेच त्यांचे वैचारिक नेतृत्व यातून साकार झाले हे दिसून येते.

दादासाहेब गायकवाडांच्या जडणघडणीमध्ये महाराष्ट्राची पुरोगामी माती, पुरोगामी मन व मत कारणीभूत आहेत. एकंदरीत दादासाहेबांच्या जडणघडणीचा विचार केला तर त्यांच्या कुटुंबातील असणारे धार्मिक व अध्यात्मिक वातावरण हे त्यांच्या नैतिक व वैचारिक संस्काराच्या जडणघडणीत रुपांतरीत होत असतानाच त्यांच्या वडिलांच्या निपक्षपातीपणे न्याय निवाडा करण्याच्या विचारांचा प्रभाव पडला व त्याचबरोबर वेळ प्रसंगी रोखठोक बंडखोरपणाचीही जाणीव होत गेली. तसेच त्या काळातील असणाऱ्या कर्मठ रूढी, परंपरांच्या चटक्यांचाही त्यांच्या बालमनावर परिणाम होत होता. वडिलांच्या धार्मिक व अध्यात्मिक प्रभावामुळे त्यांच्या अध्यात्मिक मनाची चांगली पेरणी होत गेली परंतु त्याचबरोबर तत्कालीन सामाजिक, धार्मिक विषमतेच्या, अस्पृश्यतेच्या चटक्याने त्यांच्या संस्कारक्षम मनामध्ये प्रश्नांची निर्मिती व जाणीव होत गेली. व त्यातून देव, धर्म, रूढी, परंपरा, अस्पृश्यता या सर्वांच्या विरोधी मनाची जडणघडण होत जाऊन या कर्मठ रूढी, परंपरा, अस्पृश्यता इत्यादींच्या विळख्यातून बाहेर येण्यासाठी प्रबोधन व समाजजागृती विषयी विचार मनात निर्माण झाले.

त्याकाळच्या शिक्षण व्यवस्थेचा अभ्यास केला तर शिक्षण ही काही लोकांची मक्तेदारी होती व शिक्षणामध्येही अस्पृश्यतेचा व्यवहार मोठ्या प्रमाणात होता. त्यांचे वडील शिक्षणाचे महत्त्व जाणून होते म्हणून त्यांनी भाऊरावाला शाळेत घातले. प्राथमिक शाळेतील त्यांच्या नावाच्या नोंदीवरुन व अस्पृश्य भेदभावाच्या व्यवहारावरुन सामाजिक विषमतेच्या विचारांची प्रबळ जाणीव होत गेली व त्या जाणीवेतूनच त्यांनी आपल्याला फारसे शिक्षण घेता आले नाही म्हणून छत्रपती शाहू बोर्डिंगचे अधीक्षक पद स्वीकारले व अस्पृश्य मुलांच्या शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. कारण दलित, वंचित, स्त्रियांच्या उन्नतीचे व परिवर्तनाचे अत्यंत महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण होय याची त्यांना पूर्ण जाणीव झाल्याने नंतरच्या कालखंडात त्यांनी वसतिगृहे व शाळा सुरु केल्या यावरुन दिसून येते. त्यांनी बोर्डिंगच्या अधीक्षक पदाची नोकरी ही सामाजिक कार्याचे स्थान म्हणूनच स्वीकारली होती. खरे तर हे बोर्डिंग म्हणजे दादासाहेबांच्या सामाजिक कार्याच्या

लढ्याचा रंगमंचच होय. शिक्षणाबरोबरच सामाजिक प्रश्नांच्याकडेही पाहण्याची दृष्टी त्यांना तिथे मिळत गेली. कारण त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली होती. पैशासाठी नोकरी हा विचार त्यांच्या वडिलांना मान्य नव्हता. म्हणूनच त्यांनी पहिल्या दोन नोकऱ्या सोडून दिल्या होत्या. सामाजिक सेवेच्या कार्याचा शुभारंभ व त्यांच्या वैचारिक व सामाजिक कार्याची जडणघडण अधीक्षक पदाच्या नोकरीतून तयार होत गेलेली दिसून येते.

नाशिकमधील सार्वजनिक वाचनालयात जावून त्यांनी आपली शिक्षणाची अपूर्ण राहिलेली भूक भागविण्याची व उद्याच्या सामाजिक चळवळीच्या लढ्यात प्रारंभिक स्वरूपात काम करण्याचे वैचारिक गृहपाठ त्यांनी गांधी, मार्क्स, एंगल्स, लेनिन, टॉलस्टॉय इ. महान नेत्यांच्या चरित्र वाचनातून केला. त्यातूनच त्यांच्या विचारांची परिपक्वता, दिशा व वक्तृत्व कौशल्य उद्याच्या लढ्यासाठी तयार होत गेलेली दिसतात. त्याचप्रमाणे स्वावलंबनांची, श्रम प्रतिष्ठेच्या आणि देशाच्या स्वातंत्र्य चळवळीच्या लढ्याचीही रुजवण त्यांच्यामध्ये होत होती. दलित मुक्तीच्या लढ्यासाठी त्यांना लढण्याचे बळ चरित्र वाचनातून, त्यावेळच्या वृत्तपत्रातून व त्यांच्या जीवनात आलेल्या त्यांच्याच शेतीतील गूळ तयार करण्याच्या परावलंबतेच्या व अस्पृश्यतेच्या दाहक कटू अनुभवातून मिळाले. वसतिगृहाचे अधीक्षक पद सांभाळत असतानाच सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नांची जाणीव त्यांना झाली होती. अनेक खेड्यापाड्यातील दीनदलितांच्या समस्या त्यांनी सोडविल्या होत्या. त्यामुळेच त्यांच्या मनाची तयारी ही सर्वसामान्य वंचित माणसांच्यामध्ये मिसळण्याची व सामाजिक कार्यासाठी झोकून देण्याची जडणघडण होत गेली. विद्यार्थी त्यांना 'दादा' म्हणत त्याचप्रमाणे सर्वसामान्यांनाही हा भाऊराव 'दादा' वाटू लागला व पुढे तेच 'दादासाहेब' झाले. त्यातूनच शेतकरी, मजूर, कष्टकरी, दलित, वंचिताच्या दु:खाची जाणीव त्यांच्या मनामध्ये निर्माण होऊन उद्याच्या सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नांसाठी लढण्याची ऊर्जा त्यांच्या जडणघडणीत निर्माण झालेली दिसून येते. तसेच ते तत्कालीन देशात घडणाऱ्या घटनांच्याकडे बारकाईने लक्ष देत होते. त्यामुळे त्यांनी व्यक्तिगत पातळीवर सामाजिक विषमतेविरुध्दच्या चळवळी सुरु केल्या व आपल्या जाती-जातीमधील भेदभावामुळे त्यांचे मन पेटून उठत असे त्यासाठी त्यांनी जाती-जातीमधील भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न धैर्याने, कृतिशीलपणे राबविला कारण त्यांना लहानपणापासून होणाऱ्या अस्पृश्यतेच्या कटू अनुभवाची जाणीव होती.

इ.स. १९२६ हे वर्ष दादासाहेबांच्या जीवनाला कलाटणी देणारे ठरले कारण त्याचवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दादासाहेब गायकवाड यांची भेट होऊन त्यांच्या जीवनाला उद्दिष्ट मिळाले. म्हणजेच विचार देणारा व कृतिसाठी दिशा देणारा नेता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने मिळाला आणि त्यामुळेच दादासाहेबांच्या व्यक्तिमत्वाला हिऱ्यासारखे पैलू पडत गेले व तसेच बाबासाहेबांच्या विचारांचे कृतीत रुपांतर करणारा भाऊराव मिळाला आणि सामाजिक क्रांतीच्या इतिहासाची गती कृतिशीलपणे सुरु झाली. हे आपणाला पुढील काळातील घटनांनी सिध्द केल्याचे दिसून येते. जलशाच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून ते एक समाज प्रबोधन, समाज उत्थानाचे व जागृतीचे महत्त्वाचे प्रभावी माध्यम आहे हे त्यांना कळून चुकले होते. म्हणून त्यांनी जलशाच्या माध्यमातून समाज जागृती करुन सामाजिक लढ्याच्या जागृतीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसून येते.

दादासाहेब गायकवाड यांच्या जडणघडणीत कौटुंबिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, वैचारिक, नैसर्गिक घटकांच्या कमी-अधिक प्रभावातून त्यांच्या विचारांची जडणघडण तयार होत गेली व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भेटीने आणि विचारांने दादासाहेबांच्या कृतिशील कार्याला गती व प्रेरणा मिळाल्याचे दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ


१. हरिभाऊ पगारे: दादासाहेब गायकवाड जीवन व कार्य, पृष्ठ-११ (प्रस्तावना)

२. कित्ता: पृष्ठ-१३.

३. भावना भार्गवि: पद्‌मश्री दादासाहेब गायकवाड, पृष्ठ-२.

४. भावना भार्गवि: लोकाग्रणी दादासाहेब गायकवाड, पृष्ठ-२७.

५. हरिभाऊ पगारे: कित्ता, पृष्ठ-१८.

६. भावना भार्गवि: लोकाग्रणी दादासाहेब गायकवाड, पृष्ठ-३१.

७. हरिभाऊ पगारे: कित्ता, पृष्ठ-१७.

८. निर्मलकुमार फडकुले, रावसाहेब कसबे व इतर (सं.): कर्मवीर दादासाहेब गायकवाड: काल आणि कर्तृत्व, पृष्ठ-१२७ (लेख – ॲड. विठ्ठलराव हांडे – समाजक्रांतीचे प्रणेते दादासाहेब गायकवाड)

९. भावना भार्गवि: लोकाग्रणी दादासाहेब गायकवाड, पृष्ठ-३३.

१०. हरिभाऊ पगारे: कित्ता, पृष्ठ-२२.

११. धनंजय कीर: डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, पृष्ठ-२६.

१२. भावना भार्गवि: लोकाग्रणी दादासाहेब गायकवाड, पृष्ठ-३५.

१३. कित्ता: पृष्ठ-७४.

१४. हरिभाऊ पगारे: कित्ता, पृष्ठ-२९.

१५. निर्मलकुमार फडकुले, रावसाहेब कसबे व इतर (सं.): कित्ता, पृष्ठ-१२९,

१६. कित्ता: पृष्ठ-१३०.

१७. कित्ता: पृष्ठ-१६ (प्रस्तावना – डॉ. रावसाहेब कसबे).

१८. हरिभाऊ पगारे: कित्ता, पृष्ठ-३८.

१९. भावना भार्गवि: लोकाग्रणी दादासाहेब गायकवाड, पृष्ठ-६६.

२०. फुलचंद्र खोब्रागडे: सूर्याचे सांगाती, पृष्ठ-२८.

२१. भावना भार्गवि: लोकाग्रणी दादासाहेब गायकवाड, पृष्ठ-५९.

२२. फुलचंद्र खोब्रागडे: कित्ता, पृष्ठ-२८-२९.

२३. हरिभाऊ पगारे: कित्ता, पृष्ठ-४९.

२४. कित्ता: पृष्ठ-५४.

२५. कित्ता: पृष्ठ-५५.

२६. विठ्ठल रामजी शिंदे: माझ्या आठवणी व अनुभव, पृष्ठ-३८३.

२७. कित्ता: पृष्ठ-३८६-३८७.

२८. हरिभाऊ पगारे: कित्ता, पृष्ठ-५८.

## प्रकरण तिसरे

# भूमिहीनांच्या सत्याग्रहातील

# कर्मवीर दादासाहेब गायकवाड

# यांचे योगदान

# प्रकरण तिसरे

# भूमिहीनांच्या सत्याग्रहातील कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे योगदान

## प्रास्ताविक

भारतीय रिपब्लिकन पक्षाने दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली केलेला भूमिहीनांचा सत्याग्रह हा भारतीय इतिहासातील एक महत्त्वपूर्ण लढा होय. दादासाहेबांनी त्यांच्या राजकीय आयुष्यात अनेक आंदोलने केली आणि प्राणांची बाजी लावून सत्याग्रह लढवले. त्यावेळी त्यांच्या पाठीशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उत्तुंग असे नेतृत्व होते. पण त्यांच्या निधनानंतर संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाची आणि पुढे भूमिहीनांच्या देशव्यापी सत्याग्रहाची परिस्थिती वेगळी होती. या आंदोलनाच्या वैचारिक मांडणीपासून आंदोलन संघटित करण्याची सर्व जबाबदारी दादासाहेबांचीच होती. खऱ्या अर्थाने त्यांच्या नेतृत्वाचा कस लागला होता. बाबासाहेबांच्या सहवासात तयार झालेल्या दादासाहेबांनी मोठ्या हिंमतीने या आंदोलनाचे नेतृत्व केले. त्यांनी शेतकऱ्यांचा नेता म्हणूनही आपली स्वतंत्र प्रतिमा निर्माण केली.

जे काही लोक स्वत:साठी करतात ते आपल्या बरोबरच नष्ट होऊन जातात. परंतु जे इतरांच्यासाठी आणि जगासाठी करताात ते मात्र कायम स्मरणात व अमर असतात. दादासाहेब गायकवाड यांच्या जीवनकार्याचा आपण जेव्हा नि:पक्षपातीपणे आढावा घेतो तेव्हा आपणास दिसून येते की, दादासाहेब गायकवाड आयुष्यभर आंबेडकरी चळवळच जगले, स्वत:साठी जगलेच नाहीत, ते जगले केवळ इतरांच्यासाठी म्हणजे आंबेडकरी चळवळीसाठी होय. ह्या देशातील आंबेडकरी चळवळ स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्वासाठी सातत्याने संघर्ष करीत होती. आंबेडकरी चळवळीला ह्या देशात ज्याप्रमाणे सामाजिक समता अभिप्रेत होती, त्याचप्रमाणे आर्थिक समता सुध्दा अभिप्रेत होती. आंबेडकरी चळवळीने सामाजिक समतेच्या लढ्यास अग्रक्रम दिला कारण त्यांची अशी धारणा होती की, ‘‘सर्व प्रकारच्या क्रांत्यांच्या अगोदर सामाजिक क्रांती होणे आवश्यक आहे.’’[१] असे असले तरी, आर्थिक कार्यक्रमाकडे मात्र आंबेडकरी चळवळीने केव्हाच दुर्लक्ष केलेले नाही. आंबेडकरी चळवळीने डॉ. आंबेडकरांच्या हयातीत भूमिहीन शेतमजुरांच्या समस्येवर इ.स. १९५४ मध्ये मराठवाड्यात आणि डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात व देशपातळीवर सत्याग्रह केले आहेत. या

देशाचा इतिहास डोळ्यांसमोर ठेवूनच, आंबेडकरी चळवळीने ह्या देशात सामाजिक समतेचा आणि आर्थिक समतेचा इतिहास निर्माण केला आहे.

'जमीन' त्यामध्ये विशेषत: शेतजमीन हा एक संवेदनाक्षम विषय केवळ जमिनीसाठीच नाही, तर जमिनीच्या मालकीसाठी खून आणि मारामाऱ्या होतात. भारतीय माणसाची मानसिकता लक्षात घेता स्वत:ची जमीन असणे ही फार महत्त्वाची व प्रतिष्ठेची गोष्ट आहे. जमिनीच्या मालकीशी प्रतिष्ठेची संकल्पना जोडली गेली आहे. आजही या देशात मुलीचे लग्न करताना मुलाला जमीन आहे का? हा प्रश्न प्रामुख्याने विचारला जातो. जमिनीच्या तुकड्यावरून व त्याच्याजवळ असलेल्या ७/१२ वरुन त्या व्यक्तीची पत ठरते. एवढेच नव्हे तर अजूनही पोलीस ठाण्यात जामिनासाठी ७/१२ ची आवश्यकता असते. म्हणून अशा या जमिनीच्या तुकड्याशी भारतीय माणसांचे मन गुंतलेले आहे. समाज परितर्वनासाठी देखील अस्पृश्य, भूमिहीन, श्रम करणाऱ्या व्यक्तीला जमीन मिळणे म्हणजे एका अर्थाने त्याला प्रतिष्ठा प्राप्त करुन देणे होय. जमिनीचा मालकी हक्क हा जसा उपजीविकेच्या साधनांसाठी आवश्यक आहे तसाच तो समाजात प्रतिष्ठने जगण्यासाठी आवश्यक आहे. दादासाहेब गायकवाड यांनी केलेल्या भूमिहीनांच्या सत्याग्रहातून या भूमिहीनांना उपजीविकेचे साधन मिळवून देण्याबरोबरच त्याला आतापर्यंत नसलेली प्रतिष्ठा मिळवून देणे हा एक महत्त्वाचा भाग त्यात होता.

स्वातंत्र्योत्तर काळात जी काही आंदोलने या देशात झाली त्यापैकी सर्वात मोठे व दीर्घकाल चाललेले, रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून व दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली लोकआंदोलन म्हणून भूमिहीनांच्या सत्याग्रहाचा आपणाला विचार करावा लागेल. या देशातील स्वातंत्र्योत्तर काळातील सर्व आंदोलनाचा विचार केला तर दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्षाने केलेले भूमिहीन सत्याग्रहाचे आंदोलन येथील समाज व्यवस्थेला एक नवा आयाम देणारे आंदोलन होते. म्हणून जमिनीच्या मालकीच्या संदर्भात आंबेडकरी चळवळीचा, विशेषत: दादासाहेब गायकवाड यांनी केलेल्या भूमिहीनांच्या सत्याग्रहातील कार्याचा शोध घेणे महत्त्वाचे आहे.

## ३.१ जमीन हक्कांसंबंधी डॉ. आंबेडकरांची भूमिका व मार्गदर्शन

आंबेडकरी चळवळीची सुरुवात महाडच्या चवदार तळ्यावरील दोन सत्याग्रहाने झाली. ह्या दोन्ही सत्याग्रहात दादासाहेब गायकवाड हे नाशिकच्या कार्यकर्त्यांसह सक्रीय सहभागी होते. दि.

१९ मार्च १९२७ च्या पहिल्या सत्याग्रहातील अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, ''दुसरा धंदा मी जो आपणास सुचविला आहे तो शेती आहे. हा धंदा सुचविण्यात माझा हेतू असा आहे की, आपल्या अस्पृश्य वर्गांनी आर्थिकदृष्ट्या स्वतंत्ररितीने जीवित घालविण्याची व्यवस्था करावी. . . . शेती विकत घेणे हे अस्पृश्य लोकांना कदाचित कठीण जाईल. पण जंगल खात्याच्या कितीतरी पडीक जमिनी आहेत. त्यांना जर अस्पृश्य वर्गाच्या माणसाने मागणी केली तर त्याला त्या मिळण्यासारख्या आहेत.''[२] ठाणे जिल्ह्यातील कसारा या ठिकाणी भरलेल्या एका परिषदेमध्ये भाषण करताना डॉ. आंबेडकरांनी इतर अनेक महत्त्वाच्या विषयांबरोबरच अस्पृश्यांच्या जमीन मालकीच्या संदर्भात सांगितले की, ''महारांना जमिनी नाहीत, याचे कारण त्या इतर लोकांनी घेतल्या म्हणून, अस्पृश्यांना नोकऱ्या नाहीत याचे कारण इतर लोकांनी त्या लुबाडल्या म्हणून दैवावर भरवसा ठेवून वागू नका. जे काम करावयाचे असेल ते आपल्या मनगटाच्या जोरावर करा.''[३]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे इ.स. १९३५ मध्ये धर्मांतराच्या प्रश्नावर विचार करण्यात गंभीरपणे गुंतले असले तरी इतर क्षेत्रातील त्यांची कामेही चालूच होती. कुलाबा जिल्ह्यातील 'चरी' ह्या गावी शेतकऱ्यांची एक परिषद त्यांच्या अध्यक्षेतेखाली भरली होती. त्या परिषदेतील भाषणात शेतकऱ्यांच्या मनावर त्यांनी ठसविले की, ''जमीनदारांच्या सुखात त्यांच्या दुःखाची मुळे होती. म्हणून त्यांनी शेतकऱ्यांवर लादलेल्या गुलामगिरी विरुध्द चळवळ उभारली पाहिजे.''[४] इ.स. १९३५ मधील डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेने सारा देश हादरला. या धर्मांतराच्या घोषणेमुळे त्रावणकोर संस्थानाने त्यांच्या ताब्यात असलेली १,६०० देवळे अस्पृश्यांना खुली केली. या घटनेचा परिणाम पंडित नेहरू यांच्या मनावरही झाला. त्रावणकोरच्या जाहिरनाम्याविषयी बोलाना पंडित नेहरू म्हणतात की, ''अस्पृश्यांचा प्रश्न हा मूळातच भूमिहीन वर्गाचा आर्थिक प्रश्न आहे. ह्या जाहिरनाम्यामुळे जे नवीन वातावरण निर्माण झालेले आहे ते लोकांच्या मनावर दूरवर परिणाम घडवून आणील. त्यामुळे अस्पृश्यांचा आर्थिक प्रश्न सोडविण्यास सहाय्य होईल असे मला वाटते.''[५] सप्टेंबर १९३७ च्या सुरुवातीला 'मसूर' येथे भरलेल्या परिषदेत डॉ. आंबेडकर काँग्रेसवर हल्ला करीत म्हणाले, ''जोपर्यंत उत्पादनाची साधने थोड्या व्यक्ती आपल्या स्वार्थासाठी राबवित आहेत, तोपर्यंत सामान्य माणासाला उत्कर्षाची आशा नाही.''[६] कोकणातील खोती नष्ट करण्यासाठी त्यांनी मुंबई विधान मंडळासमोर दि. १७ सप्टेंबर १९३७ रोजी एक

विधेयक मांडले. शेतजमीन कसणाऱ्या कुळांची गुलामगिरी नष्ट करण्याच्या हेतूने प्रांतिक मंडळाच्या नवीन मनूत, आंबेडकर हे अशा तऱ्हेचे विधेयक मांडणारे विधान मंडळाचे पहिलेच सदस्य होते. आंबेडकरांनी महार वतनाचे उच्चाटन करण्यासाठी ह्यावेळी एक विधेयक मांडले त्याच्यासाठी ते इ.स. १९२७ सालापासून चळवळ करीत राहिले होते.

तसेच ३० डिसेंबर १९३७ ला पंढरपूर येथे भरलेल्या परिषदेपुढे भाषण करताना डॉ. आंबेडकर म्हणाले, ''आपल्या पुढे तीन प्रश्न आहेत. पहिला असा की, आपणास हिंदू समाजात कधी समान दर्जा प्राप्त होईल काय? राष्ट्रीय उत्पन्नाचा योग्य भाग मिळेल की कसे, हा दुसरा प्रश्न. तिसरा प्रश्न असा की, आपण चालविलेल्या स्वाभिमान रक्षक आणि स्वावलंबन चळवळीचे पुढे काय होणार? जे धनिक आपल्याला पिळतात त्या धनिकांच्या विरुध्द एक आघाडी स्थापण्याची फारच आवश्यकता आहे. दलित वर्गाचे आर्थिक स्वातंत्र्य संपादन करण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे. तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर असे की, दलितांच्या स्वावलंबन नि स्वाभिमान-रक्षक चळवळीमुळे त्यांचा झाला तर फायदाच होणार आहे; तोटा तर नाहीच नाही, ही गोष्ट त्यांनी ध्यानात ठेवावी. मरणाची भीती मात्र त्यांनी टाकून दिली म्हणजे झाले.''[७] दि. ३१ डिसेंबर १९३७ रोजी डॉ. आंबेडकर, दादासाहेब गायकवाड, श्री कमलाकर चित्रे इ. सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. सोलापूरला मातंग परिषद होती. परंतु तत्पुर्वी श्री. ऐदाळे यांनी डॉ. आंबेडकर, दादासाहेब, श्री. चित्रे, रोहम इ. ना खास मोटार करुन चंद्रभागेच्या काठावरील पडित जमिनी बघण्यासाठी नेले कारण, ''ही पडित जमीन अस्पृश्य समाजातील लोकांना सवलतीने मिळावी म्हणून आमदार ऐदाळे यांनी सरकारजवळ प्रयत्न चालविला आहे. ती जमीन बाबासाहेबांच्या प्रत्यक्ष अवलोकनात यावी म्हणून श्री. ऐदाळे यांनी हा कार्यक्रम आखला होता.''[८]

पुढे दि. १६-१२-१९३९ रोजी मुंबई इलाखा महार, मांग, वेठिया, वतनदार परिषद हरेगाव येथे घेण्यात आली. त्यात डॉ. आंबेडकरांनी जमिनीच्या प्रश्नावर सविस्तर मांडणी केली व ह्या प्रश्नाची सोडवणूक कशी करता येईल याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या परिषदेचे स्वागताध्यक्ष दादासाहेब गायकवाड होते. त्यांनी मांग, महार, वेठिया, वतनदारांची गाऱ्हाणी मांडली होती. त्यांच्या भाषणाला धरुनच बाबासाहेबांनी आपले जमीन विषयक विचार मांडले. वतनदारांसंदर्भात सरकारने केलेल्या 'जुडीवाढी'च्या विरोधात ते ठामपणे बोलले. जुडीवाढी प्रश्नासोबतच डॉ. आंबेडकरांनी गाव कामगारांच्या प्रश्नालाही वाचा फोडली. ''गावोगावच्या

पाटलांना सरकार पासोडी, जमीन, शेतसाऱ्याच्या प्रमाणात पेशगी व किरकोळ खर्चासाठी कागदबाद रक्कम देत असते. गावकामगार महारांना मात्र काही ठिकाणीच जमिनी देण्यात आल्या आहेत. त्यांना पगार दिला जात नाही. जमीनीच्या अभावी या सरकारी नोकरांना सर्वस्वी बलुत्यावर अवलंबून रहावे लागते. उलट या गावकामगारांनी संप पुकारावा अशी सूचना बाबासाहेब करतात, 'वतने सोडा पण हातच्या जमिनी मात्र गमावू नका. शेत सारा भरा व वतनाच्या गुलामगिरीतून मुक्त होऊन स्वाभिमानी शेतकरी बना.'''[१] असा उपदेश त्यांनी केला. जमिनीसाठी सुरु झालेला हा संघर्ष पुढे दादासाहेबांनी भूमिहीनांच्या सत्याग्रहाच्या माध्यमातून चालूच ठेवला.

## ३.२ जमीन प्रश्न – स्वतंत्र मजूर पक्ष ते शे.का.फेडरेशन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दादासाहेब गायकवाड व इतर आपल्या सहकाऱ्यांशी विचार विनिमय करुन ऑगस्ट १९३६ मध्ये 'स्वतंत्र मजूर पक्ष' नावाचा एक राजकीय पक्ष स्थापन केला. स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा म्हणजे शेतमजूर व कामगार वर्गाच्या हक्काचा जाहीरनामाच होय. त्यात भूमिहीन, गरीब कुळे, शेतकरी नि कामगार यांच्या गरजा आणि गाऱ्हाणी मांडली होती. कामगार, भूमिहीन शेतमजूर, बड्या जमीनदारांकडून होणारे शेतकऱ्यांचे शोषण, सामाजिक सुधारणा, बेकारीचा प्रश्न इ. अनेक प्रश्नांची बांधिलकी स्वीकारुन डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाच्या माध्यमातून दलितांच्या राजकीय हक्कांसाठी स्वतंत्रपणे संघर्ष सुरु केला. बाबासाहेबांनी खोती पध्दतीला विरोध करुन कुळांच्या शोषणाला स्वतंत्र मजूर पक्षाने वाचा फोडली. दि. १० जानेवारी, १९३८ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विधीमंडळावर, शेतकऱ्यांच्या, शेतमजूरांच्या व भूमिहीन शेतमजुरांच्या दु:खाला वाचा फोडण्यासाठी एका विशाल आणि सर्व समावेशक मोर्चाचे आयोजन केले. ह्या मोर्चात २० हजार शेतकरी सामील झाले होते, जमीन कसणाऱ्याला त्याच्या मेहनतीचे फळ मिळालेच पाहिजे. खोत, इनामदारासारखे मध्यस्थ नको व सामाजिकदृष्ट्या जुलमी व आर्थिकदृष्ट्या कुचकामी ठरलेली जमीनदारी संपुष्टात आणलीच पाहिजे अशी भूमिका त्यांनी घेतली.

पुढे १९४२ ला शे.का.फे. या पक्षाची स्थापना झाली. व जुलै १९४२ रोजी नागपूरला भरलेल्या पक्षाच्या पहिल्या अधिवेशनात जे अनेक ठराव मांडण्यात आले त्यात अस्पृश्यांना त्यांच्या उपजिविकेसाठी शेतीला लायक अशीच पडीक जमीन मिळावी असा ठराव करण्यात आला होता. तसेच पुढे इ.स. १९४४ साली अखिल भारतीय शे.का.फेडरेशनच्या कार्यकारणीत

'भूमिहीनांचा प्रश्न' हाती घ्यावा असा ठराव करण्यात आला. परंतु भूमिहीनांच्या लढ्याला सुरुवात झाली ती इ.स. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर शे.का.फे.चा पराभव झाला. परंतु निराश न होता दादासाहेबांनी बाबासाहेबांच्या सूचनेप्रमाणे मराठवाड्यात जनजागृतीला सुरुवात केली. वतनी जमिनी, भूमिहीन यांच्या प्रश्नांवर लढे, सत्याग्रहाला सुरुवात केली. डॉ. आंबेडकरांनी १८ व १९ जुलै १९४२ रोजी नागपुरात अ.भा. दलित वर्ग परिषदेत जी भूमिका मांडली होती त्यामुळे सत्याग्रहाला चालना मिळाली होती. या परिषदेत डॉ. आंबेडकर अस्पृश्य वर्गाला आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्याचा उपदेश करताना म्हणतात, ''आर्थिक पारतंत्र्यामुळेच सामाजिक पारतंत्र्यही येते व त्यातून न्यूनगंड निर्माण होतो. तो दूर करण्यासाठी आपण केंद्र सरकारकडे मागणी केली पाहिजे की, सरकारची पडिक जमीन अस्पृश्यांना मिळाली पाहिजे. अस्पृश्य वर्गास स्वतंत्र वसाहती स्थापन करण्याची तरतूद घटनेतच केली पाहिजे . . . सरकारच्या मालकीची शेती करण्याजोगी बरीचशी जमीन आहे व ती अजून कोणाच्याही ताब्यात नाही. अस्पृश्यांची नवीन खेडी निर्माण करण्याच्या योजनेला प्रत्यक्षात उतरविण्यासाठी ही जमीन राखून ठेवली जाऊ शकते. लोकांकडे पडित असलेली खाजगी मालकीची जमीनही सरकार विकत घेऊ शकते व तिचा उपयोग या उद्देशपूर्तीसाठी करु शकते.''[१०] अशी मांडणी केली होती. या आधारे दादासाहेबांनी मराठवाड्यात सत्याग्रह केला होता. सत्याग्रहाची मागणी होती, भूमिहीनांना सरकारी पडिक जमीनी द्या व त्यावर दलितांचे पुनर्वसन करा.

इ.स. १९५३ मध्ये सिध्दार्थ महाविद्यालयातील दलित फेडरेशनच्या बैठकीत बाबासाहेब कार्यकर्त्यांना म्हणाले होते की, ''मी माझ्या शहरातील बांधवांसाठी काही तरी केले आहे पण खेड्यातील बांधवांचे दुःख निवारण करीन, त्यांचा प्रश्न सुटेल असे महत्त्वाचे त्यांच्यासाठी मी काही करु शकलो नाही. बाबासाहेब ह्यावेळी अक्षरशः रडले होते. म्हणून ते म्हणत की, 'यापुढील माझे सर्व आयुष्य मी खेड्यांतील माझ्या बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी खर्च करणार आहे.''' [११] शंकरराव खरात आपल्या 'अस्पृश्यांचा मुक्तीसंग्राम' या ग्रंथात लिहितात की, ''डॉ. आंबेडकरांनी १५ मार्च १९५५ रोजी आग्रा येथे भाषण करुन 'सरकारी पडीक जमिनीचे कब्जे अस्पृश्य लोकांनी घ्यावेत, पुढे काय होईल ते पाहता येईल' असेच लोकांना मार्गदर्शन केले.''[१२] याचा परिणाम असा झाला की, मराठवाड्यात भूमिहीनांनी सरकारी जमिनीवर कब्जे करुन मशागतीला सुरुवात केली. व यावेळी २ हजार भूमिहीन लोकांना बेकायदेशीरपणे जमीन ताब्यात घेतली म्हणून तुरुंगवास

घडला. म्हणजेच सत्याग्रहाच्या माध्यमातून अस्पृश्य समाजास आर्थिक स्थिरता मिळवून देणे हाच डॉ. आंबेडकरांचा मुख्य उद्देश होता.

इ.स. १९३७ ला डॉ. आंबेडकरांनी खोती पध्दती विरुध्द व महार वतनी जमिनी इ. च्या संदर्भात घेतलेल्या भूमिका, इ.स. १९४२ मध्ये सरकारी जमिनी मागण्याची भूमिका व इ.स. १९५५ ला कब्जा आंदोलन असा जमिनीच्या प्रश्नांच्या संदर्भात पर्यायी लढाऊ कृती कार्यक्रम सांगितला होता. यातूनच दादासाहेबांना दलित मुक्ती लढ्यातील जमिनीच्या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आले होते. म्हणून डॉ. आंबेडकरांच्या नंतर रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून दादासाहेब गायकवाड यांनी संघर्षशील भूमिका घेऊन ते भूमिहीनांचे नेते बनले.

## ३.३ शेतजमिनीच्या राष्ट्रीयीकरणाची मागणी

आंबेडकरी चळवळीने सातत्याने भूमिहीन शेतमजूर, शेतमजूर व शेतकरी कुळे यांच्या आर्थिक विकासासंबंधी अग्रक्रमाने विचारांची मांडणी, वेळप्रसंगी आंदोलने व मोर्चे इत्यादी मार्गाचा अवलंब केलेला आहे. असे असले तरी शेतीविषयक प्रश्नांच्या सोडवणुकीत फार मोठे यश मिळाले नसले तरी इ.स. १९२७ ते १९३७ ह्या दशकाच्या कालावधीत शेतीविषयक प्रश्नांवर व उद्योगात गुंतलेल्या लोकांच्या समस्यांवर परिपूर्ण क्रांतीकारक विचारांची मांडणी आंबेडकरी चळवळीनेच सर्व प्रथम केली आहे. इ.स. १९३० साली लंडन येथे भरलेल्या गोलमेज परिषदेमध्ये डॉ. आंबेडकरांनी भारतातीतल अस्पृश्यांच्या व शेतमजुरांच्या प्रश्नाला वाचा फोडली. शेतकऱ्यांची पिळवणूक करुन त्यांना साधे किमान वेतनसुध्दा देत नसल्याबद्दल टीका केली. कामगार व भूमिसुधारणा करण्याची त्यांनी मागणी केली. पुढे घटना समितीला सादर करावयाच्या ह्या ज्ञापनात डॉ. आंबेडकरांनी शेतीसंबंधाने प्रस्थापित केले की, ‘‘शेतकीचा उद्योग हा सरकारी व्हायला हवा. जमीन सरकारच्या मालकीची होईल आणि ती ग्रामस्थांना जातपात निरपेक्ष बुध्दीने भाडेपट्ट्याने दिली जाईल. असे घडले म्हणजे कोणी जमीनदार नाही, कोणी कुळ नाही, कोणी भूमिहीन नाही असे होईल.’’[१३] हा विचार खरोखरच त्यावेळी क्रांतीकारक होता. या देशातील तत्कालीन जमीनदारांना आव्हान होते. जातीधर्माचा भेदभाव न करता सर्व शेतजमिनीची समान पध्दतीने फेरवाटणी करण्यात यावी. ज्यांच्याकडे ज्यादा शेतजमिनी आहेत. त्या काढून घेऊन भूमिहीन शेतमजुरांना दिल्या जाव्यात. चीनमध्ये देखील माओच्या बरोबर अनेकांनी क्रांतीत उडी घेतली, तेव्हा त्यातील काहींच्या जमिनी माओने कम्यून्ससाठी घेतल्यावर क्रांतीतील सहभागी माओच्या

विरोधात जाऊ लागले. या देशातील तत्कालीन तथाकथित डाव्या पक्षांनीसुध्दा 'जमिनीच्या राष्ट्रीयीकरणाची' मागणी केल्याचे दिसून येत नाही. जमिनीच्या राष्ट्रीयीकरणाच्या मागणीला डॉ. बाबासाहेबांच्या नंतर काही प्रमाणात उजाळा देण्याचे काम दादासाहेब गायकवाड यांनी भूमिहीनांच्या सत्याग्रहाच्या माध्यमातून केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला जमिनीच्या राष्ट्रीयीकरणाचा, भूमिहीनांच्या लढ्याचा, फॉरेस्ट जमिनी अतिक्रमणाच्या संदेशातून दादासाहेब गायकवाड यांनी रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून भूमिहीनांचा लढा उभा केला. रिपब्लिकन पक्ष केवळ निवडणुकांच्या राजकारणासाठी नाही हे बाबासाहेबांचे विचार घेऊन दादासाहेब म्हणतात, ''रिपब्लिकन पक्षच या देशात समाजवादी समाजरचना अस्तित्वात आणेल.''[१४] समाजवादी समाज परिवर्तन अस्तित्वात आणण्याचे 'लढा, आंदोलन, सत्याग्रह' हे मार्ग असल्याचे दाखवून देतात.

## ३.४ भूमिहीनांच्या लढ्याचा इतिहास व वास्तव

या देशात भूमिहीनांचा सत्याग्रह करण्याची आवश्यकता का निर्माण झाली? याचा विचार केला तर उत्पादनाचे साधन असणारी जमीन ही उच्चजातीय लोकांची मक्तेदारी होती. या देशातील उत्पादन व्यवस्था जातिव्यवस्थेवर आधारित असल्यामुळे जमीन मालकीचा अधिकार उच्च जातीय लोकांकडे होता. दलित-आदिवासी, भटके विमुक्त, स्त्रिया यांना जमिनीच्या मालकीचा हक्कच नाकारण्यात आला होता. त्यासाठी धर्मशास्त्रानेही मोठी मदत केली. उत्पादक श्रम करणारे जाती वर्ग उत्पन्नाच्या साधनावर आपली मालकी मिळवू शकणार नाहीत. अशी जन्माधिष्ठित उत्पादन पध्दती निर्माण केली गेली. कष्टाची कामे हीन मानली गेली. त्यामुळे देशातील सर्व उत्पादन व्यवहार, उत्पादनसंबंध जन्माधिष्ठीत विषमतेवर व कनिष्ठ जात वर्गीयांच्या शोषणावर उभे राहिले होते. आजपर्यंत जमीन मालकी कोणत्या जातवर्गाकडे किती प्रमाणात राहिली हे तपासले तर ह्या देशाच्या अगदी प्राचीन इतिहासापासून ते एकोणिसाव्या शतकापर्यंत, जमिनीच्या मालकीपासून दलित, आदिवासी, भूदास व गुलाम इत्यादींना वंचित केल्याचा व राबवून घेतल्याचा वस्तुनिष्ठ इतिहास आपल्यासमोर उभा राहतो.

अगदी मूठभर उच्च जातवर्गीयांनी कोणत्याही प्रकारचे श्रम न करता कष्टकरी जातीकडून अधिकचे श्रम करवून घेतले व अतिरिक्त धन स्वत:कडे घेतले आणि त्यांच्याकडेच सर्वाधिक जमिनीची मालकी राहिली आहे. एवढेच नव्हे तर प्रशासकीय सेवेतील उच्चपदे, अधिकाराच्या

जागाही त्यांनी आपल्याकडे ठेवलेल्या दिसतात. म्हणजेच ज्ञानसत्ता, अर्थसत्ता, सांस्कृतिक सत्ता इ. ची मक्तेदारी कनिष्ठ जातवर्गीयांचे शोषण करून स्वत:कडे ठेवण्यात हा उच्चजातीय भांडवलदार यशस्वी ठरला.

या देशामध्ये 'राज्यसमाजवादाचे' स्वप्न डॉ. आंबेडकरांनी पाहिले. या देशातील उत्पादन साधनांची विषम वाटणी दलितांना आर्थिकदृष्ट्या पंगू बनविते म्हणून ते जमिनीच्या फेरवाटपाची, पुनर्रचनेची मागणी करतात. तसेच देशातील जमीन व महत्त्वाच्या उद्योगधंद्यावर मूठभर उच्चवर्गीयांची मक्तेदारी राहू नये, तर ती देशातील सर्वांची, सर्व कष्टकऱ्यांच्या सामुहिक मालकीची व्हावी म्हणून ते जमिनीचे व अन्य महत्त्वाच्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्याची मागणी करतात. बाबासाहेबांचा आर्थिक पुनर्रचनेचा विचार दादासाहेबांनी भूमिहीनांच्या सत्याग्रहातून व्यवहारात आणण्याचा प्रयत्न केला. दीनदलित लोकांची दैन्यावस्था घालवायची असेल तर भूमिहीनांना जमिनी मिळाल्या पाहिजेत. या दृष्टीने भूमिहीनांच्या लढ्याकडे ते पाहतात. त्यांच्या मते, ''दीनदुबळ्या लोकांना जमीन मिळवून देण्यासाठी वेळ पडल्यास तुरुंगवास पत्करण्यास देखील तयार आहे असे जळजळीत उद्‌गार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आग्रा येथील दोन लाख लोकांच्या विराट सभेत भाषण करताना काढले होते. या घोषवाक्यास प्रत्यक्ष रूप भूमिहीन जमीन सत्याग्रहाने दिलेले आहे.''[१५] दादासाहेब स्पष्ट करतात की, बाबासाहेबांनी खेड्यातील गोरगरीब, दरिद्री लोकांच्या उन्नतीसाठीचे स्वप्न पाहिले. ''बाबासाहेबांची ही अपूर्ण मनिषा पूर्ण करण्यासाठी त्यांचे अनुयायी व रिपब्लिकन पक्ष भूमिहीनांचा प्रश्न हाती घेऊन खेड्यातील खेडूतांचे गाऱ्हाणे दूर करण्याचा प्रयत्न करीत आहे.''[१६]

भूमिहीनांचा सत्याग्रह सुरु करण्यापूर्वी अनेक वेळा, सभा, अधिवेशनात ठराव करून पडिक जमिनीची मागणी रिपब्लिकन पक्षाने केली होती. औरंगाबाद अधिवेशनात निर्णय घेण्यात आला की, ''जर सरकारने याची दखल घेतली नाही तर प्रत्यक्ष लढा पुकारावा लागेल. सत्याग्रह म्हणजे औरंगाबादच्या ठरावाची प्रत्यक्ष अंमलबजावणीच आहे.''[१७] भूमिहीनांना जमिनी मिळवून देणे हे पक्षापुढील महत्त्वाचे ध्येय आहे. भूमिहीन, शेतीवर काम करणारे मजूर यांना खेड्यापाड्यात उद्योगधंदा किंवा नोकरी नसल्यामुळे त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविला पाहिजे. दारिद्र्य व बेकारीमुळेच भूमिहीन जमीन मागत आहेत. औरंगाबादच्या अधिवेशनात दादासाहेब म्हणाले की, ''ज्या पडित जमिनी आहेत त्या सरकारने ताबडतोब भूमिहीन लोकांना दिल्या पाहिजेत आणि ह्या

जमिनी देण्यात सर्वात मोठा अडसर काँग्रेस पक्ष होता. ते शेतकऱ्यांचा, भूमिहीनांचा प्रश्न सोडवणार नाहीत. म्हणूनच भूमिहीनांचा लढा आपणच दिला पाहिजे.''[१८] अशी भूमिका ते घेतात.

दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या भूमिहीनांच्या सत्याग्रहाला काँग्रेसने विरोध करुन भूमिहीनांचा लढा कसा चुकीच्या पायावर उभा असल्याचा प्रचार सुरु केला व या देशात पडिक जमीन ही फॉरेस्ट खात्याच्या मालकीची असल्याचे सांगितले. तेव्हा दादासोबांनीही डावपेचाने प्रतिउत्तर देऊन प्रतिवाद केला की, ''दारिद्र्य व बेकारीमुळे भूमिहीन जमीन मागत आहे. तुम्हाला जमीन द्यायची नसेल. तर भारताने मान्य केलेल्या घटनेप्रमाणे या सर्व लोकांना काम द्या. सरकारच्या खोट्या माहितीवर फॉरेस्ट खाते व त्यांच्या वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमावर दादासाहेब टीका करतात. त्यांच्या मते, 'फॉरेस्ट म्हणून संबोधली जाणारी हजारो एकर जमीन म्हणजे प्रत्यक्ष जंगल नसून सरकारच्या लहरीनुसार पुढे कधीतरी जंगले तयार करण्यासाठी राखून ठेवलेली पडित जमीन आहे. सरकारचा जंगल लावणीचा आजचा वेग लक्षात घेता या जमिनीवर जंगल तयार होण्यास किमान शंभर वर्षाच्यावर कालावधी लागेल. तेव्हा सदरहू जमिनी भूमिहीनांना देण्यापासून राष्ट्राचे नुकसान होणार नसून, उलट हजारो टन धान्य जमिनीत भूमिहीन पिकवून दाखवतील.''',[१९] भूमिहीनांचा सत्याग्रह करताना सर्व स्तरातील शोषित घटकांच्या संदर्भात ते भूमिका घेतात. आदिवासींपासून ते दलित-बहुजन भूमिहीनांचे आंदोलन उभे करतात आणि त्यामागील एक ऐतिहासिक पार्श्वभूमी सुध्दा मांडतात. अर्थातच त्यांनी मांडलेला जमिनीच्या मालकीचा इतिहास म. फुले व डॉ. आंबेडकरांच्या इतिहास विश्लेषणांशी सुसंगत आहे. दादासाहेब गायकवाड म्हणतात, ''आदिवासी व अस्पृश्य हे आर्यांच्या आधीपासून या देशातील रहिवासी आहेत. पण त्यांच्याजवळ टिचभरदेखील जमीन नसावी ही दुर्दैवाची गोष्ट आहे. मात्र मागाहून आलेले उपरे माड्या, हवेल्या व शेकडो एकर जमीन बळकावून बसलेले आहेत. भटाला दिली ओसरी... प्रमाणे आदिवासी व अस्पृश्यांची जमिनीबाबत परिस्थिती या देशात झालेली आहे.''[२०] आजच्या भूमिहीनांना जमिनी मिळाल्या पाहिजेत. कारण एकेकाळी तेच या भूमीचे मालक होते अशी भूमिका दादासाहेब गायकवाड यांनी घेतली.

### ३.४.१ जमिनीच्या फेरवाटपाची मागणी

दादासाहेब गायकवाड यांनी भूमिहीनांचा सत्याग्रह म्हणजे ऐतिहासिक व क्रांतीकारक असल्याचा सतत पाठपुरावा केला. कारण जेव्हा काँग्रेस सरकारने 'जमीनच उलब्ध नाही' असे

म्हटल्यावर स्वत: दादासाहेब आकडेवारीसह भूमिहीनांना जमिनी कशा मिळू शकतात. इ. माहिती सांगतात व त्यांनी म्हटल्याप्रमाणे, ''राज्यात एकूण ३५,३२,४०० एकर जमीन पडिक असून ती लागवडीखाली आणली पाहिजे. याच्या दुपटीने या देशात भूमिहीन आहेत. त्यामुळे एवढ्याशा जमिनीने भूमिहीनांचा पोटापाण्याचा प्रश्न सुटणार नाही. त्याकरीता ज्यांच्याकडे ज्यादा जमिनी आहेत त्यांच्याकडून ज्यादा जमिनी काढून त्या भूमिहीनांना वाटून दिल्या पाहिजेत. फॅमिली सिलिंगपेक्षा अधिक जमिनी काढून त्या वाटल्या पाहिजेत.''[२१] येथे दादासाहेबांनी पडिक जमिनीची आकडेवारी तर सादर केलीच पण पुढे जाऊन जमिनीच्या फेरवाटपाचीही मागणी केली. मुंबई राज्यात १६ लाख एकर जमीन पडिक आहे. ती जमीन भूमिहीनांना दिली तर बेकारी सुटेल व अन्नधान्याचा प्रश्न सुटेल, असा भूमिहीनांना जमीन वाटल्याचा फायदा ते सांगतात. त्यांच्या मते असे झाले तर देशाचे कल्याण होईल अन्यथा नाही.

दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या भूमिहीनांच्या सत्याग्रहावर अनेक आरोप करून तो कमजोर करण्याचा प्रयत्न केला गेला. म्हणजे हा सत्याग्रह ''एका जातीचाच'' आहे असा आरोप केला कारण सर्व जातीधर्मातील भूमिहीनांचे नेतृत्व अस्पृश्य समाजातील दादासाहेबांकडे होते म्हणून, परंतु त्याने दादासाहेब डगमगले नाहीत. त्या आरोपासंदर्भात ते स्पष्ट करतात की, ''आमच्या भूमिहीन सत्याग्रहात सर्व जातीचे व सर्व धर्माचे लोक ओहत. त्यात विशेषत: आदिवासी व अस्पृश्यही आहेत.''[२२] येथे दादासाहेबांना ह्या लढ्यात दलितांसोबत आदिवासी मोठ्या प्रमाणात सहभागी होणे ही क्रांतीकारी व अभिमानास्पद गोष्ट वाटते हे लक्षात येते. त्यांच्या मते भूमिहीनांचा हा लढा सर्व जाती धर्मातील भूमिहीनांचा लढा आहे. ''आज धार्मिक समजुतीखातर कित्येक जमिनी पडून आहेत. मारुतीच्या नावावर जमिनीचे पाच हजाराचे खाते आहे. पण जिवंत मारुतीजवळ एक गुंठा जमीन नाही.''[२३] असे सांगून त्यांनी धार्मिक सत्ता कशा प्रकारे आर्थिक शोषण करते याची जाणीव ते करुन देतात. तसेच जमिनीच्या प्रश्नावर संघर्षात्मक कार्यक्रम घेऊन 'नसेल त्याला जमीन' ही घोषणा घेऊन भूमिहीनांनी या लढ्यात सामील झाले पाहिजे असे सांगतात.

### ३.४.२ जमीन प्रश्न सोडविण्याच्या दोन पध्दती – प्रारुपे

जमिनीचे फेरवाटप, पुनर्रचना, जमीन मालकी, भूमिहीनांचा सत्याग्रह या संदर्भात प्रमुख दोन प्रकारची मॉडेल दिसतात. एक मार्ग महात्मा गांधी, विनोबा भावे, यांनी सांगितलेला मन

परिवर्तनावर उभा आहे. त्याच भूमिकेतून विनोबांनी भूदान आंदोलन हाती घेतले. भूदान चळवळीत देणाऱ्याच्या मर्जीवर जमीन मिळविण्याची भूमिका होती. आणि ही भूमिका आंबेडकरवादी दादासाहेबांना मान्य होणे अशक्य होते. कारण त्यांनी आपल्या उभ्या आयुष्यात संघर्षातून प्रश्न सोडविण्याचा अनुभव घेतला होता. दयेपेक्षा संघर्षावर, मन परिवर्तनापेक्षा लढ्यावर, क्रांतीकारी प्रबोधनावर त्यांचा अधिक विश्वास होता. म्हणूनच संघर्ष करुनच जमिनी मिळणार असल्याचे वास्तविक भान ते देतात. दादासाहेब या दोन प्रारुपातील फरक स्पष्ट करताना म्हणतात, ‘‘विनोबांचा भूदान तर आमचा भू-माग यज्ञ चालू आहे.’’[२४]

दादासाहेब गायकवाड हे खऱ्या अर्थाने हाडाचा शेतकरी माणूस, घरची त्यांची मोठी शेती होती. त्यामुळे वेळप्रसंगी शेतात राबणे हे त्यांना माहित होते. शेतात राबणाऱ्या भूमिहीन शेत मजूरांच्या समस्यांची दादासाहेबांना जाणीव होती. दादासाहेबांचा पोषाख, भाषा आणि राहणी ह्या सर्व बाबी शेतकऱ्यांसारख्याच साध्या होत्या. क्रांतीसिंह नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या भाषा, पोषाखातील साधेपणाच गोरगरिबांना भावत होता. त्यांच्यात जिव्हाळा, सद्भावना व आदर निर्माण करीत होता. दादासाहेब गायकवाड यांचे वाचन-लेखन काही मोठे नव्हते पण दीनदलितांच्या चेहऱ्यावरची वेदना टिपण्याची बौध्दिक कुवत मात्र त्यांच्यामध्ये उपजतच होती आणि त्या वेदनेच्या जाणिवेतूनच, दलितांच्या, भूमिहीन शेतमजूरांच्या सत्याग्रहाने जन्म घेतला.

## ३.५ भूमिहीनांचा सत्याग्रह व दादासाहेब गायकवाड

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिल्या दोन दशकात या देशात ‘हरितक्रांती’ला सुरुवात झाली. पतंप्रधान पंडित नेहरुंनी तर कृषी क्षेत्रातील तंत्र विज्ञानाला सरकारच्या माध्यमातून गती दिली. शेती क्षेत्रासाठी शासनाने व खाजगी भांडवलदारांनी वित्त पुरवठ्याची सोय केली. भारताच्या ग्रामीण भागात सर्वच राज्यांमध्ये शेतीला रोजगार निर्मिती करणाऱ्या उद्योगाचा दर्जा प्राप्त झाला. पण ह्या सर्व प्रगतीच्या पोटामध्ये भूमिहीन शेतमजूरांची संख्या ग्रामीण भागात वाढत चालली होती. एकंदर लोकसंख्येच्या साधारणतः चौथा हिस्सा असलेला हा भूमिहीन शेतमजूरांचा वर्ग, शेती उद्योगात दुर्लक्षित आणि भरडला जात होता. भूमिहीन शेतमजूरांच्या किमान वेतनाचा कायदा नव्हता आणि नंतर तरी तो अस्तित्वात आला, तरी ग्रामीण भागामध्ये त्याच्या काटेकोर अंमलबजावणीवर लक्ष ठेवणारी यंत्रणा, स्वातंत्र्यानंतरच काय पण आजसुध्दा अस्तित्वात नाही

आणि म्हणूनच स्वातंत्र्याच्या दुसऱ्या दशकाच्या मध्यात दादासाहेबांनी भूमिहीन शेतमजूरांच्या वेदनेला वाचा फोडली.

जमीन सुधारणा, जमीन वाटपाचा प्रश्न, देशातील समाजक्रांतीच्या लढ्यातील मूलभूत प्रश्न आहे. जातिव्यवस्थेवर आधारलेल्या सरंजामशाहीच्या अवशेषांना आणि पर्यायाने जातिव्यवस्थेला कायमची मुठमाती देण्याशी हा प्रश्न जोडला आहे. दलित जतनेच्या गरिबीचे आणि त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांचे मूळ या प्रश्नात दडले आहे. भूमिहीनांना जमिनी मिळाव्यात या मागणीसाठी सुरु झालेला सत्याग्रह स्वातंत्र्योत्तर काळातील रिपब्लिकन राजकारणातील महत्त्वाची राजकीय कृती म्हणून इतिहासात नोंदली गेली.

दादासाहेब गायकवाड यांनी हाती घेतलेल्या भूमिहीनांच्या आंदोलनाची मराठवाडा, महाराष्ट्र आणि देशव्यापी अशी तीन टप्प्यात विभागणी करता येईल. एकंदरीत ढोबळमानाने या सत्याग्रहाचा कालावधी हा इ.स. १९५३ ते१९६५ असा सांगता येईल. या देशामध्ये जमिनीचे वाटप हे विषम पध्दतीनेच झाले आहे. बंगाल, तेलगंण, उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश या भागात मोठ्या प्रमाणात जमीनदारी पध्दत होती. ती काही ठिकाणी अजूनही आहे. हा देश कृषिप्रधान असल्यामुळे बहुसंख्य लोक शेती व शेतीसंबंधीत उद्योगांवर अवलंबून आहे. त्यामध्ये ग्रामीण भागातील बहुसंख्य लोक शेतीवरच सर्वस्वी अवलंबून आहेत. म्हणून शेतीचे पुनर्वाटप व्हावे असा एक विचार २० व्या शतकात या देशात मूळ धरु लागला. आपल्या देशात सर्वसाधारण इ.स. १९४५ ते१९५० पर्यंत जमीनदारीच्या विरोधात बंगाल, त्रावणकोर, कोचीन, तेलंगण या भागात जनआंदोलने सुरु होती.

जगामध्ये इ.स. १९४५ ते १९४९ ला चीनमध्ये माओच्या नेतृत्वाखाली शेतकरी क्रांती सुरु होती. इंडोनेशिया, व्हिएतनाम यासारख्या देशातही साम्यवादी विचाराने प्रेरित झालेल्या तरुणांनी जमीनदारी विरोधी सशस्त्र क्रांती करून कसेल त्याला जमीन, सावकारी पध्दत बंद, जमिनीचे फेरवाटप केले होते. आपल्या देशातही कम्युनिस्ट चळवळीने इ.स. १९४६ मध्ये तेलंगणा प्रांतात जमीनदारीच्या विरोधात रवि नारायण रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली सशस्त्र क्रांती होऊन इ.स. १९४६ ते १९५० पर्यंत हा लढा सुरु होता. कसेल त्याची जमीन म्हणून गरीब भूमिहीनांना जमीन दिली गेली होती. या पार्श्वभूमीवर जमिनीच्या वाटपाबाबत आपल्याकडे अधिक महत्त्व आले होते. स्वातंत्र्योत्तर काळात समाजवादी समाजरचनेच्या निर्मितीचा एक भाग म्हणूनही या प्रश्नाकडे पाहिले जात होते. या सर्व पार्श्वभूमीचा विचार केला तर भूमिहीनांना जमीन मिळावी

या मागणीला नैतिक मूल्य लाभले होते हे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना याची जाणीव होती. परंतु जमिनीचे पुनर्वाटप व्हावे ही त्यांची पूर्वीची मागणी इ.स. १९५० नंतरच्या संविधान निर्मितीच्या वेळी पुढे जाऊ शकली नव्हती.

आज जमिनीविषयी अशी तरतूद आहे की, ''भूमी, म्हणजे भूमीतील किंवा तिच्यावरील अधिकार, जमीन मालक व कूळ ह्यांचे संबंध धरुन भूधृती आणि खंडाची वसूली, शेतजमीनीचे हस्तांतरण व अन्याक्रमण जमीन सुधारणा व कृषीविषयक कर्जे, वसाहतीकरण ह्या तरतुदीमुळे जमीन, शेतजमीन, जमीनदारी, कुळ जमिनीची वहिवाट व तदनुषंगीक सर्व विषय आता राज्यशासनाच्या अखत्यारीत आहेत.''[२५] आज देशाला स्वातंत्र्य मिळून साठ वर्षे होऊन गेली तरी ह्या देशातील भूमिहीन शेतमजूरांच्या भौतिक जीवनात कोणती सुधारणा झाली हा मोठा प्रश्न आहे. म्हणून जेव्हा दादासाहेबांनी या भूमिहीनांच्या सत्याग्रहाला सुरुवात केली तेव्हा त्यांना या सत्याग्रहाची गरज का भासली हे आपल्या लक्षात येईल. आज या देशातील शासकीय आकडेवारीच सांगते की, या शंभर कोटीच्या पुढे असलेल्या लोकसंख्येच्या देशात वीस कोटीच्या पुढे लोक असे आहेत की, त्यांना दोन वेळेचे साधे जेवण सुध्दा मिळत नाही आणि तीस कोटी लोक दारिद्र्य रेषेखालचे जीवन जगत आहेत. त्यामुळे भूमिहीनांना जमीन मिळवून देण्यासाठी 'सत्याग्रह' या हत्याराचा स्वतंत्र भारतात चांगल्या पध्दतीने वापर होऊ शकतो याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना होती. म्हणून त्यांनी भारतातील भूमिहीनांच्या सत्याग्रहाचा प्रयोग मराठवाड्यात करण्याचा मनोदय इ.स. १९५० नंतर त्यांनी दादासाहेब यांच्याकडे बोलून दाखवला एवढेच नव्हे तर, या सत्याग्रहाच्या नेतृत्वाची जबाबदारी देखील त्यांनी दादासाहेबांवर टाकली.

### ३.५.१ मराठवाड्यातील भूमिहीनांचा सत्याग्रह – इ.स. १९५३-५८ पहिला टप्पा

भूमिहीनांना जमिनी मिळाव्यात या मागणीसाठी सुरु झालेला सत्याग्रह मराठवाड्यात सुरु झाला ते स्वाभाविक होते. दादासाहेब गायकवाड यांचे नेतृत्व अखिल भारतीय होते हे खरे असले, तरी त्यांचे कार्यक्षेत्र मुख्यत: महाराष्ट्र होते. आणि या महाराष्ट्राच्या विविध प्रादेशिक विभागांपैकी मराठवाड्यात जमीनदारी सर्वात अधिक मोठ्या प्रमाणात होती. तसेच भूमिहीन शेतमजूरांची संख्या आणि प्रमाणदेखील मराठवाड्यात आधिक आहे. या वस्तुस्थितीमुळे भूमिहीनांचा सत्याग्रह मराठवाड्यात सुरु होणे स्वाभाविक होते. मराठवाड्यातील दलित नेतृत्वास याचे भान होते. मराठवाड्यातील दलित जनतेचे नेते श्री.बी.एस. मोरे यांनी बाबासाहेबांना पत्र लिहून या प्रश्नाबद्दल

विचारले होते मोरे यांनी हा प्रश्न बाबासाहेबांच्या हयातीतच त्यांच्या व इतरांसमोर मांडला होता. बाबासाहेबांनी या प्रश्नात लक्ष घालण्याचे आश्वासन बी.एस. मोरे यांना देऊन या प्रश्नांवर मोठे आंदोलन उभारावे लागेल असे सूचित केले होते. दादासाहेबांनाही या प्रश्नाचे गांभीर्य तेव्हाच समजले होते. म्हणूनच त्यांनी भूमिहीनांच्या सत्याग्रहाला सुरुवात केली होती.

भूमिहीनांचे हे आंदोलन मराठवाड्यात सुरु होणे, जसे स्वाभाविक होते, तसेच या सत्याग्रहाचे नेतृत्व दादासाहेब गायकवाड यांनी करणेही स्वाभाविकच होते. कारण ग्रामीण भागातील दलितांच्या खऱ्या प्रश्नांची जाणीव त्यांनाच होती. भूमिहीनांना जमीन मिळावी म्हणून शे.का.फे.च्या वतीने औरंगाबाद जिल्ह्यात इ.स. १९५३ पासून श्री.बी.एस. मोरे वगैरे मराठवाड्यातील नेत्यांना बरोबर घेऊन दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली भूमिहीनांच्या पहिल्या टप्प्यातील सक्रिय सत्याग्रहाला सुरुवात करण्यात आली होती. त्यासाठी त्यांना प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. या वेळी जवळपास १ हजार ७०० आंदोलनकर्त्या कार्यकर्त्यांपैकी अकराशे सत्याग्रहींना पोलिसांनी अटक केली होती. नंतर त्यांची बिनशर्त सुटका करण्यात आली होती. विशेष म्हणजे अतिउत्साही काही सत्याग्रहींनी शाळांची मोडतोडसुध्दा केली होती. डॉ. आंबेडकरांना झालेल्या प्रकाराची माहिती समजताच त्यांनी सत्याग्रहींना बजावून सांगितले, ‘‘आपले ध्येय शेतीसाठी पडीत जमीन मिळावी हे असून शाळांची मोडतोड करणे नाही.’’[२६] तसेच डॉ. आंबेडकरांचा या सत्याग्रहाला पाठिंबा नाही असा प्रचार काही विरोधकांनी व शे.का.फे.च्या काही असंतुष्ट कार्यकर्त्यांनी विरोध करून हे आंदोलन बदनाम करण्याचा प्रयत्न केला होता. बाबासाहेबांनी याबाबीची गांभिर्याने दखल घेतली होती. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इ.स. १९५५ साली भूमिहीनांच्या सत्याग्रहाचा पुनरुच्चार उत्तर प्रदेशातील आग्रा येथील रामलीला मैदानावर भरलेल्या एका जाहीर सभेत करताना म्हणतात, ‘‘In 1955, when Dr. Ambedkar addressed a Public meeting at Ramleela Ground (Agra) he declared that henceforth he would devote his time and launch a movement for the land to the landless workers in rural areas, he asked them to occupy the 'Bazar Bhoomi' for cultivation and launch Satyagrah before collectorates for their legal possession. Dr. Ambedkar assured the people that he himself would be in the forefront and fight the cases in the court.’’[२७]

(''डॉ. आंबेडकर यांनी १९५५ मध्ये आग्रा येथील रामलीला मैदानावरील सभेत असे मत व्यक्त केले की, यानंतर मी ग्रामीण भागातील भूमिहीन कामगारांना जमीन मिळवून देण्यासाठी चळवळ सुरु करणार आहे. त्यांनी असा सल्ला दिला की, 'बजार भूमी' ही शेती करण्यासाठी ताब्यात घेण्यासाठी आणि कायदेशीर मालकी मिळविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांसमोर सत्याग्रह करावा. त्या सभेत डॉ. आंबेडकरांनी त्यांना असे आश्वासन दिले की, त्या सत्याग्रहाचे आणि न्यायालयीन खटल्याचे नेतृत्व मी स्वत: करेन.'')

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या वरील वक्तव्यावरुन ते भूमिहीनांच्या सत्याग्रहाला अनुकूल होते हेच दिसून येते. मराठवाड्यातील पडीक जमीन अस्पृश्यांना द्याव्यात, अशी मागणी घेऊन सत्याग्रह सुरु झाला. दादासाहेबांनी संपूर्ण मराठवाडा फिरुन या सत्याग्रहाची तयारी केली होती. शेकडो लोक रोज सत्याग्रह करुन तुरुंगात जात होते. इ.स. १९५७ साली रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली. या पक्ष स्थापनेच्या अधिवेशनातील चार ठरावांपैकी एक ठराव हा पडिक जमिनीच्या वाटपाचा होता. त्यानुसार इ.स. १९५८ मध्ये महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली पडिक जमिनी मिळाव्यात म्हणून सत्याग्रह करण्यात आले. शे.का.फे.च्या अनेक कार्यकर्त्यांना व सत्याग्रहींना तुरुंगात डांबून ठेवण्यात आले. एकट्या औरंगाबादच्या तुरुंगात त्या काळात तीन हजार सत्याग्रही होते. सत्याग्रहींनी माफी मागावी यासाठी सरकारने अनेक दडपणे आणली. प्रसंगी दादासाहेबांना, तुमचे लोक दंगा करीत आहेत, तर तो शांत करण्यासाठी चला, असे म्हणून रात्रीतून हरसूल जेलमधून पैठणच्या जेलमध्ये नेऊन तुमचा नेता पळाला असा प्रचार करुनही सत्याग्रहींनी माफी मागून आपली सुटका करुन घेतली नाही. या प्रसंगातून नेत्याबद्दलचा विश्वास व संघटनेवरील निष्ठाच दिसून येते. धुळे, नंदुरबार, नाशिक आणि मराठवाडा अशी भूमिहीन आंदोलनाची प्रचंड व्याप्ती होती. नाशिक व धुळे जिल्ह्यात त्याचा जोर अधिक होता. आंदोलनाच्या तयारीसाठी दादासाहेब गायकवाड यांच्या सोबतच क्रांतिसिंह नाना पाटील यांनीही महाराष्ट्रात ठिकठिकाणी सभा घेतल्या. दादासाहेब गायकवाड आणि बी.एस. मोरे यांच्यावर कायदेभंग करणारी भाषणे व चळवळी करण्याचा आरोप ठेवून त्यांना अटक करण्यात आली व त्यात त्यांना चार महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली होती.

मराठवाड्यातील या पहिल्या टप्प्यातील भूमिहीनांचा सत्याग्रह स्वातंत्र्योत्तर भारतातील एक नवीनच प्रयोग होता. इ.स. १९५० मध्ये तेलंगणातील सशस्त्र आंदोलन सरकारने चिरडून टाकले

होते. हैद्राबाद राज्यातच मराठवाडा असल्याने दादासाहेबांनी उभ्या केलेल्या या सनदशीर सत्याग्रहाचे गांभीर्य मोठे होते. यासाठी त्यांनी इ.स. १९५३ मध्येच मनमाड, औरंगाबाद, गंगापूर येथे मेळावे व ठिकठिकाणी सभा भाषणे करुन जनजागृती केली होती. या सत्याग्रहात मराठवाड्यातील कम्युनिस्ट पक्षाची मंडळीही सामिल झाली होती. त्याचबरोबर भूमिहीन असलेली महारेत्तर मंडळीही काही ठिकाणी सत्याग्रहात उतरली होती. मराठवाड्यातील सत्याग्रहातून दादासाहेबांचे नेतृत्व पुन्हा एकदा सिध्द झाले. त्याचबरोबर कम्युनिस्टांसारख्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांनाही आपल्या आंदोलनात सहभागी करुन घ्यावे इतका विश्वास इतर पक्षातील कार्यकर्त्यांचा कमवावा व त्यांनीही दादासाहेबांचे नेतृत्व मान्य करावे, ही आंबेडकरी चळवळीला एका जातीय वर्तुळाच्या पलीकडे नेण्याचे सामर्थ्य दादासाहेब गायकवाड यांच्याकडे होते हेच यातून दिसून येते.

### ३.५.२ महाराष्ट्रव्यापी भूमिहीनांच्या सत्याग्रहाचे नेतृत्व
### – इ.स. १९५८-५९ दुसरा टप्पा

भूमिहीन सत्याग्रहाचा दुसरा टप्पा हा १९५८ ते १९५९ या वर्षाचा आहे. हा टप्पा महाराष्ट्रापुरता मर्यादित आहे. दि. ३ ऑक्टोबर १९५७ साली नागपूरमध्ये रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली. औरंगाबाद येथे जे अखिल भारतीय रिपब्लिकन पार्टीचे दुसरे महत्त्वपूर्ण अधिवेशन भरले व त्यामध्ये शेतीसंबंधी केलेल्या क्रांतीकारक ठरावांची अंमलबजावणी करण्यासाठी दादासाहेब गायकवाड हे सारखे तळमळ करीत होते. शिवाजी पार्कवर मुंबई प्रदेश रिपब्लिकन पक्षाच्या वतीने भरलेल्या सभेत खा. दादासाहेब गायकवाड म्हणतात, ‘‘आम्ही जमिनीचे राष्ट्रीयीकरण करा, अशी मागणी करतो आहोत. काँग्रेसने समाजवादी समाजरचनेची ‘आवडी’ येथे घोषणा करुन लोकांना झुलवत ठेवले. नागपूर येथे ‘सहकारी शेतीचा ठराव करुन, जनतेला फसव्या मायाजाळांत ओढू पहात आहे. पण काँग्रेसच्या या सर्व घोषणा फसव्या असून, त्यातून जनतेचे व शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. म्हणून आम्ही औरंगाबाद येथे शेतजमिनीची सुधारणा करण्यासाठी क्रांतीकारक ठराव केला आहे... आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर आम्हाला वेळ आल्यास, लढा द्यावा लागेल.’’[२८] असा इशाराही त्यांनी दिला. रिपब्लिकन पक्षाने भूमिहीन लोकांच्या जमिनीसाठी आजपर्यंत अनेक अर्ज विनंत्या आणि जाहीरसभा भरवून महाराष्ट्र सरकारला या प्रश्नाची जाणीव करुन दिली. भूमिहीनांच्या न्याय्य मागणीकडे सरकार दिरंगाईचे धोरण

स्वीकारीत आहे. या विषयीचे विचार दादासाहेब गायकवाड यांनी आपल्या लढाऊ कृतीच्या भाषणात व्यक्त केले. इ.स. १९५९ ला भूमिहीनांच्या प्रश्नावर सत्याग्रह करण्याचा कृती कार्यक्रम एन. शिवराज, दादासाहेब गायकवाड इ. यांनी जाहीर केला. सरकार जवळील पडीक जमीन भूमिहीन लोकांना मिळावी या मागणीसाठी इ.स. १९५८-५९ साली हा सत्याग्रह मराठवाड्यात चालू झाला व तेच आंदोलन महाराष्ट्राच्या इतर भागातही सुरु झाले. अनेक ठिकाणी छोटे-मोठे सत्याग्रह सुरु झाले.

रिपब्लिकन पक्षातर्फे दि. २६ जुलै १९५९ रोजी दादासाहेब गायकवाड यांचे नंदुरबार येथे जाहीर भाषण झाले की, ''भूमिहीन लोकांना सरकारने फॉरेस्ट जमिनी न दिल्यास भूमिहीनांनी शांततापूर्ण सत्याग्रह करुन जमिनी ताब्यात घ्याव्यात.''[२९] असा आदेश त्यांनी आपल्या भाषणात दिला. त्यांचे हे भाषण म्हणजे भूमिहीनांच्या आगामी लढ्याचे रणशिंगच होते. दादासाहेब गायकवाड यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे पश्चिम खानदेशातील धुळे, साक्री, नरढाणा, शिंदखेड, नंदुरबार, शहादा येथील बहुसंख्य दलित, अस्पृश्य, बौध्द, आदिवासी, भूमिहीन शेतकरी, कोळी, भिल्ल इतकेच नव्हे तर मराठा, मुसलमान, धनगर इ. जमातीच्या भूमिहीन मजूरांनी त्या त्या ठिकाणी शेतीसाठी त्या जमिनीचा कब्जा घेण्याच्या घटनाबध्द शांततेच्या मार्गाने रिपब्लिकन पक्षाच्या वतीने, सत्याग्रहात खेड्यापाड्यातील असंख्य स्त्री-पुरुषांनी उत्साहाने भाग घेतला. त्यामुळे या भागातील हजारो लोकांना अटक करुन सरकारने शिक्षा दिली. धुळे येथील सेंट्रल जेल सत्याग्रहींनी पूर्ण भरुन गेला. सत्याग्रहींना मार्गदर्शन करण्यासाठी खा. दादासाहेब गायकवाड व क्रांतिसिंह नाना पाटील हे आघाडीवर होते.

पुढे या भूमिहीन सत्याग्रहाचे लोण नाशिक, नगर, ठाणे, पुणे इ. जिल्ह्यात पसरले. सरकार जोपर्यंत भूमिहीनांच्या मागण्या मान्य करणार नाही. तोपर्यंत लढा चालू ठेवून हजारो सत्याग्रही तुरुंगात जाण्यास तयार होते. सुमारे ५० हजार लोकांनी या सत्याग्रहात नावे नोंदविली आणि प्रत्यक्ष पडीक जमिनीवर सत्याग्रह करुन ३५ हजार लोक तुरुंगात गेले. हा सत्याग्रह म्हणजे दलितांच्या व भूमिहीनांच्या जीवन मरणाचा लढाच होता. ५० हजार भूमिहीन शेतमजूर, आदिवासी, बौध्द, मुसलमान, मराठा, धनगर, वखारी, माळी इ. जमिनीची सनदशीर मार्गाने मागणी करीत होते. पण सरकारने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. सदर सत्याग्रहाचे पडसाद लोकसभेत खा. दादासाहेब गायकवाड, डी.ए. कट्टी, जी.के. माने, इ. यांनी उमटविले. धुळे तुरुंगात जागा

नसल्याने अनेक सत्याग्रहींना विसापूर, अकोला, नाशिक जेलमध्ये पाठविण्यात आले. धुळे येथील जिल्हाधिकाऱ्यांनी विचार विनिमय करण्यासाठी सत्याग्रही नेत्यांना निरोप पाठविला होता. जर सरकार विचार विनीमयास तयार असेल तर आम्ही सत्याग्रह थांबविण्यास तयार आहोत. पण तसे नसेल तर हजारो सत्याग्रही तुरुंगात पाठविण्यास आमची तयारी आहे असे दादासाहेबांनी दौंडाई येथील जाहीर सभेत स्पष्ट केले व ते म्हणाले, ''मी सत्याग्रहात भाग घेण्यासाठी आलो आहे मीच सत्याग्रह सुरु करण्याचा आदेश दिला असूनही सरकार मला का पकडत नाही. याचे मला आश्चर्य वाटते व त्याबरोबर असेही वाटते की, आमच्या मागण्या रास्त असून त्या कायदेशीर आहेत. जर केंद्र व राज्य सरकारने आमच्या मागण्या नाकारल्यानंतर सत्याग्रह संपूर्ण राज्यात पसरेल.''[३०] असेही त्यांनी जाहीर केले.

यानंतर अहमदनगर, औरंगाबाद जिल्ह्यातही सत्याग्रहाचे लोण पसरले होते. खा. दादासाहेब गायकवाड हे दि. ११ ऑगस्ट १९५९ पासून सत्याग्रही आघाडीवर प्रत्यक्षपणे काम करीत होते. सत्याग्रह यशस्वी करण्यासाठी खा. दादासाहेब गायकवाड, आ.आर.डी. भंडारे, अशोक निळे, केशवराव कांबळे, नानासाहेब चव्हाण तसेच प्रजा समाजवादी, कम्युनिस्ट, शेतकरी, कामकरी, जनसंघ इ. पक्षाचे पुढारीही सहभागी झाले होते. या सत्याग्रहात कोणाच्या वैयक्तिक प्रतिष्ठेचा प्रश्न नाही. हा प्रश्न आपल्या ग्रामीण भागातील जनतेचा असून त्यांच्या दैनंदिन जीवनातील मुख्य प्रश्न भाकरीचा – पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठीच हा सत्याग्रह लढा आहे. या लढ्यात तांत्रिक मतभेद विसरुन आपली शक्ती जनतेच्या, भूमिहीनांच्या कल्याणासाठी खर्ची घालण्यासाठी म्हणून इतर पक्ष, कार्यकर्ते सत्याग्रहात उतरत होते.

वऱ्हाडातही पडीक जमिनी वसाहतीसाठी मिळावी यासाठी भूमिहीनांनी मागणी केली होती पण सरकारने त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे दि. २६ ऑगस्ट १९५९ पासून अकोला येथील भूमिहीनांच्या सत्याग्रहास हजारोंच्या संख्येने सुरुवात झाली. भूमिहीनांच्या शांततामय सत्याग्रह क्रांतीत गोर गरीब मोठ्या उत्साहाने भाग घेत होते. भूमिहीनांची सहनशीलता सुटली जात नव्हती. त्यांनी सत्याग्रहाच्या स्वरुपात एक अभिनव क्रांतीचा मार्ग निर्माण केला होता. भूमिहीनांची ही क्रांती शांततामय व लोकशाहीच्या मार्गाची होती. त्या सत्याग्रह क्रांतीचे स्वरुप आता व्यापक होत होते. अहमदनगर जिल्ह्यात पी.जे. रोहम यांच्या नेतृत्वाखाली भूमिहीन सत्याग्रहास दि. ५ सप्टेंबर १९५९ रोजी सुरुवात झाली. सोलापूर, पुणे, अहमदनगर, औरंगाबाद, अकोला, खानदेश या

प्रमाणेच कोकणातही कुलाबा, रत्नागिरी, ठाणे इ. या ठिकाणी भूमिहीनांच्या सत्याग्रहाचा वणवा पसरला होता. तसेच मराठवाड्यात दि. १४ सप्टेंबर १९५९ पासून मोठ्या प्रमाणात सत्याग्रहास सुरुवात झाली. सत्याग्रही कृतीसमितीच्या अध्यक्षा शांताबाई दाणी यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड संख्येने महिलाही सत्याग्रहात सामील झाल्या त्याचप्रमाणे दादासाहेब गायकवाड यांचे बंधु आप्पासाहेब गायकवाड यांनीही सत्याग्रहात प्रत्यक्ष कृतीसमितीचे नेतृत्व केले.

मुंबई राज्यात एकंदर ३५ लाख ३२ हजार ४०० एकर जमीन लागवडीखाली येण्यासारखी असून ती जमीन सध्या पडीक आहे. मुंबई राज्यात एकंदर ५९ लक्ष २० हजार भूमिहीन आहेत. या भूमिहीनांनी पडीक जमिनीसाठी आग्रह धरलेला आहे. म्हणून आमचा हा लढा संपूर्णपणे 'सत्याग्रह' आहे. आमचा लढा दडपून टाकण्यासाठी सरकारने कितीही प्रयत्न केला तरी न्याय आणि सत्य आमच्या बाजूस असल्यामुळे आमचाच विजय होणार हे निश्चित आहे. हा लढा केवळ लढ्यासाठी नसून हा लढा भूमिहीनांचा आहे. सरकार भूमिहीनांना पडीक जमिनी देत असेल तर आम्ही सरकारबरोबर खुली चर्चा करावयास तयार आहोत. मात्र पोकळ आश्वासनांवर हा सत्याग्रह मागे घेतला जाणार नाही, प्रत्यक्ष पदरात काही पडल्याशिवाय आम्ही मागे हटणार नाही असा आमचा निर्धार आहे. अशा प्रकारची भाषणे दादासाहेब गायकवाड आपल्या वेगवेगळ्या ठिकाणच्या सभेतून करीत असत.

आर्थिक गुलामगिरीमुळे होत असलेल्या पिळवणुकीने भारताच्या बहुसंख्य लोकांची राष्ट्रीयत्वाची भावना नष्ट झाली आहे. ''ज्यांना पाय ठेवायला टिचभरही जागा नाही, त्यांनी देशाचा स्वत: स्वाभिमान बाळगावा! उपवाशी पोटात राष्ट्राभिमान निर्माण होत नाही. म्हणून भारतीय बहुसंख्य जनता 'इंग्रज बरे' असे म्हणत आहे.''[३१] खऱ्या अर्थाने या देशातला प्रत्येक माणूस राष्ट्रप्रेमी निर्माण करावयाचा असेल तर त्या प्रत्येक व्यक्तीला जमिनीची मालकी द्यावयास हवी. आणि भूमिहीनांच्या सत्याग्रहाच्या माध्यमातून तेच घडवून आणावयाचे आहे. भूमिहीनांचा सत्याग्रह हा सरकार उलथून टाकण्यासाठी नसून तो भारतीय माणसात या राष्ट्रावर प्रेम करण्याची भावना निर्माण करण्यासाठी आहे.

तसेच दि. १७ सप्टेंबर १९५९ रोजी भुसावळ येथे दादासाहेब गायकवाड यांच्या पत्नी सीताबाई गायकवाड यांनी पाचशे महिलांच्या तुकडीसह सत्याग्रहाचे नेतृत्व केले. त्यात त्यांना अटक होऊन १५ दिवसांची शिक्षा पुणे येथील जेलमध्ये झाली. मुंबई राज्यातील सर्व तुरुंग

भूमिहीन सत्याग्रहींनी भरले होते. आणि काही लोक प्रत्यक्ष सत्याग्रहात भाग न घेता आर्थिक मदतही करीत होते.

मुंबई राज्याचे त्यावेळचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांच्या पुढे रिपब्लिकन पक्षाचे व भूमिहीनांच्या शिष्टमंडळाचे नेते खा. दादासाहेब गायकवाड यांनी व इतर नेत्यांनी भूमिहीनांच्या मागण्या पुढीलप्रमाणे मांडलेल्या होत्या.

**भूमिहीनांच्या मागण्या**

"१) सरकारी मालकीच्या सर्व जमिनी भूमिहीनांना देण्यात याव्यात.

२) ज्या जमिनी फॉरेस्टखाती नोंद असून, निरर्थक पडून आहेत, त्या शेती वहितास येण्यासारख्या असतील त्या सर्व जमिनी भूमिहीनांना द्याव्यात.

३) गायरानासाठी व ग्रामपंचायतीच्या ताब्यात असतील त्या जमिनी भूमिहीनांना द्याव्यात.

४) ज्या पडीक जमिनी किंवा जो जंगलाचा विभाग जमीनदारांच्या किंवा जमीन धारकांच्या ताब्यात वहितीसाठी दिलेल्या जमिनी भूमिहीनांना देण्यात याव्यात.

५) ज्या ज्या भूमिहीनांना निरनिराळ्या धोरणानुसार ज्या जमिनी दिल्या होत्या, व ज्या सध्या काढून घेण्यात आल्या आहेत, त्या जमिनी ज्यांच्या ताब्यातून काढून घेण्यात आल्यात, त्यांनाच त्या देण्यात याव्यात.

६) पडीक जमिनी मागणीसाठी, मुद्दाम एकत्र कुटुंबे विभक्त करुन, ज्या पडीक जमिनी देण्यात आल्या; त्यामुळे खऱ्या अर्थाने एकाच कुटुंबाच्या ताब्यात जास्त जमीन असेल तर त्या दिल्या गेलेल्या मूळ पडीक जमिनी परत काढून घेऊन भूमिहीनांना देण्यात याव्यात.

७) खळवडीच्या जमिनी भूमिहीनांना द्याव्यात.

८) पाटाच्या पाण्याखाली असलेल्या तसेच गाळपेर जमिनीचा लिलाव न करता भूमिहीनांना द्याव्यात.

९) ग्रामपंचायतीच्या ताब्यात असलेल्या पडिक जमिनी ग्रामपंचायतीचा अधिकार रद्द करुन भूमिहीनांना देण्यात याव्यात.

१०) मुंबई राज्यातील सर्व शेतमजूराला किमान वेतन कायदा लागू करावा. याशिवाय शेतमजूरांना जीवन वेतन द्यावे.

११) भूमिहीन मजूरांच्या राहणी व परिस्थितीची चौकशी करण्यासाठी कमिटी नेमावी.

१२) भूमिहीन मजूरांच्या वसाहती करण्यासाठी त्यांना 'सबसिडी' (मदत) सरकारने द्यावी.

१३) वरील मागण्यांच्या पूर्ततेसाठी व मागण्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी मामलेदार, सोशल वेल्फेअर व रिपब्लिकन पक्षाचा प्रतिनिधी अशांची एक कमिटी असावी.''[३२]

याप्रमाणे भूमिहीनांच्या मागण्या मुख्यमंत्र्यांना सादर केल्या व जाणिवपूर्वक जमिनीच्या बाबतीतली आकडेवारीही निवेदन करताना मांडली होती.

अन्नधान्याची व बेकारीची वाढती समस्या हाताळण्यासाठी भूमिहीनांना जमिनी देणे हाच एक योग्य पर्याय आहे. भूमिहीनांचा प्रश्न हा साधासुधा प्रश्न नसून तो एक राष्ट्रीय प्रश्न झाला आहे. रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून व दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली भूमिहीनांच्या पडीक जमिनीच्या सत्याग्रहात अस्पृश्य, बौध्द, आदिवासी, भिल्ल, कोळी, कोष्टी, कुणबी, माळी, मुसलमान इ. लोकांनी जात-पात, धर्म विरुन पोटतिडकीने सत्याग्रहात भाग घेतला होता. पडीक जमिनीच्या सत्याग्रहाने एवढा प्रचंड उठाव केला की, सत्याग्रहींना अटक केल्यावर किंवा शिक्षा झालेल्या सत्याग्रहींना अहमदनगर, भुसावळ, नाशिक, येरवडा (पुणे), धुळे, अकोला, मुंबई, पुणे, अमरावती, इ. जेलसुध्दा कमी पडले. सत्याग्रहींना बंदिस्त करण्यासाठी सिनेमागृहांचा उपयोग करावा लागला. यावरुन सत्याग्रहाचे व्यापक स्वरुप लक्षात येते व तेच सत्याग्रहाच्या यशाचे गमक व सरकारच्या पराभवाचे लक्षण होते.

अहमदनगर जिल्ह्यात १५,००० सत्याग्रहींना अटक करण्यात आली. धुळे येथील तुरुंगात ८०० सत्याग्रहींना खराब अन्न दिले गेले म्हणून दि. २१/०९/१९५९ पासून अन्न सत्याग्रह केला. धुळे जिल्ह्यात दररोज १५० सत्याग्रहींना अटक होत होती व तेथील सत्याग्रहींचा आकडा २५,००० पर्यंत गेला होता. ''पडित जमिनीसाठी महाराष्ट्रांत सुरु असेलला सत्याग्रह न्याय्य व रास्त आहे. भूमिहीनांना लागवडीसाठी पडित जमीन देणे ही आज देशाची निकडीची गरज आहे. भूमिहीनांचा प्रश्न ही देशाची समस्या आहे. भूमिहीनांचा सत्याग्रह हा राष्ट्रीय लढा आहे. भूमिहीनांच्या मागण्या मान्य होईपर्यंत पडित जमिनीचा सत्याग्रह मागे घेतला नाही.''[३३] अशा प्रकारचे उद्‌गार नागपूर नगर रिपब्लिकन पक्षाचे सरचिटणीस वासुदेव गाणार यांनी जाहीर सभेत बोलाताना काढले व नागरपूर परिसरात भूमिहीनांच्या सत्याग्रहाचे लोण पसरविले होते. दि. १ ऑक्टोबर १९५९ रोजी विदर्भात रिपब्लिकन पक्षाचे नेते आर.एस. गवई यांच्या नेतृत्वाखाली दोन

लाख भूमिहीनांचा सत्याग्रह झाला. नागपूर, अमरावती, मोर्शी, अचलपूर, चांदूर, यवतमाळ, पुसद, अकोला, अकोट, मुर्तीजापूर, बालापूर, बुलढाणा, चिखली, खामगाव इ. ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात सत्याग्रहास सुरुवात झाली.

इ.स. १९५४ साली मुंबई विधानसभेत जमीन वाटपाबद्दल विचारणा करण्यात आली होती. तेव्हा त्यावेळचे महसूल मंत्री यांनी सरकारी धोरणाची विचारपूस करुन उत्तर दिले की, ''मुंबई सरकारने दि. २० मे १९५४ या दिवशी जी.आर.एस.१०५३/५६२७ नंबरचा एक पडीक जमिनी वाटपाबाबतचा प्रस्ताव केला होता. त्यामध्ये ज्यांना अशा पडीक जमिनी दिल्या जाणार आहेत त्यांची यादी खालीलप्रमाणे नमूद केली आहे. १) मागासलेले लोक, जे स्वत: अंग मेहनतीने कसण्यासाठी विविक्षीत कराराने जमीन घेऊ शकतील. २) मागासलेले लोक, जे लोक खरोखर स्वत:च्या अंग मेहतीने चांगली जमीन कसतात, व ज्यांना कसण्यासाठी पुरेशी जमीन नाही.

. . . सन १९५४ मध्ये ज्या जमिनी वहितीकरीता यथायोग्य आहेत अशा जमिनी मागासलेल्या वर्गातील, श्रमजिवी लोकांना देण्याबद्दलची आश्वासने आणि वचने देणारे हुकूम आणि वटहुकूम मुंबई सरकारने सन १९५४ सालीच काढले होते.''[३४] ते हुकूम १९५९ पर्यंत कार्यान्वयीत न झाल्यामुळे भूमिहीनांना सत्याग्रह करणे भाग पडले. सरकारनेच भूमिहीनांना सत्याग्रह करण्यास भाग पाडले.

हा भूमिहीनांचा प्रश्न सोडविण्यासाठी मुंबई सरकारने हालचाली करायला सुरुवात केली होती. सत्याग्रहाचा प्रश्न सोडविण्यासाठी दि. १९/०९/१९५९ रोजीच्या वाटाघाटीत मुख्यमंत्र्यांनी सत्याग्रहामागील हेतू मान्य केला व सरकार हा प्रश्न सोडविण्यासाठी विचार करीत आहे असे स्पष्ट केले. भूमिहीनांच्या सत्याग्रहातून निर्माण झालेल्या दबावापोटी दि. १७ ऑक्टोबर १९५९ रोजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्याबरोबर भूमिहीन नेते व शिष्टमंडळास वाटाघाटी करण्यासाठी निमंत्रित केले. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, महसूल मंत्री रसिकलाल पारीख, वनमंत्री गाढे व समाजकल्याण मंत्री नाशिकराव तिरपुडे हे सरकारची बाजू मांडण्यासाठी तर खा. दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली बॅ. राजाभाऊ खोब्रागडे, आ. आर.डी. भंडारे, कु. शांताबाई दाणी, बी.एस. मोरे, पी.जे. रोहम, ॲड. शंकरराव खरात इ. मंडळी भूमिहीन सत्याग्रहींचा पक्ष घेऊन चर्चेस गेली होती. चर्चेतून सरकारने दि. १९/०९/१९५९ रोजीच्या भूमिहीनांच्या पुढील काही

''१) सर्व भूमिहीन सत्याग्रहींना कारागृहातून मुक्त करावे,

२) हुतात्म्यांच्या मृत्युची व औरंगाबाद जेलमधील मारहाणीची चौकशी करावी.

३) धरणाखाली किंवा अन्य संस्थाखाली ज्या जमिनी गेल्या असून त्यांची नुकसान भरपाईची रक्कम त्या त्या जमीन मालकाला द्यावी आणि चरितार्थासाठी जमीन देण्यात यावी.''[३५] अशा मागण्या या तडजोड घडवून मान्य केल्या गेल्या. महसूल खात्याचे उपमंत्री मधुकरराव चौधरी यांनी ''एका कुटुंबाला १० एकरापेक्षा कमी आणि १७ एकरापेक्षा जास्त जमीन दिली जाणार नाही.''[३६] असे घोषित केले आणि १५ जूनपर्यंत जमीन मिळेल असे जाहीर केले. दादासाहेब गायकवाड यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे डॉ. आंबेडकर यांच्या विचारांना प्रत्यक्ष रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून भूमिहीनांचा प्रचंड लढा देऊन सिध्द केले. या भूमिहीनांच्या सत्याग्रहात दादासाहेब गायकवाड यांनी रात्रंदिवस, पावसात, थंडी वाऱ्यात दौरे करुन भूमिहीनांच्या मध्ये प्रचंड उत्साह निर्माण केला. तसेच रिपब्लिकन पक्षाच्या व इतर पक्षाच्या नेत्यांनी सत्याग्रहात भाग घेऊन मार्गदर्शन केले त्यामुळे या सत्याग्रहाला तीव्र स्वरुप प्राप्त झाले व सत्याग्रही जनतेत प्रचंड उत्साह निर्माण झाला ही गोष्ट रिपब्लिकन पक्षाच्या व सत्याग्रहाच्या दृष्टीने अभिमानास्पद आहे.

दि. १७ ऑक्टोबर १९५९ रोजी रात्री मुंबई येथील भूमिहीन सत्याग्रही सर्वाधिकारी समितीची बैठक दादासाहेब गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली होऊन त्यात भूमिहीन स्त्री-पुरुष सत्याग्रहीचे, ज्या ज्या पक्षांनी सत्याग्रहाला पाठिंबा दिला, आर्थिक मदत दिली, सत्याग्रहाच्या बातम्यांची प्रसिध्दी दैनिकात दिल्याबद्दल, व भूमिहीनांच्या सत्याग्रहींच्या सर्व मागण्या मान्य केल्याबद्दल सत्याग्रह समितीने सर्वांचे आभार मानून भूमिहीनांचा सत्याग्रह थांबविण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. भूमिहीनांच्या मान्य झालेल्या मागण्याबाबत दादासाहेब गायकवाड यांना आलेले सरकारचे पत्र –

‘‘No.LND 3959/191900-AJ

महसूल खाते,

सचिवालय, मुंबई नं.१.

दि. २४ डिसेंबर, १९५९.

मे. डेप्युटी सेक्रेटरी टू गव्हर्नमेंट

ऑफ बाँबे, रिव्हीन्यू डिपार्टमेंट,

यांचेकडून –

श्री. बी. के. गायकवाड एम.पी.

१५ जनपथ, न्यू दिल्ली, यांना

विषय – भूमिहीनांना जमिनी देण्याबाबत.

तुमचे दि. १७ नोव्हेंबर, १९५९ चे वरील विषयाचे पत्र मिळाले. दि. १७ ऑक्टोबर १९५९ रोजी मुख्यमंत्र्यांना त्यांच्या निवासस्थानी रिपब्लिकन पक्षाचे शिष्टमंडळ आपल्या नेतृत्वाखाली भेटले. त्या दिवशीच्या बैठकीत झालेल्या कामकाजाची (Minutes) एक प्रत आपणाला पाठविली आहे.

आपला विश्वासू,

सही

फॉर डेप्यूटी सेक्रेटरी

टू. दी. गव्हर्नमेंट ऑफ बाँम्बे

रेव्हीन्यू डिपार्टमेंट.’’[३७]

इ.स. १९५९ ला महाराष्ट्र सरकारतर्फे ‘‘नागपूर विधानसभेत मंत्री बाळासाहेब देसाई यांनी ७० हजार पूर्वास्पृश्यांना, ३५ हजार एकर नवबौध्दांना व बाकीची 1 लाख ४५ हजार एकर जमीन अन्य भूमिहीनांना देण्यात आली.’’[३८] अशी माहिती दिली.

### ३.५.३ भूमिहीनांचा देशव्यापी सत्याग्रह व दादासाहेब गायकवाड – तिसरा टप्पा – इ.स. १९६४-६५

या महाराष्ट्रव्यापी भूमिहीनांच्या आंदोलनाचे गांभीर्य ओळखून सरकारने आश्वासन देऊन हा सत्याग्रह संपवला. परंतु आश्वासनांची अंमलबजावणी झालीच नाही. हा सर्व प्रकार

फसवेगिरीचा होता. प्रत्यक्ष भूमिहीनांच्या नावे जमिनी झाल्याच नाहीत. म्हणून निवेदने, चर्चा याऐवजी संघर्षात्मक पवित्रा घेण्याचा निर्णय दादासाहेब गायकवाड यांनी घेतला व या सत्याग्रहाची व्याप्ती भारतभर वाढवण्याचा निर्णय घेतला. ''कसेल त्याची जमीन, पण नसेल त्याचे काय?''[३९] या दादासाहेबांनी दिलेल्या मार्मिक घोषणेभोवती झालेल्या भूमिहीनांच्या या ऐतिहासिक सत्याग्रहात रिपब्लिकन पक्षाचे नेते अनेक वर्षानंतर एका वर्गीय एकजुटीत एकत्र आले. दादासाहेब गायकवाड, क्रांतिसिंह नाना पाटील, शामराव व गोदुताई परुळेकर, बी.एस. मोरे व इतर अनेकांनी या सत्याग्रहात लढाऊ संयुक्त योगदान दिले.

भूमिहीन सत्याग्रहाचा तिसरा टप्पा हा डिसेंबर १९६४ ते फेब्रुवारी १९६५ असा आहे. जमीनी वाटपाबाबत दि. ६ सप्टेंबर १९५४ ला बाबासाहेबांनी सरकारला एक योजना दिली होती. त्यात भूमिहीनांना सरकारी पडीक जमिनी द्या व त्या जमिनीवर दलितांचे पुनर्वसन करा. पुनर्वसनासाठी मिठावर कर बसवा. त्यापोटी येणारे वीस कोटी रुपये त्यांच्या कल्याणासाठी वापरा, अशा काही योजना होत्या. सरकारने त्याकडे फारसे लक्ष दिले नव्हते. दि. १५ मार्च १९५५ ला आग्रा येथे भूमिहीन सरकारी पडीक जमिनीचे कब्जे घ्यावेत, पुढे काय होईल ते पाहिले जाईल. असे जाहीर आवाहन केले हाते. ही मागणी सतत आंबेडकर चळवळीत केली जात होती. मराठवाडा व महाराष्ट्रव्यापी सत्याग्रहानंतर या मागणीसाठी देशपातळीवर सत्याग्रह करण्याचा दादासाहेब गायकवाड व रिपब्लिकन नेत्यांनी निर्णय घेतला.

सत्याग्रहाची व्याप्ती देशव्यापी करण्यासाठी दादासाहेब गायकवाड यांच्यासह अनेक नेत्यांनी उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, मध्यप्रदेश, गुजरात प्रांतात प्रचार दौरे काढले. सोबत पक्षाचे अध्यक्ष रावबहादूर एन. शिवराज व सेक्रेटरी बॅ. राजभाऊ खोब्रागडे इ. नेतेमंडळी होती. यानंतर रिपब्लिकन पक्षाच्या व्यासपीठावरून हा प्रश्न मांडण्यात आला. रिपब्लिकन पक्षाच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन घेऊन दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ दिनांक ७ मार्च १९६० ला महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना भेटले. या शिष्टमंडळात खा. दादासाहेब गायकवाड, खा. जी.के. माने, आ. आर.डी. भंडारे, आ. शिर्के, आ. लोंढे, नागपूरचे वासुदेवराव गाणार, आ. मधाळे, व केशवराव कांबळे हे नेते होते. या शिष्टमंडळाने जवळजवळ ४० मिनिटे चर्चा केली व खालील मागण्यांचे निवेदन देण्यात आले. त्या मागण्या अशा होत्या की,

" १) नागपूर येथील दीक्षा मैदानाची जागा अक्वॉयर करुन ताबडतोब आम्हास द्यावी.

२) भूमिहीन सत्याग्रहामुळे मुंबई सरकारने रिपब्लिकन पक्षाच्या मान्य केलेल्या मागण्यांप्रमाणे भूमिहीनांना ताबडतोब जमिनी वाटून देण्यात याव्यात.

३) बौध्दांना त्यांची आर्थिक बाब लक्षात घेऊन ताबडतोब पूर्वीच्या शेड्यूल्ड कास्टच्या सवलती जाहीर कराव्यात.

४) खानदेशात आदिवासी, मजूर शेतकऱ्यांवर तेथील शेतमालकांनी अत्याचार चालू केलेले आहेत ते दूर होऊन त्यांना संरक्षण मिळावे."[४०]

भूमिहीन शेतकऱ्यांना कसण्यासाठी जमीन देण्यात यावी ही मागणी अर्थात सर्व भूमिहीन शेतकऱ्यांच्या हितासाठी केलेली होती. तसेच खानदेशातील आदिवासी जमातींवर जमीनदार हे अत्याचार करीत असत. त्याविरुध्द शासनाने कार्यवाही करावी अशीही विनंती शासनाला करण्यात आली. वरील मागण्यांच्या पूर्तीसाठी पक्षाने अनेक लढे उभारले, पण सरकारने आश्वासनेच दिली. सवलतीचा प्रश्न जरी बौध्दांपुरता मर्यादित असला तरी भूमिहीनांना शेतीसाठी जमीन मिळावी या तळागाळातल्या लोकांच्या प्रश्नात रिपब्लिकन पक्षाने हात घालून शोषित व गरीब लोकांचे सर्वसमावेशक यशस्वी आंदोलन उभारले. दि. २५ व २६ नोव्हेंबर १९६१ रोजी उत्तर प्रदेशातील अलिगढ येथे भरविण्यात आलेल्या पक्षाच्या अधिवेशनात जे सात ठराव मंजूर करण्यात आले. त्यात चौथ्या क्रमांकाचा "भूमिहीन मजुरांना पडीक जमिनीचे वाटप करण्यात यावे."[४१] असा ठराव करण्यात आला होता. या अधिवेशनातील इतर ठरावही महत्त्वाचे होते. या ठरावाकडे बारकाईने पाहिल्यास हे सर्व ठराव देशाच्या व्यापक हिताच्या दृष्टिकोनातून किती महत्त्वाचे होते हे कळून चुकेल.

भूमिहीन शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांना स्वत:ची जमीन मिळवून देण्यासाठी रिपब्लिकन पक्षाने व दादासाहेब गायकवाड यांनी देशपातळीवर भूमिहीनांचा सत्याग्रह करण्याचे ठरविले. दि. २९, ३० जून व १ जुलै १९६३ ला रिपब्लिकन पक्षाच्या केंद्रीय कार्यकारणीत तसा निर्णय घेण्यात आला. ९ ऑगस्ट १९६३ ला या संघर्षाची सुरुवात झाली. सरकारला एक वर्षाचा कालावधी ९ ऑगस्ट १९६३ ते ९ ऑगस्ट १९६४ विचार व कृती करण्यासाठी दिला गेला. भारतीय रिपब्लिकन पक्ष ९ ऑगस्ट १९६३ रोजी संपूर्ण देशात 'निषेध दिन' पाळीत असून प्रत्येक जिल्ह्यात तहसील आणि शहरातून मोठमोठ्या प्रमाणात मोर्चे,

कमिशनर, कलेक्टर, तहसीलदार इ.च्या कचेरीवर जातील. शिष्टमंडळे जिल्हानिहाय मोर्चे काढून सुध्दा काहीही मिळत नाही हे पाहिल्यावर दि. ९ ऑगस्ट १९६३ रोजी मोठा मोर्चा विधानसभेवर नेला तसाच तो एकाचवेळी जिल्हा कलेक्टर व तालुका तहसील कार्यालयावरही नेण्यात आला. देशभरात अनेक ठिकाणी सरकारी कचेऱ्यांवर, प्रत्यक्ष वन जमिनीवर, कोर्टावर मोर्चे काढले गेले. त्यात लहान मुले, स्त्रिया, वृध्द या सर्वांचाच समावेश होता. या मोर्चाची मुख्य मागणी अर्थातच भूमिहीनांना न मिळालेल्या जमिनीचे वाटप करणे हेच होते. तसेच या मोर्चातल्या इतर मागण्या पाहिल्यावर रिपब्लिकन पक्ष हा सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नांशी कसा निगडीत होता हे लक्षात येते.

### ३.५.३.१ रिपब्लिकन पक्षाचा संसदेवर मोर्चा – दि. १ ऑक्टोबर १९६४

जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयावर नेलेल्या मोर्चाने सरकारवर काहीही परिणाम होत नाही हे लक्षात आल्यावर रिपब्लिकन पक्षाच्या केंद्रीय कार्यकारीणीने सर्व राज्यातून उठाव करुन भूमिहीनांचा मोर्चा संसदेवर न्यावा असे ठरले. तत्कालीन पंतप्रधान लालबहादुर शास्त्रींना मागण्यासंबंधीचे निवेदन दि. १ ऑक्टोबर १९६४ ला सादर करण्याचे ठरले. या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर कायदेभंगाची चळवळ करण्यात येईल. असा इशारा देणारे पत्र पक्षातर्फे प्रसिध्दीला देण्यात आले होते. एक ऑक्टोबरच्या मोर्चाची तयारी चालू होती. त्यानुसार दादासाहेब गायकवाड यांनी गुजरात, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल, तामिळनाडू, आंध्र, कर्नाटक या सर्व राज्यातून मोर्चाच्या प्रचारासाठी दौरा केला. ठिकठिकाणी मोर्चाच्या प्रचारार्थ सभा होऊ लागल्या. महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्ष मोठ्या प्रमाणात असल्यामुळे व महाराष्ट्रामध्ये रिपब्लिकन पक्षाचे दादासाहेब गायकवाड यांचे नेतृत्व मान्य झाल्यामुळे महाराष्ट्रातील भूमिहीनांच्या चळवळीचे नेतृत्व तेच करीत होते. भारतातील पद्दलितांचे प्रश्न सोडविण्यास कॉंग्रेस सरकार अयशस्वी झाले अशा मताचे दादासाहेब होते. मुंबई येथील नरेपार्कच्या सभेत दादासाहेब म्हणाले की, ''देशाला स्वातंत्र्य मिळाले, पण हे कसले स्वातंत्र्य, देश म्हणजे दगडधोंडे नव्हेत. या देशातील जनता म्हणजे देश, ही जनता सुखी समाधानी नसेल तर हे काय स्वातंत्र्य म्हणायचे''[४२] असा सवाल केला होता. दादासाहेबांनी व त्यांच्या सहकारी नेत्यांनी देशभर फिरुन मोर्चाचा प्रचार केला.

या देशव्यापी मोर्चाचा निर्णय ज्या दिवशी जाहीर झाला. त्याच दिवसापासून संबंध देशातील रिपब्लिकन बांधवामध्ये एक प्रकारचे उत्साहाचे वातावरण पसरले होते. रिपब्लिकन

पक्षाच्या इतिहासातील देशव्यापी स्वरुपाच्या चळवळीचे हे पाहिले पाऊल असल्यामुळे ह्या मोर्चाला एक आगळेच महत्त्व प्राप्त झाले होते. त्यामुळे प्रत्येकजण ''करु किंवा मरु'' अशा प्रकारच्या उत्साहाने कामाला लागला होता. इ.स. १९६४ च्या भूमिहीनांच्या सत्याग्रहाला केवळ रिपब्लिकन चळवळीतच नाही तर जागतिक पातळीवर ऐतिहासिक महत्त्व आहे. पक्षाच्या आजपर्यंतच्या राजकीय प्रवासातील ही महत्त्वपूर्ण कामगिरी म्हणावी लागेल. यापूर्वी या मागणीसाठी जरी महाराष्ट्र पातळीवर सत्याग्रह झाले, तरी या सत्याग्रहाची व्याप्ती वाढवून देशव्यापी आंदोलन उभारण्याचा पक्षाचा यशस्वी प्रयत्न होता. हा सत्याग्रह दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली झाला असला, तरी या सत्याग्रहाची पूर्व तयारी एन. शिवराज यांच्या मार्गदर्शनाखाली झाली होती. मोर्चाची तयारी बघण्यासाठी पक्षाध्यक्ष एन. शिवराज दिल्लीला दि. २८ सप्टेंबर १९६४ ला आले. दिवसभर त्यांनी सर्व पाहणी केली. दुसऱ्या दिवशी २९ सप्टेंबर हा त्यांचा वाढदिवस परंतु त्याचदिवशी त्यांचे दिल्लीत निधन झाले. कठिण प्रसंग निर्माण झाला होता कारण मोर्चा तर एक दिवसावर आला होता. त्याच दिवशी दादासाहेब व खोब्रागडे हे त्यांचे शव घेऊन मद्रासला गेले त्यांचा अंत्यविधी पूर्ण करुन लगेच दिल्लीला आले.

दिल्लीमध्ये कार्यकर्ते व भूमिहीन सत्याग्रही मोठ्या प्रमाणात जमल्यामुळे ठरल्याप्रमाणे दि. १ ऑक्टोबर १९६४ रोजी सकाळी ८.३० वा. लाल किल्ल्यावरुन मोर्चा निघाला. लोकसभागृहाच्या पूर्व बाजू समोरील मैदानात ही मिरवणूक दुपारी १२.०० वा. पोहचली. हा मोर्चा जवळजवळ ३ कि.मी. लांबीचा अभूतपूर्व अशा प्रकारचा होता या मोर्चात पंजाब, उत्तर प्रदेश, राजस्थान, बिहार, मध्य प्रदेश, सौराष्ट्र, गुजरात, महाराष्ट्र, म्हैसूर, आंध्र प्रदेश, मद्रास इ. सर्व प्रदेशातील कार्यकर्ते व भूमिहीन सत्याग्रही सामील झाले होते. विविध मागण्यांसाठी लोकसभेसमोर जोरदार निदर्शन केली व दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली राजाभाऊ खोब्रागडे, बी.पी. मौर्य इ. यांच्या शिष्टमंडळाने तत्कालीन पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांना खालील दहा मागण्यांचे निवेदन दिले.

सत्याग्रहातील दहा मागण्या अशा होत्या की,

''१) भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तैलचित्र पार्लमेंट सभागृहात लावले जावे.

२) देशातील जमीन कसणाऱ्यांनाच द्यावी.

३) पडीक जमिनीचे वाटप भूमिहीनांना करण्यात यावे.

४) अन्नधान्याचे पुरेसे वाटप करण्यात यावे आणि वाढत्या महागाईला आळा घालण्यात यावा.

५) झोपडपट्टीत राहणाऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारावी.

६) किमान वेतन कायदा – इ.स. १९४८ सर्व उद्योगांना लागू करण्यात यावा.

७) शेड्यूल्ड कास्टना जे हक्क व सवलती भारतीय घटनेत बहाल केल्या होत्या त्या नवबौध्दांना मिळाव्यात.

८) दलितांवर जे अत्याचार व अन्याय होत आहेत ते ताबडतोब थांबवावेत.

९) अस्पृश्यता निवारण कायद्याप्रमाणे अस्पृश्यांना पुरेसे संरक्षण मिळावे.

१०) शेड्यूल्ड कास्ट व शेड्यूल्ड ट्राईब्ज यांना नोकऱ्यात जागा राखून ठेवण्याचे काम इ.स. १९७० पर्यंत पूर्ण करावे.''[४३]

वरील मागण्यांचे निवेदन दिल्यानंतर मोर्चेकऱ्यांच्या समोर दादासाहेब गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. या मोर्चाचा परिणाम विरोधी पक्षाबरोबरच केंद्र सरकारवरही झाला होता. या आधी एवढा मोठा मोर्चा दिल्लीकरांनी कधीच पाहिला नव्हता. त्यावेळचे पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांना मागण्यांचे निवेदन देऊन दि. ६ डिसेंबर १९६४ पूर्वी आमच्या मागण्यांचा विचार झाला नाही तर देशभर सत्याग्रहाला सुरुवात होईल, असा इशारा देण्यात आला. या मोर्चातून १० मागण्यांचा खलिता पंतप्रधानांना देऊनही शासनाकडून पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांच्याकडून सहानुभूतिपुर्वक व ठोस आश्वासन न मिळाल्याने दि. ६ डिसेंबर १९६४ पासून या मागण्यांसाठी देशव्यापी सत्याग्रहाची घोषणा अध्यक्ष या नात्याने दादासाहेब गायकवाड यांनी केली.

वरील मागण्यांच्यासाठी डॉ. बाबासाहेबांच्या स्मृतीची जागृती ठेवून त्यांच्या महापरिनिर्वाण दिनापासून देशव्यापी भूमिहीनांच्या ऐतिहासिक सत्याग्रहाला दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली सुरुवात झाली. जमिनीच्या प्रश्नावर देशभर जेलभरो आंदोलन सुरु झाले. दररोज हजारो सत्याग्रहींची तुरुंगात भरती होऊ लागली. दादासाहेबांसह ५१ सत्याग्रहींची पहिली तुकडी तुरुंगात जाण्यास तयार झाली. हजारोंच्या सभेसमोर सत्याग्रहाची वैचारिक भूमिका विशद करुन दादासाहेबांनी राज्यपाल भवनाच्या समोर पहिला सत्याग्रह सुरु केला. त्यांना अटक केली गेली. मुंबई, नागपूर, विदर्भात २० हजार सत्याग्रहींना अटक झाली. रिपब्लिकन पक्षाच्या कृती समितीच्या आदेशानुसार

दि. ६ डिसेंबर १९६४ पासून देशव्यापी सत्याग्रहाचा लढा सुरु झाला. दररोज हजारो स्त्री-पुरुष आपल्याबरोबर लहान मुलांना घेऊन स्वखुशीने तुरुंगवास स्विकारीत होती.

देशव्यापी भूमिहीन सत्याग्रहाच्या चळवळीचा मुख्य जोर महाराष्ट्रात असला तरी त्याचे लोण इतर राज्यातही पसरले. महाराष्ट्राबरोबरच दि. ६ डिसेंबर १९६४ ला पंजाबमध्ये ४०० सत्याग्रही अटक झाले. त्यांचे नेतृत्व चननराम, श्री. बाली, अजितकुमार इ. नी केले. दिल्लीमध्ये ६,००० स्त्री-पुरुषांनी लोकसभागृहावर जाऊन सत्याग्रह केला त्यातच ''दिनांक ११ डिसेंबर १९६४ रोजी सिताबाई गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली १०० स्त्रीयांच्या तुकडीने सत्याग्रह केला.''[४४] उत्तरप्रदेशमध्ये डॉ. गौतम, डॉ. अब्दुल बशीरखान यांनी सत्याग्रहाचे नेतृत्व केले. कर्नाटकात दत्ता कट्टी, श्री. आर. मुगम यांनी नेतृत्व केले. मध्य प्रदेशात हरिश्चंद्र ऋषींनी जन आंदोलन घडवून आणले. गुजरातमध्येही भूमिहीनांचे मोर्चे परमार व गोविंद परमार यांनी आयोजित केले. आंध्र प्रदेशात रामनारायणणा विमुक्ता चनैय्या यांनी सत्याग्रह घडविला. तर तामिळनाडूमध्ये कृष्णस्वामी व श्रीमती मिनांबल शिवराज यांनी सत्याग्रहाचे नेतृत्व केले. सत्याग्रहात अटक केलेल्या सत्याग्रहींना तुरुंग कमी पडू लागले. जागे अभावी सिनेमागृहाचे तुरुंगात रुपांतर सरकारला करावे लागले. या सत्याग्रहात अखेरचा रिपब्लिकन सत्याग्रही तुरुंगात जाईपर्यंत हा सत्याग्रह चालूच राहणार, असे दादासाहेबांनी ठामपणे सांगितले.

सत्याग्रहाला जसजसा जनतेचा उत्स्फुर्त पाठिंबा मिळू लागला व हा सत्याग्रह जनताभिमुख बनू लागला. तसतशी सरकारची दडपशाही सुरु झाली होती. अवघ्या एक महिन्याच्या आत दीड लाख सत्याग्रहींनी देशव्यापी सत्याग्रहात स्वत: होऊन भाग घेतला व स्वत: अटक करुन घेतली. भूमिहीन सत्याग्रहींना तुरुंगात डांबून सत्याग्रह मोडून काढण्याचा प्रयत्न सरकार करीत होते. इतकेच नाही तर सत्याग्रहींशी घृणास्पद वर्तन, छळही केला जात होता. अशा प्रकारे सरकार, पोलिस व एकंदरच राज्संस्थेची दडपशाही सहन करीत, कधी त्याचा प्रतिकार करीत विविध राज्यांमध्ये स्त्री-पुरुष सत्याग्रही 'जेलभरो'त सहभागी होत होते.

जवळजवळ दोन महिने संपूर्ण देशात चाललेल्या या भूमिहीनांच्या सत्याग्रहात साडेतीन लाखापेक्षा अधिक लोकांनी सहभाग घेतला होता. सत्याग्रहात देशभरात जे अनेक ठिकाणी अनेक प्रसंगी मोर्चे निघाले, राज्यसंस्थेच्या महत्त्वाच्या केंद्रावर किंवा मागणीशी संबंधित कार्यालयावरही मोर्चे काढण्यात आले. दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली ६ डिसेंबर १९६४ रोजी निघालेला पहिला

मोर्चा हा राज्यपाल भवनावर होता, त्यानंतर मुंबई महानगरपालिका, मुंबई विद्यापीठ, सेवा योजन कार्यालय, सचिवालय, जिल्हाधिकारी कचेऱ्या, कोर्ट, कमिशनर ऑफिस इ.वर मोर्चे काढण्यात आले. अटक करवून घेण्यासाठी कार्यकर्त्यांत चढाओढ चालू होती. तुरुंग अपुरे पडू लागले. पोलिस यंत्रणा, व तुरुंगाची व्यवस्था कोलमडून पडली. सिनेमागृह भाड्याने घेऊन तेथे सत्याग्रहींना ठेवण्यात आले. तर काही सत्याग्रहींना तुरुंगात जागा नसल्यामुळे अटक न करता सोडून देण्यात आले. एक महिला जेलमध्ये बाळंत झाली. लहान मुलांसह महिलांनी स्वत:ला अटक करवून घेतली. ''ह्या सत्याग्रहात एकंदर १३ सत्याग्रही हुतात्मा झाल्याची नोंद आहे.''[४५] या सत्याग्रहात तीन महिन्याच्या बालकापासून ते ११० वर्षाच्या वृध्द स्त्री-पुरुषांनी तुरुंगवास भोगला तसेच गरोदर स्त्रियांनीही तुरुंगवास स्वीकारला होता. भूमिहीनांच्या या आंदोलनाची व्याप्ती खूपच मोठी होती. दोन महिन्यांत देशभरातील ३ लाख ४० हजार भूमिहीनांनी तुरुंगवास पत्करला. त्यात पुरुषांबरोबर स्त्रिया होत्या, तरुणाबरोबर म्हातारे व दलितांबरोबर सवर्णही होते. हा सत्याग्रह निर्धारपूर्वक व शांततेत पार पडला.

दि. २, ३, ४ जानेवारी १९६५ रोजी नागपूर मध्ये दादासाहेबांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीने सत्याग्रहासंदर्भात सहा ठराव मंजूर करण्यात आले, ''सत्याग्रहात मृत्युमुखी पडलेल्या सत्याग्रहीबद्दल दु:खवट्याचा ठराव, अटक केलेल्या सत्याग्रहींना मुक्त करण्याचा ठराव, सत्याग्रहींना तुरुंगात दिलेल्या वाईट वागणुकीचा निषेध व जोपर्यंत आजपर्यंतच्या सत्याग्रहाचा आढावा घेऊन मागण्या मान्य होईपर्यंत सत्याग्रह चालू ठेवण्याचाही ठराव पास झाला व राजकीय पक्ष, संघटना व सत्याग्रहाला नैतिक पाठिंबा त्यांच्या प्रती आभार व्यक्त करण्याात आले.''[४६]

रिपब्लिकन पक्षाने दि. ६ डिसेंबर १९६४ पासून आपल्या दहा मागण्यांच्या संदर्भात देशव्यापी सत्याग्रह करून सरकारपुढे एक मोठे संकट उभे केले. या सत्याग्रहाचा वाढता जोर व त्याचे व्यापक स्वरुप पाहिल्यावर सरकारला या बाबतीत वाटाघाटी करुन निर्णय घेणे भाग पडले. सत्याग्रह दडपण्याचे प्रयत्न सरकारने केले परंतु सत्याग्रहींच्या आत्मभानापुढे रिपब्लिकन नेत्यांशी चर्चा करण्याशिवाय सरकारला दुसरा पर्यायच नव्हता. रिपब्लिकन पक्ष नेतृत्वाबरोबर चर्चा ठरविली गेली. दि. ३० जानेवारी १९६५ रोजी वाटाघाटी सुरु झाल्या. या चर्चेला दादासाहेब गायकवाड, बी.पी. मौर्य, आ. आर. एस. गवई, भय्यासाहेब आंबेडकर, डी.ए. कट्टी, सुमंत गायकवाड इ. उपस्थित होते. सरकारच्या वतीने पंतप्रधान लालबहादूर शास्त्री, गृहमंत्री

गुलझारीलाल नंदा, यशवंतराव चव्हाण हे उपस्थित होते. या चर्चेत पाच मागण्या मान्य करण्यात आल्या व इतर मागण्यांच्या संदर्भात आश्वासन देण्यात आले.

दादासाहेबांनी सरकारशी झालेली चर्चा व मिळालेली आश्वासने जनतेपुढे मांडली. त्यांनी सांगितले, ''पडिक जमिनी भूमिहीनांना वाटण्याचे धोरण सरकारने तत्वत: मान्य केले आहे. डॉ. बाबासाहेबांचा पुतळा संसद भवनात १४ एप्रिल १९६५ रोजी लावण्याचे कबूल केले आहे. झोपडपट्टीवासियांना घरे देण्याचे मान्य केले आहे. अनुसूचित जातींच्या सवलती नवबौध्दांना देण्याचे मान्य केले आहे. भूमिहीनांना जमिनी वाटप करणे.''[४७] इत्यादी व इतर अनेक प्रमुख मागण्या मान्य केल्या. त्यामुळेच ३ व ४ फेब्रुवारी १९६५ रोजी अमरावती येथे रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकारणीतील बैठकीत सत्याग्रहाच्या संदर्भात सखोल चर्चा होऊन, ''मागण्या मान्य करुन त्या कार्यान्वित करण्याचे आश्वासन मिळाल्यामुळे सत्याग्रह आंदोलन ताबडतोब मागे घेत आहे.''[४८] असा ठराव करण्यात आला व दादासाहेब गायकवाड यांनी सत्याग्रह मागे घेतल्याची घोषणा केली.

हा भूमिहीनांचा सत्याग्रह सुरु करण्याआधी दादासाहेब गायकवाड, पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री यांना भेटले होते. हे नवीन नेतृत्व समजूतदार असेल अशी दादासाहेबांना अशा होती. पण या नेतृत्वाने भूमिहीनांच्या सत्याग्रहाची गांभिर्याने दखल घेतली नाही. या सत्याग्रहाच्या दोन महिन्याच्या कालावधीत ३ लाख ४० हजार भूमिहीन सत्याग्रह करुन तुरुंगात गेले या ३ लाख ४० हजार सत्याग्रहींची व्यवस्था करण्यासाठी त्यावेळचे महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांना एकवीस लाख रुपयांचे पुरवणी बजेट मंजूर करुन घ्यावे लागले. या तीन लाख ४० हजार सत्याग्रहींची संख्या पाहून पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री दादासाहेबांना म्हणाले, ''अरे यार, आप तो छुपे रुस्तम निकले। हम समझे दस बीस हजार आदमी जेल में जाएँगे। अपने तो कमाल कर दी।''[४९]

भारत आणि महाराष्ट्र सरकारने सत्याग्रहाला मिळालेला हा प्रचंड प्रतिसाद पाहून मागण्या मान्य करुन टाकल्या व दादासाहेबांना सत्याग्रह मागे घेण्यास सांगितले. परंतु या मान्य झालेल्या मागण्यांची अंमलबजावणी कधीच झाली नाही. इ.स. १९६५ ला भारत-पाक युध्द सुरु झाले व हा प्रश्न मागे पडला. परंतु हरिभाऊ पगारे यांनी लिहिलेल्या दादासाहेबांच्या चरित्राच्या प्रस्तावनेत या प्रश्नांच्या संदर्भात दादासाहेबांच्या क्रांतिकारी नेतृत्वाचे वेगळेपण नेमक्या शब्दांत विशद केले

आहे. ते म्हणतात, ''त्यांनी सामान्य माणसांसाठी दिलेला भूमिहीनांचा लढा तसाच अपूर्ण आहे. भारताच्या गरिबीचे आणि अस्पृश्यांवरील अत्याचारांचे मूळ या प्रश्नात आहे. हा प्रश्न सुटल्याशिवाय अस्पृश्यांचा कोणताच मूलभूत प्रश्न सुटण्याची सुतराम शक्यता नाही. या महापुरुषाने मुळालाच हात घातला होता.''[५०] दादासाहेब हे तळाला असणाऱ्या आणि विकासापासून खूप दूर असणाऱ्या अस्पृश्य जनतेचे नेते होते. त्यांच्या चळवळीचे अग्रक्रम म्हणूनच सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून ठरविले जात असत. भूमिहीन सत्याग्रहाच्या अपूर्व यशाबद्दल सांगताना दादासाहेब म्हणायचे की, ''भूमिहीनांच्या सत्याग्रहात कोणताही शांतता भंग अथवा हुल्लडबाजी वा हिंसा झाल्याची घटना घडली नाही. सर्व राजकीय पक्षांनी या सत्याग्रहाचे यासाठी खूप कौतुक केले, हेच या सत्याग्रहाचे अपूर्व यश आहे आणि भारताच्या इतिहासात या लढ्याचे स्थान गौरवास्पद व वैशिष्टयपूर्ण राहील, यात शंका नाही.''[५१] हेही अभिमानाने दादासाहेब सांगत असत.

### ३.५.४ आदिवासी भूमिहीनांच्या वनजमिनीचा प्रश्न व दादासाहेब गायकवाड

आदिवासी भूमिहीन हे परंपरेने अनेक वर्षांपासून वनजमिनीवर शेती करुन उपजिवीका भागवतात. परंतु नंतरच्या काळात सरकारने वनखाते निर्माण केले व आदिवासींना अतिक्रमणदार ठरविले. पीक मोठे झाले की सरकार या पिकांची नासाडी करते अशा या सरकारच्या धोरणाचा दादासाहेबांनी निषेध केला. त्यांच्या मते, ''या देशातील गोरगरीब भूमिहीन सरकारी पडीत अगर फॉरेस्टची जमीन लागवडीस आणून स्वत:चा चरितार्थ कसाबसा चालवतात. त्यातही सरकारने विध्वंसक धोरण आखले आहे. सरकारने या वर्षी असे लागवडीस आणलेल्या प्लॉटमध्ये नागली, भात पेरली असता सरकारी धोरणानुसार फॉरेस्ट खात्याचे कर्मचारी व अधिकारी प्लॉटमध्ये जाऊन पिके तोडून टाकतात, उपटून फेकतात व फावड्याने खणून काढतात. तेवढेच नव्हे तर त्या जमिनीत झाडे वाढविणे करता तागाचे बी टाकतात, ही बाब सरकारला शोभणारी नाही.''[५२]

आदिवासी भूमिहीनांच्या शेतीची नासाडी म्हणजे केवळ पिकांचे उध्वस्तीकरण नाही तर त्यांचे जीवनच उध्वस्त करण्यासारखे आहे. म्हणूनच दादासाहेब या संदर्भात गृहमंत्री बाळासाहेब यांना ठणकावून सांगताना सरकारने पिके उध्वस्त करण्यासाठी खास शाखा काढण्याचा निषेध ते तीव्र शब्दांत करताना म्हणतात, ''वहित जमिनीतील पिके फॉरेस्ट खात्याने खास शाखा काढून पिकांचा नाश करण्यासाठी नेमून हजारो लोकांची पिके, गुरे घालून चारणे, पोलिसांच्या मोटारी

भरभरुन खेड्यापाड्यांतून हातातोंडाशी आलेली पिके फावड्याने उखडून टाकणे व पिकांचा नाश करणे ही बेबंदशाही नाही का? बाळासाहेब खेर हे आपणास माहित आहे का?''[५३] असा सवाल ते करतात. सरकारकडे भूमिहीनांना देण्यास जमीन नाही का? याबाबत दादासाहेब स्पष्ट करतात की, ''देशात १० कोटी एकर जमीन पडित आहे. ती भूमिहीनांना वाटली पाहिजे. तसेच फॉरेस्ट प्लॉटच्या जमिनीची जी नासाडी आरंभली आहे ती थांबवून सरकारने आपले धोरण बदलावे.''[५४] असा इशाराही देतात आणि उपस्थित आदिवासी भूमिहीनांना सरकारचे धोरण न बदलल्यास कायदेभंगाची चळवळ करण्याचा मार्गही सुचवितात.

दादासाहेबांनी सरकारच्या वनधोरणाचे हेतू, वन अधिकाऱ्यांचे वर्तन स्पष्ट करुन दाखविले ते वनधोरण आजही बदलले आहे असे दिसत नाही. देशातील जंगल जमिनीवर शेती करुन उपजिविका करणाऱ्या व जंगल जमिनीवर घरे बांधून राहणाऱ्या लाखो आदिवासी कष्टकऱ्यांना त्यांच्या जमिनीतून व घरातून हाकलून ती जमीन विदेशी कंपन्यांच्या घशात घालण्याचा डाव सरकारने आखला आहे. आदिवासी या देशाचे मूळ रहिवासी आहेत, सरकार व फॉरेस्ट खाते हे नंतरचे आहेत. तरीही या मूळ रहिवाशांनाच अतिक्रमणदार ठरवून बेदखल केले जात आहे. दादासाहेबांनी त्या काळात सुरु केलेली लढाई नव्या स्वरुपात आजही चाललेली दिसते. यावरुन त्यांचा दूरदृष्टीपणा दिसून येतो. वनखात्याच्या भ्रष्टाचाराचा, दडपशाहीचा दादासाहेबांनी प्रतिकार केला. वनखाते खऱ्या अर्थाने वनसंरक्षक-संवर्धक नाहीच असे म्हटले होते. झाडे तोडून जमिनी लागवडीखाली आणायच्या नाहीत अशी भूमिका त्यांनी घेतली होती. आजही आदिवासी भूमिहीन घोषणा देतात, ''झाडे आम्ही तोडत नाही, जमिनी आम्ही सोडत नाही.'' वनखात्याकडे झाडे लागवड करुनही जमीन शिल्लक असल्याचे दादासाहेबांनी स्पष्ट केले होते.

दादासाहेबांनी फॉरेस्ट खात्याची भूमिहीन आदिवासी विरोधी धोरणे धिक्कारली होती व पुढे जाऊन सत्याग्रहाची, कायदेभंगाची भूमिका घेतली. दादासाहेब गायकवाड यांचा हा वैचारिक व कृतीशील वारसा आज पुढे जात आहे. याचा अर्थ दादासाहेबांनी सुरु केलेला भूमिहीनांचा सत्याग्रह आजही देशव्यापी स्वरुपात करण्याची गरज आहे. कारण आज जागतिकीकरणाच्या युगात जमिनीच्या प्रश्नाला भांडवलदार वर्ग गंभीर रुप देत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या कचाट्यात आदिवासी भूमिहीन अडकणार आहेत. तेव्हा दादासाहेबांनी सुरु केलेला भूमिहीनांचा लढा नव्या परिस्थितीत अधिक धारधार पध्दतीने लढवावा लागेल.

## सारांश


एकंदरीत भारतीय इतिहासातील भूमिहीनांचा सत्याग्रह हा अनन्य साधारण अशा प्रकारचा होता. परंतु या भूमिहीनांच्या सत्याग्रहाने या देशातील भूमिहीन शेतमजूरांची समस्या संपली असे समजण्याचे काहीच कारण नाही. ही मात्र वास्तविकता आहे की, ह्या सत्याग्रहाने काही ठिकाणी भूमिहीनांना अतिरिक्त ठरलेल्या जमिनीचे, पडीक जमिनीचे व जंगल जमिनीचे वाटप झाले आहे. प्राचीन भारताच्या इतिहासापासूनची शेतजमिनीच्या वाटपातील विषमता दादासाहेब गायकवाड यांच्या ह्या एका प्रयत्नातून संपेल असे समजण्याचे काहीच कारण नाही. एक मात्र खरे की, ह्या सत्याग्रहाने ह्या देशातील जमीनदारांच्या हितसंबंधांना, आधुनिक भारताच्या इतिहासात पहिले निर्णायक आव्हान दिले. ह्या देशात काही विशिष्ट वर्गाच्या सामाजिक आणि आर्थिक हितसंबंधांना आव्हान करण्याचे धैर्य, सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवले. दादासाहेब गायकवाड यांनी शेतजमिनीच्या विषम वाटपाच्या मुद्याला अविस्मरणीय अशी चालना दिली.

या देशातील उत्पादन साधनांची विषम वाटणी दलितांना आर्थिकदृष्ट्या पंगू बनविते. म्हणून ते जमिनीच्या फेरवाटपाची व पुनर्रचनेची मागणी भूमिहीनांच्या आंदोलनातून उभी करतात. देशातील जमीन व अन्य महत्त्वाच्या उद्योगांवर मूठभर लोकांचीच मक्तेदारी राहू नये म्हणून ते जमिनीचे व अन्य महत्त्वाच्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्याची मागणी करतात. बाबासाहेबांचा आर्थिक पुनर्रचनेचा विचार दादासाहेबांनी भूमिहीनांच्या लढ्यातून व्यवहारात आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

भूमिहीनांचा सत्याग्रह करताना सर्व प्रकारच्या शोषित घटकासंदर्भात ते भूमिका घेतात. हा लढा काही विशिष्ट जाती-जमाती करीता नव्हता. तो सर्व जमातीतील भूमिहीनांसाठी होता. भूकेच्या वेदना ह्या कांही जमातीच्याच नाहीत तर त्या सर्वांच्याच आहेत. पोटातील भूक सर्वांना सारखीच जाळते. म्हणून आदिवासीपासून ते दलित बहुजन भूमिहीनांचे आंदोलन उभे करतात आणि त्यामागील एक ऐतिहासिक पार्श्वभूमी सुध्दा मांडतात. महात्मा फुले व डॉ. आंबेडकरांनी जमिनीच्या मालकीच्या संदर्भात जे विश्लेषण केले आहे त्या विश्लेषणाशी दादासाहेबांचे विचार सुसंगत आहेत. तसेच धार्मिक सत्ताही कशा प्रकारे आर्थिक शोषण करते याची जाणीव त्यांना होती. म्हणून जमिनीच्या प्रश्नावर संघर्षात्मक कार्यक्रम हाती घेऊन घोषणा करतात की, ‘‘कसेल त्याची जमीन,

नसेल त्याचे काय?'' असा प्रश्न उपस्थित करुन सर्व दलित, आदिवासी, कष्टकरी, भूमिहीन मग तो कोणत्याही जाती धर्माचा असो त्यांना भूमिहीनांच्या लढ्याच्या मैदानात उतरवितात.

दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या भूमिहीनांच्या लढ्याचे वैशिष्ट्ये म्हणजे हा सत्याग्रह केवळ एका जातीगटापुरता, प्रदेशापुरता, पक्षापुरता मर्यादित न राहता व्यापक बनला होता. राष्ट्रीय पातळीवर संघर्षात्मक आंदोलन या कालखंडात उभे राहिले होते. सत्याग्रहामुळे जनतेचे प्रबोधन झाले. जमीन मालकीच्या संदर्भात जातवर्गीय वास्तव देशापुढे आले. भिल्ल, आदिवासी, कोळी, दलित, इतर मागास सर्वच कष्टकरी समूह संघर्षासाठी सिध्द झाला होता. दादासाहेबांनी जातीविरोधी सांस्कृतिक लढ्याला जमिनीच्या प्रश्नाचे परिमाण देऊन देशातील शोषित व शोषक जातीवर्गाचे स्वरुप व संघटन सत्याग्रहातून उघडे केले.

खरे तर त्यांचा सत्याग्रह केवळ वर्ग संघर्ष नव्हता तर जातीवर्ग संघर्ष होता. कारण ह्या सत्याग्रहामागील भूमिका, तात्विक बैठक पाहिली तर एकीकडे दादासाहेब जमीन मालकीतील जातीय विषमता सांगत होते तर दुसरीकडे काम देण्याचा, किमान वेतनाचा मुद्दा एका बाजूला पिण्याच्या पाण्याचा व अस्पृश्यता पाळल्याची जाणीव करुन देतात. जमीनीचा प्रश्न व बौध्दांना राखीव जागा देण्याची मागणी एकाच वेळी घेऊनही सर्व जातीच्या भूमिहीनांना त्यांनी बरोबर घेतले. काँग्रेसचा 'एका जातीचा लढा' हा आरोप त्यांनी परतवून लावून तो केवळ विविध जातींना आर्थिक प्रश्नावर एकत्र आणण्याचा संघटन कौशल्याचा फक्त भागच नसून सैध्दांतिक बैठकीचा तो एक परिपाक होता हे दिसते. म्हणून जी.डी. तथा बापू लाड म्हणतात की, ''बलुतेदारीच्या विश्वसनातून जीवन व्यवसायाच्या समस्येचा नवा विचार करणे क्रम प्राप्त होते आणि दादासाहेबांनी काळाची गरज हेरली. 'भूमिहीनांना जमीन' ही चळवळ पक्षाचा कार्यक्रम म्हणून स्वीकारली. . . . आणि आम्ही केवळ श्रमशक्ती असलेले स्वतंत्र भारतीय आहोत, आमच्या श्रमशक्तीला श्रमसाधन द्या, जमीन द्या, हे राजकारण पुढे येत होते, दादासाहेबांच्या पुढाकाराने ते पुढे आणले . . . भूमिहीनांच्या भूमी मागण्याच्या चळवळीला सर्व पक्षीय स्वरुप प्रामुख्याने महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर आले. त्याचे श्रेय दादासाहेबांनाच द्यावे लागेल.''[५५]

दलित चळवळ केवळ भावनेवर, चिड संतापावर उभी नाही. भौतिक लढा संघटित करण्याचे ऐतिहासिक उत्तरदायित्व ह्या भूमिहीनांच्या सत्याग्रहाच्या निमित्ताने दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली सिध्द झाले. दलित-बहुजन जनतेने विशेषत: स्त्रियांनी अत्यंत लढाऊ बाणा या

सत्याग्रहात दाखविला. या भूमिहीन सत्याग्रहीनी १ लाखाचा मोर्चा संसदेवर नेला व नंतर ३ लाख ४० हजार लोकांना अटक झाली. परंतु या देशातील तुरुंगही अपुरे पडू लागले. म्हणजे या सत्याग्रहाने जनतेत किती मूळ धरले होते हे त्यातून स्पष्ट होते. कष्टकरी-भूमिहीन जनतेच्या जातवर्गीय जाणिवांच्या विकासाचा व लढाऊपणाचा स्तर उंचावण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सत्याग्रहामुळे झाले. नामदेव ढसाळांच्या मते हा सत्याग्रह म्हणजे, ''अस्पृश्यांच्या मुक्तिलढ्याला त्यांनी मुख्य प्रवाहात नेण्याचा प्रयत्न करुन या लढ्याला वर्गीय जाणीव देण्यासाठी इ.स. १९६४-६५ साली भूमिहीनांचा देशव्यापी सत्याग्रह केला. संसदबाह्य क्रांतीकारक राजकारणात पक्षाला उतरविण्याचे दादासाहेबांचे कार्य भारतीय समाजाच्या वर्ग संघर्षाच्या इतिहासात सोनेरी अक्षरांनी लिहावे लागेल.''[५६]

सत्याग्रह सुरु असतानाच दादासाहेब संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातही सक्रीयपणे सहभागी होते. एकाच वेळी दोन अत्यंत महत्त्वाच्या जनआंदोलनाचे ते नेतृत्व करीत होते. भूमिहीनांची मागणी तत्वत: मान्य केली पण जमिनी वाटल्या नाहीत. ज्या मागण्या नवबौध्दांच्या अस्मितेवर उभ्या होत्या त्याची पूर्तता सरकारने केलेली दिसून येते. नागपूरच्या दीक्षाभूमीची १४ एकर जमीन ताब्यात मिळाली. दीक्षाभूमीबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पूर्णाकृती तैलचित्र संसदेत उभा करण्याची मागणी पूर्ण करण्यात आली. या दोन मागण्या व्यतिरिक्त कसणाऱ्याला जमिनी, किमान वेतन कायदा, झोपडपट्टी-वासियांची आर्थिक सुधारणा, अनुसूचित जाती-जमातीचे नोकऱ्यातील प्रमाण भरणे इ. मागण्या आजही 'मागण्याच' राहिल्या आहेत. म्हणजे केवळ सांस्कृतिक अस्मितेच्या मागण्याच सरकारने मान्य केल्या. परंतु अजूनही भूमिहीनांना न दिलेली जमीन अशा जमिनीची बेरीज खूप मोठी आहे. या जमिनी कसून देशाच्या संपत्तीत भर घालू शकणारे आणि स्वत:चे जीवनमान उंचावू शकणारे कोट्यावधी भूमिहीन आहेत म्हणून या प्रश्नांची व्याप्ती व उपयुक्तता प्रचंड आहे. क्रांतिसिंह नाना पाटील, कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्यासारख्या ग्रामीण, गरीबांसाठी संघर्ष करु शकणाऱ्या नेतृत्वाची आजही गरज आहे.

दलित चळवळीच्या माध्यमातून भूमिहीनांचा प्रश्न राजकारणाच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न करणे हे दादासाहेबांचे योगदान आहे. त्यामुळे भूमिहीन ह्या संकल्पनेची देशातल्या राजकारणाला नोंद घ्यावी लागली. दादासाहेबांच्या राजकीय वाटचालीचा एक चांगला परिणाम या सत्याग्रहाच्या निमित्ताने दिसून आला. अलग पडलेल्या रिपब्लिकन चळवळीला त्यांनी या

सत्याग्रहाच्या निमित्ताने पुन्हा एकदा बाबासाहेबांनतर मुख्य केंद्रस्थानी आणले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सहभाग व नेतृत्वामुळे काँग्रेसेत्तर पक्षांचा पाठिंबा या चळवळीला मिळविण्यात ते यशस्वी झाले. एक सजग राजकीय नेता म्हणून या भूमिहीनांच्या सत्याग्रहातून दादासाहेबांचे खंबीर नेतृत्व पून्हा एकदा जनतेसमोर आले.

भूमिहीनांच्या लढ्याला त्यांनी जे राजकीय महत्त्व दिले त्यावरुन त्यांचा दलित मुक्तीकडे पाहण्याचा समग्र दृष्टीकोन दिसून येतो. जातिव्यवस्था नष्ट करण्यासाठी 'भूमिसुधारणेचा लढा' करण्याची मूलभूत गरज आहे. याचे नेमके आकलन दादासाहेबांना झाले होते. दादासाहेब गायकवाड यांच्या भूमिहीनांच्या सत्याग्रहांनंतर गेल्या पंचेचाळीस वर्षात ह्या देशातील सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थितीत आमुलाग्र परिवर्तन झाले आहे. त्यामुळे आज भारतीय जनतेच्या विकासाची वाट मोकळी करणारा 'भूमिसुधारणेचा लढा' झाल्याशिवाय दलित गरीब जनतेची सर्वच प्रकारच्या जुलूमांतून कधीच मुक्तता होणार नाही.

## संदर्भ ग्रंथ


१) निर्मलकुमार फडकुले, रावसाहेब कसबे व इतर (सं.): कर्मवीर दादासाहेब गायकवाड: काल आणि कर्तृत्व, पृष्ठ - १५२ (लेख – यादवराव कांबळे – दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरतील दादासाहेब)

२) वसंत मून, हरी नरके व इतर (सं.): डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड – १८ भाग – १, पृष्ठ – ४२, ४३

३) धनंजय कीर: डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, पृष्ठ – २४२

४) कित्ता: पृष्ठ – २६९, २७०

५) कित्ता: पृष्ठ – २९७

६) कित्ता: पृष्ठ - ३०६

७) कित्ता: पृष्ठ – ३०८

८) वसंत मून, हरी नरके व इतर (सं.): डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड – १८ भाग – २, पृष्ठ – ६२

९) कित्ता: पृष्ठ – २८३ ते २८५

१०) कित्ता: पृष्ठ – ४१६

११) शंकरराव खरात (सं.): डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे, पृष्ठ – ३२८

१२) शंकरराव खरात: अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम, पृष्ठ – १९०

१३) धनंजय कीर: कित्ता, पृष्ठ – ४०४

१४) प्रबुध्द भारत: दि. २६-१२-१९५९, पृष्ठ – १

१५) प्रबुध्द भारत: दि. १३-०२-१९६०, पृष्ठ – ७

१६) प्रबुध्द भारत: दि. २६-१२-१९५९, पृष्ठ – १

१७) प्रबुध्द भारत: दि. २४-१०-१९५९, पृष्ठ – १

१८) कित्ता: पृष्ठ – १

१९) प्रबुध्द भारत: दि. २२-०८-१९५९, पृष्ठ – १

२०) कित्ता: पृष्ठ – ५

२१) प्रबुध्द भारत: दि. २४-१०-१९५९, पृष्ठ – १

२२) प्रबुध्द भारत: दि. २६-०९-१९५९, पृष्ठ – ५

२३) प्रबुध्द भारत: दि. ०३-१०-१९५९, पृष्ठ – १

२४) प्रबुध्द भारत: दि. २६-०९-१९५९, पृष्ठ – ५

२५) निर्मलकुमार फडकुले, रावसाहेब कसबे व इतर (सं.): कित्ता, पृष्ठ - १६२

२६) शरणकुमार लिंबाळे (सं.): रिपब्लिकन पक्ष वास्तव आणि वाटचाल, पृष्ठ – ९२ (लेख – तुकाकेचे – रिपब्लिकन पक्ष आणि भूमिहीनांचा सत्याग्रह)

२७) कित्ता: पृष्ठ – ९३

२८) भाऊ लोखंडे (सं.): कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची भाषणे, खंड – १, पृष्ठ – ४१, ४२

२९) भाऊ लोखंडे: डॉ. आंबेडकरी सत्याग्रह, पृष्ठ – १३३

३०) प्रबुध्द भारत: दि. २२-०८-१९५९, पृष्ठ – १

३१) भाऊ लोखंडे: कित्ता, पृष्ठ – १४१, १४२

३२) प्रबुध्द भारत: दि. २६-०९-१९५९, पृष्ठ – १

३३) प्रबुध्द भारत: दि. ०३-१०-१९५९, पृष्ठ – २

३४) कित्ता: पृष्ठ – ३

३५) प्रबुध्द भारत: दि. २४-१०-१९५९, पृष्ठ – ३

३६) प्रकाश जंजाळ: भूमिहीनांचा सत्याग्रह, पृष्ठ – ७

३७) भाऊ लोखंडे: कित्ता, पृष्ठ – १५४

३८) प्रबुध्द भारत: दि. ३०-०१-१९६५

३९) प्रबुध्द भारत: दि. २२-०८-१९५९, पृष्ठ – ५

४०) प्रबुध्द भारत: दि. १२-०३-१९६०, पृष्ठ – १

४१) रा.का. क्षीरसागर: भारतीय रिपब्लिकन पक्ष, पृष्ठ – १४०

४२) प्रबुध्द भारत: दि. २६-०९-१९६४, पृष्ठ – २

४३) भावना भार्गवि: पद्मश्री दादासाहेब गायकवाड, पृष्ठ – २३३

४४) प्रबुध्द भारत: दि. १३-१२-१९६४, पृष्ठ – १

४५) निर्मलकुमार फडकुले, रावसाहेब कसबे व इतर (सं.): कित्ता, पृष्ठ – १६६

४६) प्रतिमा परदेशी: योध्दा जनसत्याग्रही दादासाहेब गायकवाड, पृष्ठ – ४५

४७) ज.वि. पवार: आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, खंड – २, पृष्ठ – १४०

४८) प्रतिमा परदेशी: कित्ता, पृष्ठ – ४६

४९) हरिभाऊ पगारे: दादासाहेब गायकवाड: जीवन व कार्य, पृष्ठ – २८९

५०) कित्ता: पृष्ठ – २६

५१) भूषण गगराणी व इतर (सं.): लोकराज्य – कर्मवीर दादासाहेब गायकवाड विशेषांक – ऑक्टोबर – २००१, वर्ष – ५३, अंक – ९, पृष्ठ – ३० (लेख – तुकाराम रणशूर – बहुजन हिताय: बहुजन सुखाय)

५२) प्रबुध्द भारत: दि. १५-०८-१९६४, पृष्ठ – ८

५३) भाऊ लोखंडे (सं.): कित्ता, पृष्ठ – २०७

५४) प्रबुध्द भारत: दि. १५-०८-१९६४, पृष्ठ – ८

५५) रमेश शिंदे (सं.): कर्मवीर दादासाहेब गायकवाड, पृष्ठ – ८१ (लेख – जी.डी. तथा बापू लाड – कर्मवीर)

५६) कित्ता: पृष्ठ – ११५ (लेख – नामदेव ढसाळ – अस्पृश्यांच्या संग्रामातील दादासाहेबांचे पर्व)

## प्रकरण चौथे

# दादासाहेब गायकवाड यांच्या

# कार्याचे विविध पैलू

# प्रकरण चौथे

# दादासाहेब गायकवाड यांच्या कार्याचे विविध पैलू

## प्रास्ताविक

विसाव्या शतकातील सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतील महत्त्वाचा भाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दादासाहेब गायकवाड या गुरु-शिष्य जोडीने व्यापला आहे. डॉ. बाबासाहेबांच्या प्रबोधन चळवळीतील अग्रगण्य नेता, त्यांची प्रत्येक मोहीम तेवढ्याच ताकदीने यशस्वी करुन जनाधार सांभाळणारा व लोकसंपर्क नियमित ठेवणारा कर्तव्यकुशल संघटक, कोणत्याही कारणांसाठी स्वतःच्या घरादाराची व प्रकृतीची काळजी न करणारा बलाढ्य पण धीरगंभीर पुरुष, कोणत्याही कठीण प्रसंगी गुरु-शिष्यांच्या पवित्र नात्यात किंचितही दुरावा निर्माण न होऊ देणारा आदर्श शिष्य आणि खांद्यावर घेतलेले कार्य पूर्ण होईपर्यंत त्यापासून दूर न जाणारा कार्यकर्ता, लोकसेवक, लढवय्या, जीवनशैली, दूरदृष्टीचा नेता, लोकनेता, उत्कृष्ट प्रशासक, निष्ठावान सहकारी, आंबेडकरी चळवळीचा सरसेनापती, भूमिहीनांचा आधारवड, अशी अनेक रुपे कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या जीवनकार्यातून आपणाला दिसून येतात.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनपटाचा शोध घेतला तर ते वैयक्तिक आणि खाजगी जीवनात प्रापंचिक असले तरी चार भिंतीच्या आतल्या प्रपंचात ते कधी अडकून पडले नाहीत. दादासाहेबांनी जनसेवेचे प्रभावी माध्यम म्हणून राजकारण केले. त्यांनी आपल्या नावावर कुठेही स्थावर मालमत्ता जमवून ठेवलेली नाही. या मानवमुक्तीच्या संघर्षात त्याग आणि आत्मसमर्पणाच्या भावनेने स्वयंस्फूर्तीने त्यांनी उडी घेतलेली होती. या संघर्षात त्यांनी आपलं स्वतःचं स्थान निर्माण करण्याचा कधीही जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला नाही. ते निष्ठेने आणि कर्तव्य भावनेने या मानवमुक्तीच्या संघर्षात अखंड कार्यरत राहिले. म्हणून दलितमुक्तीचे व भूमिहीनांच्या सत्याग्रहातील लढाऊ संघर्षाचे प्रणेते म्हणून कार्याचा शोध घेतला तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आपल्याला दिसून येतात.

## ४.१ आदर्श लोकनेता व लोकसेवक

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सानिध्य आणि त्यांचा विचार आत्मसात करून लोकमाणसात रुजविणे आणि तो प्रत्यक्ष कृतीरुप कसा होईल यासाठी सतत पराकाष्टा करणे हे दादासाहेबांनी आपले जीवित कार्य मानले होते. दादासाहेब हे बाबासाहेबांसारखेच एखाद्या आंदोलनाची पार्श्वभूमी

तयार करीत. त्यासाठी कार्यकर्त्यांशी विचारविनिमय करीत. सभासंमेलनातून लोकमत तयार करीत. त्यासाठी लोकसंवाद हे सूत्र त्यांनी आपल्या अंगी बानविले होते. मुळातच हा रांगडा शेतकरी होता. बेणे तयार करणे, ऊस लावणे, औताची कामे करणे, प्रसंगी जीवावर बेतणाऱ्या प्रसंगांची, रक्तपाताची पर्वा न करता, जीवनभर लोकांना दिलेली वेळ व सोपविलेले कार्य निग्रहाने पूर्णत्वास नेणारा असा लोकनेता होय.

दादासाहेब हे जनसामान्यांचे नेते होते. त्या काळात दादासाहेबांनी प्रसारासाठी व प्रचारासाठी वैचारिक भूमी सिध्द करण्यासाठी पायपीट केली होती. योजना आणि विचार बाबासाहेबांचे आणि कृती दादासाहेबांची. ते विचार खेड्यापाड्यात पोहचविण्याचे काम दादासाहेबांनी करायचे. ऊन, वारा, पाऊस, डोंगरदऱ्या कशाचीही पर्वा त्यांनी केली नाही. बाबासाहेबांचे विचार खेड्यापर्यंत पोहचविणे हेच जीवनाचे कार्य त्यांनी ठरविले होते. दुर्लक्षित अशा मजूर, पिडीत, कष्टकरी, शेतकरी, भूमिहीन शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे आणि दलितांच्या अनेक दुर्लक्षित हक्कांकडे शासनकर्त्यांचे लक्ष वेधून घेणारे खरेखुरे कर्मवीर होते. मानवमुक्तीच्या चळवळीसाठी सिध्द झालेल्या प्रचंड गर्दीत त्यांचे व्यक्तिमत्व अधिकच उठून दिसायचे. डोक्यावर निळी टोपी, धोतर, पायात गावठी चपला आणि चेहऱ्यावर स्नेहाचे हास्य भाव दिसे. बाबासाहेबांच्या या विश्वासू कर्मवीराने त्यांच्याकडून आलेला नेतृत्वाचा, समाजकार्याचा, सोशिकतेचा आणि समंजस समन्वयाचा वारसा समर्थपणे पेलला नाही तर त्याचा योग्य विस्तार करुन कार्यकक्षा वाढविली व पक्षाचा आणि स्वत:चाही दबदबा निर्माण केला. कवी ‘अरुण काळे’ हे ‘बडादादा’ या आपल्या कवितेत दादासाहेबांच्या संपूर्ण जीवनकार्याचा वेध घेताना म्हणतात, ‘’

‘‘माऊंट एव्हरेस्टसारखी उंच
तुझी निळी टोपी
तुझा अनगड बाज अन् धोतर
खटकलेले ब्रेन लोकांना
वस्ताद भीमरावांनच ओळखलं तुला
तुझ्यातल्या लोकनेत्याला
तुझ्या अलौकिक बौध्दिक क्षमतेला
रांगड्या लढवय्याला

मग तू केल्यास काटा कुस्त्या
सभागृहात आणि रस्त्यात
बाणगंगेचे पाणी दावून भल्याभल्यांना
चवदार पाण्याच्या लढाईत प्रकट झाला
तुझ्यातला सेनापती
तत्वाच्या अधिष्ठानाच्या एक लढ्यातून
दुसरा लढा निर्माण व्हावा
तसे काळाराम, मुखेड, पर्वती आणि
तुझ्या कर्तृत्वाचा कळस गाठलेली
जमिनीची लढाई
जी फक्त नव्हती खाण्यापिण्याची
ती लढाई संस्कृतीची
म्हणून तुझी तुलना होऊ शकते
चिनी लाँगमार्चवाल्यांशी
व्हिएतनामच्या लढवय्या शेतकऱ्यांशी
बदाम पिस्ते खाणाऱ्या शेळीच्या दुधावर
पोसलेला नव्हतास तू संत
गुळ, शेंगदाण्याच्या ऊर्जेवर लोकरानं
तुडवत गेलेला तू कर्मयोध्दा
गरीब, दुबळ्यांजवळ, शेतकरी, मजुरांजवळ
मांडी घालून बसणारा
जीभ लडखडत नाही
तुला मासलिडर म्हणताना
तू एक-दोन कवितांत आटोपणारा
विषय नाहीस
तू महानायक महाकादंबरीचा

तू बुध्दाचा आनंद

घरादाराच्या लोभावर, विकारांवर

विजय मिळवून गेलेला.''[१]

अत्यंत साधा कांदा-भाकरीचा आहार घेणारा हा नेता एक कपभर चहाची सुध्दा अपेक्षा ठेवीत नव्हता. सातत्याने सामान्य माणसांशी संपर्क, बाबासाहेबांच्या मार्गदर्शनामुळे प्रश्न समजून घेण्याची धडपड, कार्यकर्त्यांवर जिवाभावे प्रेम करण्याची वृत्ती यामुळे दादासाहेबांनी आपले आयुष्य अनुभवी व समृध्द बनविले. त्यांच्यात व सामान्य माणसांत कधी अंतर पडले नाही. अशिक्षित, खेड्यापाड्यातील जनतेचे व त्यांचे सुत फार लवकर जुळत असे. कारण त्यांच्याच भाषेत त्यांना कठिणातील कठिण प्रश्न सोपे करुन समजून देण्याची हातोटी दादासाहेबांना साधली होती. त्यामुळे जनतेला ते आपलेसे वाटत असत. दादासाहेबांचे सगळ्यात विलोभनीय रुप म्हणजे 'मास-लीडरचे' होय. ते सर्वसामान्य जनतेचे नेते होते. सामान्य माणसाला हाक देऊन त्यांना सार्वजनिक लढ्यासाठी उभे करण्याचे मौलिक सामर्थ्य त्यांच्या शब्दांत होते. महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह किंवा १९३० चा नाशिकच्या काळाराम मंदिराचा प्रदीर्घ सत्याग्रह असो त्यात त्यांची धडाडी आणि कर्तृत्व दिसून तर येतेच परंतु १९६४ साली भूमिहीनांचा जो विराट देशव्यापी सत्याग्रह झाला, ज्यात तीन लाख, चाळीस हजार सत्याग्रही तुरुंगात गेले. धुळ्यामध्ये तर सत्याग्रहींना ठेवण्यासाठी थिएटर भाड्याने घ्यावे लागले हाते. हा सत्याग्रह म्हणजे दादासाहेबांच्या जीवन कार्यकर्तृत्वाच्या शिरपेचातील मानाचा तुरा आहे. या एकाच आंदोलनाने दादासोबांची 'लोकनेता' ही प्रतिमा अधिक स्पष्ट होत जाते.

दलित राजकारणाला दिशा व गती देणाऱ्या अनेक नामवंत नेत्यांशी दादासाहेबांचे स्नेहाचे, जिव्हाळ्याचे संबंध होते. नाशिक परिसरातील सगळ्या पिढीच्या लोकांना दादासाहेब घरचेच वाटायचे. सर्व पक्षांच्या नेत्यांशी त्यांचे संबंध असले तरी आपल्या पक्षनिष्ठेला व भूमिकेला त्यांनी कधीही बेगडी स्वरुप येऊ दिले नाही. त्यांच्या समंजस, उपरोधपूर्ण, मिश्किल, ग्रामीण शैलीमुळे लोकांवर प्रभाव पडायचा. त्यामुळे त्यांच्याबद्दल सर्वच नेत्यांनी अखेरपर्यंत कृतज्ञतेची व आदराची भावनाच व्यक्त केली आहे. त्यामध्ये पंतप्रधानांपासून ते मुख्यमंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक, ग्रामसेवक, पोलिस पाटील इ. ते सर्व जातीधर्माच्या कार्यकर्त्यांपर्यंत त्यांच्या कार्याची पोचपावती देताना दिसतो. राष्ट्रीय पातळीवरच्या नेत्यांशी ज्या सहजतेने, शालिनतेने बोलत त्याच

पध्दतीने ते खेड्यापाड्यातून आलेल्या गरीब, सामान्य माणसांशी बोलत. स्वभावातील मृदूता, विचारांची कणखरता आणि सर्वसामान्य जनतेच्या सुख-दुःखाशी समरसता ही दादासाहेबांच्या स्वभावांची ठळक वैशिष्टये होती. म्हणून यशवंतराव चव्हाण, दादासाहेबांना श्रध्दांजली वाहताना म्हणतात, ''लोकनेता या शब्दाला साजेसे त्यांचे जीवन होते. असंख्यांचे त्यांच्यावर प्रेम होते. अखिल भारतीय राजकारणातील प्रमुख नेते त्यांचा शब्द आदराने ऐकत होते. प्रश्नासंबंधीचा जिव्हाळा व कळवळ यामुळे ते मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांमध्ये आपले विषय सुलभतेने मांडीत व त्यामुळे ते परिणामकारक होत असत. एक साधा मनुष्य प्रखर निष्ठा, दलितांबद्दलची कळकळ, अन्यायविरुध्द चीड, मनुष्य स्वभावाचे अचूक निदान, प्रेमाने माणसे सांभाळण्याची कला यामुळे केवढे उत्कृष्ट स्थान स्वत:साठी निर्माण करु शकतो, याचे दादासाहेब गायकवाड उत्तम उदाहरण होते.''[२] यावरुन दादासाहेबांचे व्यक्तिमत्व किती प्रगल्भ होते याचीच प्रचिती येते.

सामान्यातून असामान्यत्व ज्या ज्या लोकांनी प्राप्त केले आहे त्या सर्वांच्या मालिकेत कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे स्थान अग्रस्थानी व आदाराचे आहे. त्यांच्या संपूर्ण आयुष्यात प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देऊन त्यावर मात करण्याचा जीवन संघर्ष दादासाहेबांच्या जीवनात आपणाला पहायला मिळतो. या संदर्भात राज्यपाल रा.सू. गवई आपल्या लेखात म्हणतात, ''त्यांच्या जीवनाची निष्ठा, कष्ट व त्याग हीच खरी त्रिसूत्री आहे. निष्ठा, कष्ट व त्याग या त्रिसूत्रींचे समर्पित जीवन म्हणजेच कर्मवीर दादासाहेब गायकवाड. यातच त्यांच्या जीवनाचे मर्म आहे.''[३] म्हणून समाजाला वाहिलेले एक समर्पित जीवन म्हणून कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या जीवनसंघर्षाचा इतिहास हा आदर्श म्हणून पुढील पिढीसमोर राहील.

## ४.२ कुशल संघटक व उत्कृष्ट वक्ता

अस्पृश्य बांधवांची गुलामगिरीतून मुक्तता करण्याचे डॉ. बाबासाहेबांचे कार्य दादासाहेबांनी अगदी कष्टाने आणि हिंमतीने पुढे नेले. बाबासाहेबांच्या दलित मुक्तीसंग्रामाचे दादासाहेब सरसेनापती होते. त्यांनी दलितांच्या हक्कांचा संदेश खेड्यापाड्यातील तळागाळतील लोकांपर्यंत पोहचवून सर्व समाज जागृत केला व सर्व लोकशक्ती संघटित करून हक्कासाठी कृतीशील बनविले. साधा पोशाख असणाऱ्या दादासाहेबांची भाषा ही सर्वसामान्य माणसांच्या मनाचा वेध घेणारी होती. दादासाहेब जाहीर सभेत भाषण करु लागले की त्यांच्या भाषणाला तलवारीची धार येत असे. त्यांची आपल्या कार्यावरील प्रखर निष्ठा, अन्यायाविरुध्द चीड, दलित, मजूर, कष्टकरी,

भूमिहीन यांच्यासाठी धडपड करण्याची वृत्ती यामुळे ते सर्वसामान्य माणसांना आपलेच वाटत असायचे. या संदर्भात तुकाराम रणशूर म्हणतात, ''मनुष्य स्वभावाची अचूक पारख आणि प्रेमाने माणसे जोडण्याची कला यामुळे उत्स्फुर्तपणे कर्मवीर दादासाहेबांना मानाचा मुजरा केला जातो.''[४] लोकनेता म्हणून दादासाहेबांचा मोठा सन्मान होऊन सुध्दा त्यांनी आपल्या अंगी गर्व येऊ दिला नाही.

कवी सोपानदेव चौधरी एकदा विनोदाने दादासाहेबांना म्हणाले की, ''दादा तुमचे जन्मगाव 'आंबे' आणि बाबासाहेबांचे जन्मगाव 'आंबावडे' त्यांचे वाक्य पुरे होण्याच्या आतच दादासाहेब म्हणाले, 'तुम्ही म्हणता ते अगदी खरं आहे. पण बाबासाहेब म्हणजे हापूस आंबा आणि मी तर रायवळ आंबा. रायवळ आंब्याने हापूस आंब्याशी बरोबरी करु नये.''[५] दादासाहेबांनी मोठेपणा कधीच स्वीकारला नाही. अंगी आलेले थोरपण बाजूला करणे हा त्यांचा स्थायीभाव होता. एक झुंजार नेता, कुशल संघटक आणि उत्कृष्ट संसदपटू म्हणून दादासाहेब जसे महान होते तसेच माणूस म्हणून त्यांची थोरवी मोठी होती. त्यांनी सामाजिक कार्यकर्त्यांसाठी स्वत:च्या आचरणातून नवे आदर्श निर्माण केले. चळवळीचा प्रचार व प्रसार करीत असताना, गावोगावी फिरताना गोरगरीब, दलित, पिडीत कार्यकर्त्यांना आपल्या पाहुणचाराची झळ लागू नये म्हणून 'पाठीमागच्या गावातून मी जेवण करुन आलोय' असे म्हणत आणि पुढे कुठेतरी वाटेत नदी काठी स्वत:च्या जवळ असणाऱ्या शेंगा-गूळ किंवा भाकरी खात असत. ही त्यांची कार्यपध्दती जीवाला चटका लावणारी होती.

समाज परिवर्तनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शब्द न शब्द गोरगरीबांच्या, दलित-पिडीतांच्या घराघरापर्यंत दादासाहेबांनी पोहोचविला. ''आपल्या बांधवांना 'जयभीम' बोलण्याचा प्रघात दादांनीच प्रथमत: सुरु करुन''[६] भीमशक्तीच्या माध्यमातून भीमशक्ती जागृत ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य दादासाहेब गायकवाड यांनीच केले.

बाबासाहेबांच्या चळवळीला व्यापक स्वरुप प्राप्त करुन दिले. दादासाहेब हे कुशल संघटक होते. त्यांनी महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह किंवा येवला परिषद असो या सर्व घटना यशस्वी करण्यासाठी दादासाहेबांनी दलित समाजातील शेवटच्या घटकापर्यंत जाऊन जनशक्ती संघटित केली. त्यामुळे येवला परिषदेला लाखोच्या संख्येने दलित समाज उपस्थित राहिला. तसेच दादासाहेबांनी बाबासाहेबांच्यानंतर दलितांची

चळवळ टिकवली, वाढवली आणि प्रभावी तर केलीच शिवाय या चळवळीत समाजातील अन्य उपेक्षित घटकांना सहभागी करून घेतले. दलित चळवळ कोणा एका विशिष्ट जातीची न करता सर्व दुर्बल घटकांची बनवण्यावर त्यांनी भर दिला. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर त्यांनी केलेले भूमिहीनांचे विराट आंदोलन हे त्याचेच एक प्रतिक आहे. बाबासाहेबांच्यानंतर पोरक्या झालेल्या दलित समाजाला संघटित करून दिशा व दृष्टी देण्याचे काम दादासाहेबांनी अत्यंत निष्ठेने व सोशिकपणे केले.

कोणत्याही लढ्यासाठी हृदयाची भाषा लागते ती दादासाहेबांच्या वक्तृत्वातून सर्वसामान्य माणसाच्या हृदयावर जाऊन थडकत होती. त्यामुळे सामान्य माणूस क्रांतीसाठी मनाच्या तयारीने दादासाहेबांच्या चळवळीत सामील होत असे व त्यांचे सामर्थ्य वाढत असे. सर्वसामान्य कार्यकर्त्यांना सांभाळून घेण्याची, त्यांच्या अडीअडचणी समजून घेण्याची कला दादासाहेबांना प्राप्त झाली होती. म्हणूनच त्यांना कार्यकर्त्यांचे जाळे मोठ्या प्रमाणात निर्माण करता आले. या संदर्भात वि.वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) आपल्या श्रध्दांजली लेखात म्हणतात, ''लोकांशी इतका एकरूप झालेला नेता मी तरी दुसरा पाहिला नाही. डॉ. आंबेडकरांच्या शिकवणुकीवर कर्मवीरांची अपार श्रध्दा तर होतीच, पण शिवाय हा प्रकाश खेडोपाडी, घरोघरी, झोपड्याझोपड्यांतून पोचविण्याची एक असामान्य ताकद त्यांच्या ठिकाणी होती आणि म्हणूनच दादासाहेबांबरोबर पुष्कळच काही गेले आहे.''[७] यावरून त्यांची सर्वसामान्य माणसांच्या जीवनाशी नाळ किती व्यापक जोडली गेली होती हे दिसते. भूमिहीनांच्या सत्याग्रहाच्या माध्यमातून त्यांनी समग्र समाज भाकरीसाठी रस्त्यावर उतरविला. त्यातूनच त्यांच्या उत्कृष्ट संघटन कौशल्याची, उत्कृष्ट वक्तृत्वाची, नेतृत्वाची आणि कर्तृत्वाची प्रचिती येते. डॉ. नरेंद्र जाधव आपल्या लेखात दादासाहेबांच्या वक्तृत्वाविषयी म्हणतात, ''दादासाहेबांचे वक्तृत्व अमोघ होते. त्यांच्या वाणीत ओज होते. वाक्यांच्या फेकीत हृदयाचा ठाव घेणारी ऋतुजा तर कधी घणाणते सामर्थ्य. उपरोधाला कधी तलवारीची लखलखती धार तर कधी वक्रोक्तीची धगधगती आग. बोली भाषेतील म्हणी किंवा गावरान जीवनातील दृष्टांत देऊन आपला मुद्दा सर्वसामान्य माणसांना पटवून देण्याचे कसब तर केवळ अलौकिक!''[८]

दादासाहेब एका सभेत भाषण करीत असताना एका काँग्रेसच्या कार्यकर्त्याने त्यांना प्रश्न केला की, भारतात काँग्रेस ही गरिबाची संस्था असताना तुम्ही दलितांसाठी निराळा पक्ष का स्थापन केला? दादासाहेब लगेच म्हणाले, ''जोड्यात खिळा कुठे रुततो हे जोडे घालणाऱ्याला अधिक

कळते. बाळांतणीच्या वेदना तिलाच समजतात. वांझोटीला त्या वेदनांची काय कल्पना येणार? तेव्हा दलितांची दु:खे काय आहेत, हे इतर पक्षापेक्षा आमचा पक्षच चांगला समजू शकतो.''[९] यातून त्यांची समाजाप्रती असणाऱ्या वेदनांची जाणीव किती खोल रुजली होती हे दिसते.

अहमदनगर येथील बौध्द साहित्य संमेलनात कुसुमाग्रज म्हणाले की, ''या देशातील संस्कृती ही किराणा मालाच्या दुकानासारखी आहे. किराणा मालाच्या दुकानात जसे विविध कप्पे असतात. एका कप्प्यातील जिरे दुसऱ्या कप्प्यातील मिऱ्यात जात नाहीत. मिऱ्यात लवंग जात नाही. तशी भारतीय संस्कृती विभागली गेली आहे.'' यानंतर दादासाहेब बोलायला उठले ते म्हणाले की, ''कुसुमाग्रज म्हणतात त्याप्रमाणे जिऱ्यात मिरे जात नाही आणि मिऱ्यात लवंग जात नाहीत. यावर एक सांगतो की, चांगली सुगरण सर्व जिनसा पाट्यावर ठचठचा ठेचून एकजीव असा मसाला तयार करते. तशाच बौध्द धम्माच्या पाट्यावर या देशातील सर्व जाती एकत्र करुन सर्व समाजजीवन मसाल्यासारखं एकरूप करा.''[१०] असे म्हणताच प्रचंड टाळ्या पडल्या. त्यामुळे माणूस एकमेकांपासून कसा दुरावला आहे. त्याच्या अभिसरणाची प्रक्रिया कशी सुरु करायची हे त्यांच्या भाषणाचे खरे सुत्र होते. त्यासाठी ते सर्व साहित्यिकांना सुसंवादाचा संदेश देतात. म्हणजेच माणसे जोडण्याचे व सत्ता जोडण्याचे वक्तृत्व त्यांच्या वाणीत होते. दादासाहेब हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सहकारी, निष्ठावंत अनुयायी म्हणून आपल्या कायम स्मरणात आहे. यापेक्षा अधिक कुशल संघटक, बहुश्रुत वक्ता आणि लोकनेता म्हणूनही त्यांची महती मोठी आहे.

### ४.३ दूरदृष्टीचा नेता व विचारवंत कार्यकर्ता

या देशात दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली झालेला भूमिहीनांचा लढा, संपूर्ण देशभर दलितांनी उभारलेली ही चळवळ, देशातले आणि विशेषत: महाराष्ट्रातले तुरुंगही कमी पडावी अशी निर्माण केलेली स्थिती. यामागे दादासाहेबांचा दूरदृष्टीपणा आणि त्यांच्या नेतृत्वाला जनतेने दिलेली पावती हे निर्विवाद सत्य होते. बाबासाहेबांच्यानंतर आपल्या पक्षाला देशव्यापी व सर्वसमावेशक योग्य दिशा दर्शविण्याचे कार्य त्यांनी ज्या नेमकेपणाने आणि त्यांच्या दूरदृष्टीच्या धोरणांनी केले त्याला भारतीय इतिहासात तोड नाही.

महाडच्या चवदार तळ्याच्या संघर्षापासून सुरु झालेली दादासाहेबांची जन-सत्याग्रहाची वाटचाल भूमिहीन सत्याग्रहापर्यंत विकसित व प्रबळ होत गेली. इ.स. १९२७ ते १९७१ या त्यांच्या कालखंडात त्यांनी मानवी जीवनातील महत्त्वपूर्ण अशा सर्व राजकीय, सामाजिक, आर्थिक

व शैक्षणिक समस्यांवर भाष्य करुन त्याचा इतिहास मांडून आणि नवे मार्ग व पध्दती सांगून जनसत्याग्रहाला दिशा व दृष्टी दिली. भूमिहीनांच्या आंदोलनाचे नेतृत्व करतानाच जमीन मालकीचा इतिहासही ते उकलून दाखवितात. केवळ एका पाठोपाठ एक सत्याग्रहच न करता त्यातून स्वत:च्या विचारप्रणालीचा विकासही करतात व वर्गलढा आणि वर्णलढ्याची शक्ती एकत्रित घेऊन भूमिहीन सत्याग्रहाच्या माध्यमातून तो प्रयोग यशस्वी करतात. दादासाहेब गायकवाड जीवनवादी विचारवंत होते. दलित कष्टकरी एकजूटीचे महत्त्व त्यांना महित होते.

प्रत्येक क्रांतीकारी चळवळीत स्वत:चा बुध्दिजीवी वर्ग आवश्यक असल्याचे आंतो-नियो ग्रामची म्हणतो, ''सभी मनुष्य बुध्दिजीवी है, लेकिन सभी मनुष्य समाज के बुध्दिजीवीयोंका काम नहीं करते . . .। वह (बुध्दिजीवी) विश्व की विशेष अवधारणा में भागीदार होता है। नैतिक आचरण के बारे में उसके सचेतन विचार होते है। इसलिए वह दुनिया की किसी संकल्पना को सुरक्षित रखने के लिए या उसे बदलने के लिए यानी विचार की नई पध्दतियों को जन्म देने के लिए योगदान करता है।''[११] विचारांच्या नव्या पध्दतीला जन्म देण्याच्या योगदानाला ग्रामची महत्त्व देतो ते दादासाहेबांना पुरेपुर लागू आहे. ते त्यांनी ऐतिहासिक अशा भूमिहीनांच्या सत्याग्रहात वर्णलढा व वर्गलढ्याला एकत्रित करुन ब्राह्मणवाद व भांडवलवादाच्या विरोधात महत्त्वपूर्ण योगदान दिले यावरुन दिसते. त्यांनी दिलेल्या दलित-श्रमिक एकजुटीच्या घोषणेचा प्रवास हा क्रांतीकारी तत्वज्ञानाच्या निर्मितीपर्यंत पोहचलेला आहे.

यशवंतराव चव्हाण दादासाहेबांना श्रध्दांजली वाहताना म्हणतात, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले कार्य चालविण्याकरीता त्यांची निवड केली ती अत्यंत योग्य अशी होती. डॉ. बाबासाहेबांची विद्वत्ता किंवा प्रतिभा ही एक दुर्मिळ गोष्ट होती, परंतु त्यांच्या सहवासातून मिळालेल्या अनुभवांचा अत्यंत दूरदृष्टीने उपयोग दादासाहेब गायकवाड यांनी केला.''[१२] दादासाहेब व यशवंतरावांच्या संबंधाची सुरुवातही संघर्षाने झाली पण त्याची परिणती नंतर गाढ मैत्रीत झाली. खऱ्या अर्थाने ही मैत्री फक्त राजकीयच राहिली नाही तर त्याला एक वैयक्तिक जिव्हाळ्याचे स्वरुपही प्राप्त झाले होते. सार्वजनिक आणि सामाजिक जीवनात एक विचारवंत, कृतिशील नेता म्हणून जसा त्यांचा लौकिक होता तसाच त्यांना आंबेडकरी चळवळीतही मान होता. दलित चळवळीतले दादासाहेब गायकवाड नावाचे पर्व आणि त्या पर्वातले राजकारण दूरदृष्टीचे व व्यापक भूमिकेचे होते. आंबेडकरी चळवळीला मुख्य प्रवाहात नेण्याचा एक स्वाभिमानी मार्ग वाटल्याच्या

विचाराने अखेर दादासाहेबांनी क्राँगेसशी दोस्ती केली. राजकारणाच्या सत्तासंघर्षात सत्त्व टिकविण्याचा परोपरीने निष्ठेने जीवापाड कष्ट सोसून दादासाहेबांनी प्रयत्न केले. दोन्ही समाजाला परस्पर समजून राजकारण सामान्यांच्या उध्दारासाठी वापरण्याची एक नामी संधी मिळाली होती. परंतु ती अखेर जातीच्या राजकारणानं गिळून टाकली. कारण रिपब्लिकन पक्षाच्या येथील जातीय व्यवस्थेने निश्चित केलेल्या ह्या मर्यादामुळेच. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वारसा त्यांच्या इतक्या धारिष्ट्याने, मुत्सद्देगिरीमुळे, दूरदर्शीपणाने आणि संग्राहक बुध्दीने चालविणारा असा चारित्र्यवान स्वार्थत्यागी नेता रिपब्लिकन पक्षाला लाभल्यामुळेच महाराष्ट्राच्या राजकारणातील त्या पक्षाचा प्रभाव आणि प्रतिष्ठा आजही थोड्याफार प्रमाणात टिकून आहे. दादासाहेबांनी अनेक प्रश्नांवर सभागृहात व सभागृहाच्या बाहेर अभ्यासपूर्ण विचार मांडले. अतिशय प्रभावी वक्तृत्व आणि वैचारिक समतोल, त्यांनी मांडलेल्या विचारातून दिसून येतो. लोकप्रबोधक आणि लोकशाही अशी त्यांची भूमिका त्यांच्या कृतीशीलतेतून आणि विचारांतून सातत्याने जाणवते.

दादासाहेब हे बाबासाहेबांचे सर्वोत्तम शिष्य, खरे एकनिष्ठ, एकलव्य वृत्तीचे अनुयायी होते. बुध्द आणि आनंद तसे बाबासाहेब आणि दादासाहेबांचे ऋणानुबंध जुळले होते. दादासाहेबांच्या जीवनशैलीचा विचार करताना त्यांची वक्तृत्वशैली, लेखनशैली, कार्यशैली, संघटनशैली, नेतृत्वशैली इ. चा विचार करणे अपरिहार्य ठरते. त्यांच्यातील प्रभावीवक्ता, सत्याग्रहाचा निग्रही सरसेनापती, राजकारण धुरंदर, लोककैवारी, लोकनेता, दूरदर्शी सामाजिक कार्यकर्ता इ. पैलूं त्यांच्या कृतीशील कर्तृत्वाने दिसून येतात. खऱ्या अर्थाने सामाजिक कार्यकर्त्यांने कसं असावं, कसं जगावं, लोकसंग्रह कसा वाढवावा, आपल्या आदर्श नेत्याबद्दलची अव्यभिचारी निष्ठा कशी राखावी हे दादासाहेबांच्या कडून आजच्या कार्यकर्त्यांनी शिकण्याची गरज आहे. संघर्ष करा, आपल्या न्याय हक्कांसाठी लढा द्या, पण मिळेल ते पदरात पाडून घ्या आणि मग उरलेल्यांसाठी पुन्हा लढत रहा ही त्यांची राजकीय जीवन क्षेत्रातील वास्तविक वस्तुनिष्ठ जीवनशैली होती. याच भूमिकेतून त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यापासून ते भूमिहीनांच्या लढ्यापर्यंत फार मोठी उपलब्धी प्राप्त केली होती. म्हणून याच भूमिकेतून त्यांनी समविचारी पक्षाशी युती केली होती. आपल्या नेत्याचा खरा वासरदार तोच असतो जो नेत्याने पुढे नेलेला रथ पुढेच नेण्याचा आटोकाट प्रयत्न करतो व ते जमले नाही तर निदान मागे तरी नेत नाही. बाबासाहेबांच्या नंतर दादासाहेबांनी हेच अवघड कार्य निष्ठेने केले. म्हणून अविचल आंबेडकरनिष्ठा हा त्यांच्या जीवनशैलीचा कणा होता. त्यामुळे

समाजसेवा हेच त्यांचे जीवन आणि या समाजाच्या अखेरच्या श्वासापर्यंत सेवा करणे हाच त्यांचा जीवनधर्म होता.

**सारांश**

आपले मन शांत स्थिर ठेवून सतत कार्यावर लक्ष केंद्रीत करून सेवाभावी जीवनाची वाटचाल करीत राहणे हीच त्यांची जीवनशैली होती. लोकधर्मी, विनोदीबुध्दी असलेल्या दादासाहेबांनी कार्यकर्त्यांच्या मनावरील निराशेची छाया झटकून टाकून, सतत क्रियाशील राहिलेले बहुआयामी, अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून आपली प्रतिमा स्वच्छ ठेवली. बाबासाहेबांनी मानवमुक्तीचे जे आदर्श मानचिन्ह तयार केले. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारा हा खंदा कार्यकर्ता म्हणून दादासाहेबांची ओळख येणाऱ्या होऊ शकेल.

दादासाहेब गायकवाड यांच्या अष्टपैलू समाजकार्याची दखल घेऊन विविध संस्थांनी व नगरपालिकांनी त्यांना मानपत्रे दिली. त्यामध्ये दि. १९ डिसेंबर १९३७ अंतुर्ली-जवखेड ता. शिरपूर जि. धुळे, दि. १३ मे १९४१ रोजी नळवाडी ता. दिंडोरी या परिसरातील जनतेकडून, दि. १२ जून १९५९ नांदगाव नगरपालिका, दि. ३ मार्च १९६० मूर्तिजापूर जि. अकोला, दि. २ एप्रिल १९६३ हीरक महोत्सव समिती, नासिक रोड, दि. १२ जून १९६३ हिंगणघाट नगरपालिका, दि. १५ जून, १९६४ पुणे महानगरपालिका, दि. ३ फेब्रुवारी १९६८ बार्शी नगरपालिका, दि. ९ जून १९६८ नांदगाव नगरपालिका परिषद – नाशिक इ. या स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या लोकसेवेच्या कार्याची पावती म्हणून त्यांचा मानपत्र देऊन उचित गौरव केला. तसेच दि. १६ एप्रिल १९६८ रोजी राष्ट्रपती झाकीर हुसेन यांच्या हस्ते भारत सरकारने 'पद्मश्री' हा बहुमान दिला. प्रा. गंगाधर पानतावणे हे दादासाहेबांच्या निवार्णानंतर लिहिलेल्या लेखात म्हणतात, ''चाळीस वर्षे अखंड समाजसेवा करणाऱ्या दादासाहेबांना सरकारने अखेर 'पद्मश्री' हा किताब दिला. पण जनतेने त्यांना उत्स्फूर्तपणे 'कर्मवीर' म्हणून केव्हाच मानाचा मुजरा केला होता. दादांची निरलस व निष्काम सेवा 'पद्मश्री' पेक्षा कितीतरी मोठी होती. समाजसेवेला जनतेची पावती लागते, सरकारदरबारची नाही. दादासाहेब 'कर्मवीर' म्हणून जनतेच्या ह्दयाचे अनभिषिक्त राजे झाले हे चिरंतन सत्य आहे.''[१३] परंतु 'पद्मश्री' पेक्षा 'कर्मवीर' या जनतेच्या पदवीने त्यांची प्रतिमा अधिक जिवंत व रसरशीत वाटते. तसेच जनतेने त्यांना 'दादासाहेब' म्हणावे यातच त्यांच्या व्यक्तिमत्वाचे मोठेपण दिसून येते. दादासाहेबांना मिळालेली 'मानपत्रे', 'पद्मश्री' यापेक्षाही

त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा यथोचित गौरव-मानसन्मान, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वेळोवेळी केलेल्या भाषणातून, 'चळवळीतील शंभरनंबरी सोने', 'हाच माझा उजवा हात' अशा प्रकारे केला. यातच त्यांच्या समाजसेवेसाठी केलेल्या कार्यकर्तृत्वाची पोच पावती मिळते, कारण बाबासाहेबांनी त्यांचा गौरव करणे याच्यापेक्षा मोठी कोणतीच पदवी असू शकत नाही.

अशा कर्मयोगी दादासाहेब गायकवाड यांचे निर्वाण दि. २९ डिसेंबर १९७१ रोजी दिल्ली येथे झाले. अशा या लोकनेत्याच्या निधनाबद्दल पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी आपल्या शोकसंदेशात म्हणतात, ''दादासाहेब गायकवाड यांच्या निधनाने देश एका ध्येयवादी संसदपटूला आणि सार्वजनिक कार्यकर्त्याला मुकला. श्री. गायकवाडांनी आपले सारे जीवन सामाजिक अन्यायाविरुध्द लढण्याच्या कामी आणि पददलितांच्या उध्दारार्थ वेचले.''[१४] म्हणून दादासाहेब गायकवाड यांचे कार्य भावी पिढ्यांना सोशिकपणे, त्यागी वृत्तीने, समर्पण भावनेने, समाजातील अन्यायाविरुध्द भावी काळातील दलितमुक्तीच्या व भूमिहीनांच्या संघर्षाला लढण्यासाठी बळ, दिशा आणि दृष्टी देणारे दीपस्तंभ ठरेल.

# संदर्भ ग्रंथ


१. अरुण काळे: ग्लोबलचं गावकूस, पृष्ठ-२४-२५.

२. भूषण गगराणी व इतर (सं.): लोकराज्य – कर्मवीर दादासाहेब गायकवाड विशेषांक – ऑक्टोबर २००१, पृष्ठ-३५ (लेख – यशवंतराव चव्हाण – प्रगल्भ व्यक्तिमत्वाचा अस्त)

३. रमेश शिंदे (सं.): कर्मवीर दादासाहेब गायकवाड, पृष्ठ-७९ (लेख – रा.सू. गवई – आदर्श लोकनेता)

४. भूषण गगराणी व इतर (सं.): कित्ता, पृष्ठ-२९ (लेख – तुकाराम रणशूर – बहुजन हिताय: बहुजन सुखाय)

५. निर्मलकुमार फडकुले, रावसाहेब कसबे व इतर (सं.): कित्ता, पृष्ठ-२५४ (लेख – सोपानदेव चौधरी – दादासाहेब गायकवाड: एका समर्पित जीवनाची परिसमाप्ती)

६. भूषण गगराणी व इतर (सं.): कित्ता, पृष्ठ – ११ (लेख – रमेश शिंदे – रानातल्या पाखरांना 'जयभीम' शिकविणारा नेता)

७. रमेश शिंदे (सं.): कित्ता, पृष्ठ-२६ (लेख – वि.वा. शिरवाडकर – अन्यायांनी पिचलेल्या दलितांचा दादा गेला)

८. भाऊ लोखंडे (सं.): कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची भाषणे, खंड-१, पृष्ठ-११ (लेख – डॉ. नरेंद्र जाधव – कर्मवीर दादासाहेब गायकवाड: एक महान कर्मयोगी)

९. भूषण गगराणी व इतर (सं.): कित्ता, पृष्ठ-४१ (लेख – ॲड. हरिभाऊ पगारे – दुर्दम्य आशावाद)

१०. कित्ता: पृष्ठ-४१.

११. आंतोनियो ग्रामची (अनु. कृष्णकांत मिश्र): सांस्कृतिक और राजनीतिक चिंतन के बुनियादी सरोकार, पृष्ठ-१०२.

१२. रमेश शिंदे (सं.): कित्ता, पृष्ठ-१७ (लेख – यशवंतराव चव्हाण – प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचा अस्त)

१३. रमेश शिंदे (सं.): कित्ता, पृष्ठ-८५ (लेख – प्रा. गंगाधर पानतावणे – कर्मवीरांचे अंत्यदर्शन)

१४. दै. लोकसत्ता: दि. ३१ डिसेंबर, १९७१, पृष्ठ-१ व ६.

## प्रकरण पाचवे

# निष्कर्ष

**प्रकरण पाचवे**

# निष्कर्ष

दादासाहेब गायकवाड यांच्या जडणघडणीचा विचार केला तर त्यांच्या कुटुंबातील असणारे धार्मिक, सात्विक आणि अध्यात्मिक वातावरण हे त्यांच्या नैतिक व वैचारिक संस्काराच्या जडणघडणीत रुपांतरीत होत असतानाच त्यांच्या वडिलांच्या निपक्षपातीपणाने न्यायनिवाडा करण्याच्या विचारांचा प्रभाव पडून वेळप्रसंगी रोखठोक बंडखोरपणाची जाणीव होत गेल्याचे दिसते. परंतु त्याचबरोबर तत्कालीन सामाजिक, धार्मिक विषमतेच्या, अस्पृश्यतेच्या चटक्याने त्यांच्या संस्कारक्षम मनामध्ये प्रश्नांची निर्मिती व जाणीव होते. व त्यातून देव, धर्म, रुढी, परंपरा, अस्पृश्यता या विरोधी मनाची जडणघडण होऊन या विळख्यातून बाहेर येण्यासाठी प्रबोधन व समाजजागृती विषयी विचार मनात निर्माण झाले.

प्राथमिक शाळेतील त्यांच्या 'भावड्या किसन महार' नावाच्या नोंदीवरुन व अस्पृश्य भेदभावाच्या व्यवहारावरून सामाजिक विषमतेच्या विचारांची प्रबळ जाणीव होत गेली. या जाणिवेतूनच त्यांनी आपल्याला फारसे शिक्षण घेता आले नाही म्हणून शाहू बोर्डिंगचे अधिक्षक पदाची नोकरी स्विकारून अस्पृश्य मुलांच्या शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. दादासाहेबांनी अधिक्षक पदाची नोकरी ही सामाजिक कार्याचे स्थान म्हणूनच स्विकारली होती. खरे तर ही बोर्डिंग म्हणजे दादासाहेबांच्या सामाजिक कार्याच्या लढ्याचा रंगमंचच होय. शिक्षणाबरोबरच सामाजिक प्रश्नांच्याकडेही पाहण्याची दृष्टी त्यांना तिथे मिळत गेली. सामाजिक सेवेच्या कार्याचा शुभारंभ व त्यांच्या वैचारिक, सामाजिक कार्याची जडणघडण अधिक्षक पदाच्या नोकरीतून तयार होत गेलेली दिसून येते. आपली शिक्षणाची अपूर्ण राहिलेली भूक त्यांनी नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयात गांधी, मार्क्स, एंगल्स, लेनिन, टॉलस्टॉय इ. च्या चरित्रवाचनातून पूर्ण केली. त्यातूनच त्यांच्या विचारांची परिपक्वता, दिशा व वक्तृत्व कौशल्य उद्याच्या लढ्यासाठी तयार होत गेलेले दिसते. दलितमुक्तीच्या लढ्यासाठी त्यांना लढण्याचे बळ चरित्र वाचनातून, त्यावेळच्या वृत्तपत्रातून व त्यांच्या जीवनात आलेल्या त्यांच्याच शेतीतील गूळ तयार करण्याच्या परावलंबतेच्या आणि अस्पृश्यतेच्या दाहक कटू अनुभवातून मिळाले. वसतीगृहाचे अधिक्षकपद सांभाळत असतानाच सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नांची जाणीव त्यांना झाली होती. त्यातूनच शेतकरी, मजूर, कष्टकरी, दलित, भूमिहीन, वंचितांच्या दु:खाची जाणीव त्यांच्या मनामध्ये निर्माण होऊन उद्याच्या

सर्वसामन्यांच्या प्रश्नांसाठी लढण्याची उर्जा त्यांच्या जडणघडणीत निर्माण झालेली दिसून येते. त्यामुळे त्यांनी व्यक्तिगत पातळीवर सामाजिक विषमतेविरुध्दच्या चळवळी सुरु केल्या. त्यासाठी त्यांनी जाती-जातीमधील भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न धैर्याने व कृतीशीलपणे राबविला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भेटीने दादासाहेबांच्या जीवनाला कलाटणी मिळून उद्दिष्ट मिळाले व ध्येय निश्चित झाले. म्हणजेच विचार देणारा व कृतीसाठी दिशा देणारा नेता डॉ. आंबेडकरांच्या रुपाने मिळाला आणि त्यामुळेच दादासाहेबांच्या व्यक्तिमत्वाला हिऱ्यासारखे पैलू पडत गेले. तसेच बाबासाहेबांच्या विचारांना प्रत्यक्षात कृतीत रुपांतर करणारा भाऊराव मिळाला आणि सामाजिक क्रांतीच्या लढ्याच्या इतिहासाची गती कृतीशिलपणे सुरु झाली. हे आपणास पुढील काळातील घडलेल्या घटनांनी दाखवून दिले आहे. दादासाहेब गायकवाड यांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीत कौटुंबिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, वैचारिक, नैसर्गिक घटकांच्या कमीअधिक प्रभावातून त्यांच्या विचारांची जडणघडण तयार होत गेली. दादासाहेब गायकवाड यांच्यावर डॉ. आंबेडकरांच्या विचारसरणीचा प्रभाव त्यांच्या जडणघडणीच्या काळापासून दिसतो. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने दादासाहेबांच्या कृतीशील कार्याला गती व प्रेरणा मिळाल्याचे दिसून येते. म्हणून एकाच वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, कार्ल मार्क्स, एंगल्स, लेनिन, टॉलस्टॉय इ. धुरंदर विचारांची व नेतृत्वाची एक आकृती किंवा शिल्प म्हणून दादासाहेबांच्याकडे पाहिले जाईल. म्हणून त्यांची उद्याच्या दलितमुक्तीच्या लढ्यासाठी सर्वस्व झोकून देण्याची सिध्दता तत्कालीन समाज जीवनातून व वैचारिक अनुभवातून झाल्याचे दिसते.

या देशातील जनतेच्या उपजिविकेची सर्व साधने ही मूठभर धनिकांच्या हातात असल्याने गरीब जनतेचा विकास कसा खुंटला ते सांगून त्यासाठी भूमिहीनांच्या लढ्याच्या माध्यमातून आर्थिक प्रश्नांकडे ते पाहतात. त्या लढ्याच्या माध्यमातून बेकारी, दारिद्रय, अन्नधान्याचा प्रश्न सोडविला जाऊ शकतो हे दादासाहेब दाखवून देतात. जातींच्यामुळे आर्थिक शोषण केले जाते व जातीवर आधारित उत्पादन व्यवस्थेमुळे व्यवसाय स्वातंत्र्य, उत्पादन साधनांची मालकी खालच्या जातींना कशी नाकारली जाते ते स्पष्ट करतात. तसेच जातीव्यवस्थेमुळे दलितांच्या विकासात कसे अडथळे निर्माण केले जातात ते दादासाहेब निदर्शनास आणून देताना कनिष्ठ जातींना सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठेपासून वंचित ठेवणाऱ्या जातीव्यवस्थेचे स्वरुप ते स्पष्ट करतात. पेरुमल कमिटीच्या

माध्यमातून मागासवर्गीयांमध्ये सामाजिक गतिशिलता आणण्यासाठी राखीव जागांच्या भरती संदर्भात 'कृती कार्यक्रम' देतात. हक्कांचा लढा म्हणजे दलितांच्या विकासाचा लढा असे समीकरण त्या काळात दादासाहेबांनी तयार केले, व या देशातील गोरगरीब जनता ही स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या विचारांनी संघटित असावी अशी त्यांची धारणा होती. सामाजिक, राजकीय, धार्मिक व शैक्षणिक बाबींची परस्परांमध्ये सांगड घातली तर सर्व घटकांची आर्थिक सुधारणा होऊ शकते अशी दादासाहेबांची धारणा होती.

दादासाहेब गायकवाड हे खऱ्या अर्थाने हाडाचे शेतकरी असल्याने शेतात राबणाऱ्या भूमिहीन शेतमजुरांच्या समस्यांची जाण दादासाहेबांना होती. दादासाहेब गायकवाड यांचे वाचन-लेखन काही मोठे नव्हते पण दीनदलितांच्या चेहऱ्यावरची वेदना टिपण्याची बौध्दिक कुवत मात्र त्यांच्यामध्ये उपजतच होती व त्या जाणिवेतूनच दलितांच्या व भूमिहीन शेतमजुरांच्या सत्याग्रहाने जन्म घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या देशातील उत्पादन साधनांची विषम वाटणी दलितांना आर्थिकदृष्ट्या पंगू बनविते म्हणून ते जमिनीच्या फेरवाटपाची व पुनर्रचनेची मागणी करतात. देशातील जमीन व अन्य महत्त्वाच्या उद्योगांवर मुठभर लोकांचीच मक्तेदारी राहू नये म्हणून ते जमिनीचे व अन्य महत्त्वांच्या उद्योगांचे राष्ट्रीयकरण करण्याची मागणी करतात. हाच बाबासाहेबांचा आर्थिक पुनर्रचनेचा विचार दादासाहेबांनी भूमिहीनांच्या लढ्यातून व्यवहारात आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

भूमिहीनांचा सत्याग्रह करताना सर्व प्रकारच्या शोषित घटकासंदर्भात ते भूमिका घेतात. आदिवासी पासून ते दलित बहुजन भूमिहीनांचे आंदोलन उभे करतात आणि त्यामागील एक ऐतिहासिक पार्श्वभूमी सुध्दा मांडतात. म. फुले व डॉ. आंबेडकरांनी जमिनीच्या मालकीच्या संदर्भात जे विश्लेषण केले आहे त्या विश्लेषणाशी दादासाहेबांचे विचार सुसंगत आहेत. जमिनीचा मालकी हक्क हा जसा उपजिविकेच्या साधनांसाठी आवश्यक आहे. तसाच तो समाजात प्रतिष्ठेने जगण्यासाठी आवश्यक आहे म्हणून दादासाहेब भूमिहीनांच्या सत्याग्रहाच्या माध्यमातून ते उपजिविकेचे साधन व प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. तसेच धार्मिक सत्ताही कशा प्रकारे आर्थिक शोषण करते याची जाणीव त्यांना होती. म्हणून जमिनीच्या प्रश्नावर संघर्षात्मक कार्यक्रम हाती घेऊन घोषणा करतात की, ''कसेल त्याची जमीन, नसेल त्याचे काय?'' असा प्रश्न उपस्थित करुन सर्व दलित, आदिवासी, भूमिहीन मग तो कोणत्याही जाती धर्माचा असो त्यांना भूमिहीनांच्या

लढ्याच्या मैदानात उतरवितात. त्यातून समाजातील सर्वच उपेक्षितांकडे पाहण्याची दादासाहेब गायकवाड यांची दृष्टी किती व्यापक होती हे दिसते.

खरे तर त्यांचा भूमिहीनांचा सत्याग्रह केवळ वर्गसंघर्ष नव्हता तर जाती-वर्ग संघर्ष होता. दादासाहेबांनी जातीविरोधी सांस्कृतिक लढ्याला जमिनीच्या प्रश्नाचे परिमाण देऊन देशातील शोषित व शोषक जातीवर्गाचे स्वरुप व संघटन या सत्याग्रहातून ते उघड करतात. कारण त्यांची ह्या सत्याग्रहामागील भूमिका, तात्विक बैठक पाहिली तर एकीकडे दादासाहेब जमीन मालकीतील जातीय विषमता सांगत होते, तर दुसरीकडे काम देण्याचा व किमान वेतनाचा मुद्दा, व एका बाजूला पिण्याच्या पाण्याचा व अस्पृश्यता पाळल्याची जाणीव करुन देतात. जमीन प्रश्न आणि बौध्दांना राखीव जागा देण्याची मागणी एकाचवेळी घेऊन ही सर्व जातींच्या भूमिहीनांना त्यांनी बरोबर घेतले. दलितांच्या व भूमिहीनांच्या प्रश्नाला देशपातळीवर राष्ट्रीय प्रश्नाच्या अंगाने दादासाहेब गायकवाड सर्वांना पटवून देतात व दलित चळवळ कोणा एका विशिष्ट जातीची करण्याऐवजी ही सर्व दुर्बल घटकांची बनवण्यावर दादासाहेब भर देताना दिसतात. कॉंग्रेसचा 'एका जातीचा लढा' हा आरोप त्यांनी परतवून लावून तो केवळ विविध जातींना आर्थिक प्रश्नावर एकत्र आणण्याच्या संघटन कौशल्याचा फक्त भागच नसून सैध्दांतिक बैठकीचा तो एक परिपाक होता हे दिसते. पडिक जमिनी भूमिहीनांना न देण्याचा परिणाम श्रमशक्ती बसून राहणे, बेकारी त्यातून दारिद्र्य आणि त्यातून अन्नधान्याचा तुटवडा निर्माण होण्याच्या दुष्ट चक्रात होते असे ते दाखवून देतात.

दलित चळवळ केवळ भावनेवर, चिड, संतापावर उभी नाही. तर भौतिक लढा संघटित करण्याचे ऐतिहासिक उत्तरदायित्व ह्या भूमिहीनांच्या सत्याग्रहाच्या निमित्ताने दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली सिध्द झाल्याचे दिसते. कारण दलित, बहुजन जनतेने विशेषत: स्त्रियांनीही अत्यंत लढाऊ बाणा या सत्याग्रहात दाखविला व या सत्याग्रहाने १ लाखाचा संसदेवर मोर्चा नेला व नंतर ३ लाख ४० हजार लोकांना अटक झाली या देशातील तुरुंगही अपुरे पडले. म्हणजे या सत्याग्रहाने जनतेत किती मूळ धरले होते हे त्यातून स्पष्ट होते. जनतेच्या मुलभूत प्रश्नांवर आंदोलन केले तर लोक जाती-पातीचा विचार न करता वर्गीय भूमिकेवर राजकीय प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात हे दादासाहेबांनी भूमिहीनांच्या सत्याग्रहातून दाखवून दिले. दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या भूमिहीनांच्या सत्याग्रहाचे वैशिष्टये म्हणजे हा सत्याग्रह केवळ एका जाती, गटापुरता, प्रदेशापुरता, पक्षापुरता मर्यादित न राहता व्यापक बनला होता. भारतीय जनतेच्या विकासाची

कोंडी फोडणारा 'भूमी सुधारणेचा लढा' झाल्याशिवाय दलित जनतेची सर्वच प्रकारच्या जुलूमातून कधीच मुक्तता होणार नाही. म्हणून जातिव्यवस्था नष्ट करण्यासाठी 'भूमी सुधारणेचा लढा' करण्याची मूलभूत गरज आहे याचे नेमके आकलन दादासाहेब गायकवाड यांना झाले होते. भूमिहीनांच्या लढ्याला त्यांनी जे राजकीय महत्त्व दिले, त्यावरुन त्यांचा दलितमुक्तीकडे पाहण्याचा समग्र दृष्टिकोन दिसून येतो.

दादासाहेबांच्या राजकीय वाटचालीचा एक चांगला परिणाम या सत्याग्रहाच्या निमित्ताने दिसून आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर रिपब्लिकन चळवळीला व्यापक करण्याची ऐतिहासिक जबाबदारी दादासाहेबांनी स्वत:कडे घेतल्याचे दिसते. अलग पडलेल्या रिपब्लिकन चळवळीला त्यांनी या सत्याग्रहाच्या माध्यमातून पुन्हा एकदा बाबासाहेबानंतर मुख्य केंद्रस्थानी आणले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील सहभाग व नेतृत्वामुळे काँग्रेसेत्तर पक्षांचा पाठिंबा या चळवळीला मिळविण्यात ते यशस्वी झाले. आंबेडकरी चहवळीला एका जातीय वर्तुळाच्या पलीकडे नेण्याचे सामर्थ्य दादासाहेब गायकवाड यांच्याकडे होते ते त्यांनी भूमिहीनांच्या सत्याग्रहातून दाखवून दिले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमुळे व भूमिहीनांच्या सत्याग्रहामुळे 'बहुजनांचा नेता' व 'मास लिडर' म्हणून दादासाहेबांना मान्यता मिळाली. एक सजग राजकीय नेता म्हणून या भूमिहीनांच्या सत्याग्रहातून दादासाहेबांचे खंबीर नेतृत्व पुन्हा एकदा जनतेसमोर आले. या एकाच जनआंदोलनाने दादासाहेबांची 'लोकनेता' ही प्रतिमा अधिक स्पष्ट होत जाते. आज भूदान चळवळ थांबली आणि संपली पण ज्या भूमिमुक्ती चळवळीचे दादासाहेब प्रणेते आणि प्रेरणास्थान ठरले आहेत, त्या दृष्टीने आजही भूमिमुक्तीची चळवळ 'कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण आणि स्वाभिमान योजना' या नावाने 'महाराष्ट्र शासनाच्या' माध्यमातून गतिमान आहे. यावरुन दादासाहेब गायकवाड यांनी भूमिहीनांच्या प्रश्नांच्या संदर्भात दिलेल्या योगदानाचे महत्त्व आणि उपयुक्तता दिसून येते.

बाबासाहेबानंतर दादासाहेबांना पक्ष व दलित जनता सांभाळता आली याचे कारण म्हणजे त्यांचा सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचा गोड व लीन स्वभाव, सर्वसामान्य जनतेच्या सुख-दु:खाशी समरसता व त्याच बरोबर कणखरपणा होय. त्यांच्या या स्वभावामुळे इतर पुढारीसुध्दा वचकून असत पण त्यांच्याबद्दल त्यांना आदरही वाटे. कारण जनसेवेचे प्रभावी साधन म्हणून दादासाहेबांनी राजकारण केले. दादासाहेब हे जनतेला फारच प्रिय होते. कारण ते जनतेतूनच पुढे आलेले 'मास

लिडर' होते. सर्वसामान्य जनतेला सार्वजनिक लढ्यासाठी उभा करण्याचे व माणसे जोडण्याचे मौलिक सामर्थ्य त्यांच्या वाणीत व शब्दांत होते. तसेच त्यांच्या विनोदीवृत्तीच्या मागे चिंतनशील विचाराला हात घालून सर्वसामान्य माणसाला आपल्याकडे आकर्षित करण्याचे कसब त्यांच्याकडे होते. म्हणून कर्मवीर दादासाहेब गायकवाड हे ''Mass Base'' आणि ''Mass Appealing'' नेते होते त्यामुळे त्यांच्याकडे 'समाजमान्य नेता' म्हणून पाहता येते. गावोगावी चळवळीचा प्रचार व प्रसार करीत फिरताना गोरगरीब, दलित, पिडित, कार्यकर्त्यांना आपल्या पाहुणचारांची झळ लागू नये म्हणून 'पाठीमागच्या गावाहून मी जेवण करून आलोय' ही त्यांची 'माणूसपणा'ची कार्यपध्दती जीवाला चटका लावणारी व नवे आदर्श प्रस्थापित करणारी ठरते.

बाबासाहेब व दादासाहेब यांच्यामध्ये जो सुसंवाद होता त्याचा विचार आणि कृतीमध्ये सुसंगम झालेला होता. डॉ. आंबेडकरांनी दादासाहेबांना पाठविलेली जवळजवळ ४५० पेक्षा जास्त पत्रे आहेत त्यातून या दोघातील विश्वासाची व दादासाहेबांच्या निष्ठेची प्रचिती येते. अविचल आंबेडकरनिष्ठा हा त्यांच्या जीवनशैलीचा कणा होता व समाजसेवा हाच त्यांचा वस्तुनिष्ठ जीवनधर्म होता हे दिसून येते. जमिनीच्या प्रश्नाच्या माध्यमातून त्यांनी समग्र समाज भाकरीसाठी रस्त्यावर उतरविला यातूनच त्यांच्या उत्कृष्ट संघटन कौशल्याची, वक्तृत्वाची, नेतृत्वाची आणि कर्तृत्वाची प्रचिती येते. कर्मवीरांचे जीवन म्हणजे अथक कष्ट, झुंजारवृत्ती व कार्यावरील प्रखर निष्ठा यांचा संगम होय. दादासाहेबांच्या कृतिशीलतेतून आणि विचारातून एकाच वेळेला वक्तृत्व, कर्तृत्वाचा आणि नेतृत्वाचा मिलाफ झाल्याचे व नेहमी लोकप्रबोधक आणि लोकशाहीची भूमिका घेतल्याचे जाणवते. अनेक नगरपालिकांनी त्यांच्या कार्याची नोंद घेऊन त्यांना 'मानपत्रे' सन्मानपूर्वक दिली. यावरून त्यांच्या कार्याची पोच मिळते. म्हणून विचाराला कृतीची व निष्ठेची जोड देणारे खऱ्या अर्थाने कर्मवीर होते. तशी त्यांना भारत सरकारने 'पद्मश्री' ही पदवी बहाल केली. परंतु बाबासाहेबांनी वेळोवेळी केलेल्या आपल्या भाषणातून, शंभर नंबरी सोने, हाच माझा उजवा हात ह्या उल्लेखातून व जनतेच्या 'कर्मवीर' या पदवीतून दादासाहेबांनी केलेल्या दलितमुक्तीच्या व समाजसेवेच्या कार्यकर्तृत्वाची पोच पावती मिळते व 'पद्मश्री' पेक्षा 'कर्मवीर' या पदवीने त्यांची प्रतिमा अधिक जिवंत आणि रसरशीत वाटते. तसेच जनतेने त्यांना दादासाहेब म्हणावे यातच त्यांच्या व्यक्तिमत्वाचे मोठेपण दिसून येते. म्हणून दादासाहेबांच्या रचनात्मक कार्यकर्तृत्वाचा दीर्घ परिणाम आंबेडकरी चळवळीवर राहिल्याचे दिसते. एक प्रभावी वक्ता, दलितमुक्तीच्या

सत्याग्रहाचा सरसेनापती, राजकारण धुरंदर, सामान्य जनतेचा कैवारी, भूमिहीनांचा आधारवड, काळाची दिशा ओळखून पावले टाकणारा महान मुत्सद्दी म्हणून दादासाहेबांनी त्यागी वृत्तीने, समर्पण भावनेने, सोशिकतेने केलेले कार्य हे भावी काळातील दुर्बल, पिडीत, वंचित, कष्टकरी, मजूर, भूमिहीन व दलितमुक्तीच्या लढ्यासाठी बळ, दिशा आणि व्यापक दृष्टी देणारे दिपस्तंभ ठरेल.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी जनचळवळीला एकत्रित करुन सामाजिक, राजकीय, आर्थिक परिवर्तनाच्या आदर्श लढ्याचे प्रतीक बनविले व त्या लढ्याच्या नेतृत्वगुणाचे ते प्रतिक बनले. 'गुलामाला गुलामीच्या निद्रेतून जागे केले तर तो स्वत:च्या आणि इतरांच्या मुक्तीसाठी आणि प्रगतीसाठी क्रांती करतो' हा नवा इतिहास त्यांनी सिध्द करुन दाखविला. परंतु प्रबोधनाची दीर्घ परंपरा असलेल्या महाराष्ट्रामध्ये समाजपरिवर्तनाची व दलितमुक्तीची एक मोठी चळवळ झाल्याचे दिसते. त्या परिवर्तनाचा आज व्यापक परिणाम जाणवत नाही. आज कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या कार्याचा, त्यागाचा, मेहनतीचा, चळवळीशी प्रामाणिक राहण्याचा, रिपब्लिकन पक्ष एकजिनसी करुन शक्तिमान करण्याच्या इर्षेचा व अस्मितेचा विसर पडलेला दिसतो आहे. आजच्या दलित नेतृत्वाने व्यापक एकजूट, व्यापक जाणीव आणि व्यापक संघर्ष करणे ही काळाची गरज आहे. भारतातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व आर्थिक विषमतेने खऱ्या अर्थाने भारताचे राष्ट्र म्हणून एकीकरण होऊ दिले नाही, त्यामुळे भारतात आज भांडवलशाही व शोषण व्यवस्था रुजताना दिसते. तसेच भारतातील सामाजिक विषमतेने येथील कष्टकरी, शोषित, दलित, गरीब वर्गाची एकजूट होऊ न दिल्याने येथे बहुजनवर्गीय समाजवादी क्रांती होऊ शकली नाही.

म्हणून दलित चळवळीने आरक्षण व त्यातून निर्माण झालेले प्रश्न यातच गुंतून न राहता ग्रामीण गरीब, पिडीत, मजूर, भूमिहीन यांच्या प्रश्नांवर आंदोलने संघटित केली पाहिजेत. धर्म निरपेक्षतेचे, लोकशाहीचे रक्षण तसेच सामाजिक, धार्मिक व आर्थिक विषमता वाढविणाऱ्या धोरणांना विरोध, नव्या आर्थिक धोरणांना, सेझ प्रकल्पाला विरोध या बाबींवर आज व्यापक आंदोलन उभे राहू शकतात. दादासाहेबांच्या काळातील धगधगता आंदोलनात्मक काळ व राजकीय, सामाजिक क्षेत्रातील निर्णायक दखलपात्र हरवलेली शक्ती पुन्हा निर्माण होणे हे प्रत्येक फुले-आंबेडकरी, रिपब्लिकन नेत्यांचे व कार्यकर्त्यांचे ध्येय असले पाहिजे, त्यावरच बहुजन

समाजाची प्रगती व उन्नती अवलंबून आहे. त्याकरीता दादासाहेबांच्या कृतीशील कार्याचा आदर्श समोर ठेवून बहुजन चळवळ गतीमान करणे ही काळाची गरज आहे. आजच्या वाढत्या दैवतीकरणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दादासाहेब गायकवाड यांची सोडवणूक करुन त्यांचा वैचारिक वारसा समजून, पुढे नेल्यास आजच्या दुरावस्थेतून बाहेर पडता येईल. दादासाहेबांनी दिलेल्या सर्व लढ्यांच्या तपशीलाकडे पाहिले तर त्यांची भारतीय अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे पाहण्याची एक स्वतंत्र व व्यापक दृष्टी होती हे दिसते. म्हणून फुले-आंबेडकरी चेहरा पुसून हा समाज जगू शकणार नाही, आणि जगू पाहिला तर त्या समाजाला अर्थ उरणार नाही हे दादासाहेबांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.

खऱ्या अर्थाने २१ व्या शतकावर 'फुले-शाहू-आंबेडकर' विचारसरणीचे शिक्कामोर्तब करायचे असेल तर दादासाहेबांनी स्वत:च्या घरावर तुळशीपत्र ठेवून ज्या निस्वार्थी भावनेने सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, दलितमुक्तीचे व भूमिहीनांचे लढे लढले त्या लढ्याला स्मरुन पुढील वाटचाल केल्यास बाबासाहेबांचे सामाजिक व राजकीय स्वप्न पूर्ण होण्यास हातभार लागू शकतो. कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची विचारधारा, कार्यपध्दती त्यांचे नेतृत्व व दलितमुक्तीचे आणि भूमिहीनांच्यासाठीचे कार्य समाज परिवर्तनासाठी एक महत्त्वाचे साधन ठरु शकते. म्हणून कर्मवीर दादासाहेब गायकवाड ही एक व्यक्ती नसून ती एक जीवनपध्दती आहे ज्यामुळे समाजमनाची भूमिका आणि प्रतिमा स्पष्ट होण्यास मदत होते.

# संदर्भ ग्रंथ

# संदर्भ ग्रंथ सूची

## - : प्राथमिक साधने : -

### - : प्रकाशित प्राथमिक साधने : -


१. कद्रेकर भास्कर रघुनाथ (सं.): **जनता खास अंक-१९३३,** प्रकाशन – दि. १५ मे, १९३३, (लेख – श्री. भाऊराव कृष्णराव गायकवाड – जागृतीचे श्रेय आंबेडकरांनाच!) पुनरावृत्ती – प्रकाशक – प्रदीप गायकवाड, दीक्षाभूमी संदेश, नागपूर-१७, दि. १२ ऑक्टोबर, २००५

२. खरात शंकरराव (सं.): **कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांना डॉ. आंबेडकरांची पत्रे,** इंद्रायणी साहित्य, पुणे-३०, प्रकाशन – दि. १५ मे, १९९०.

३. गायकवाड दादासाहेब (संग्राहक – राहुल बौध्द बबन): **काँग्रेस वैरीण का वाटते?** (जनता साप्ताहिकाच्या सौजन्याने, शनि-१४ एप्रिल, १९४५, मुंबई)

४. गायकवाड भाऊराव कृष्णराव: **सत्याग्रही डॉ. आंबेडकर,** (लेख – जनता खास अंक – १९३३)

५. गायकवाड भाऊराव कृष्णराव: **मुखेड सत्याग्रह,** (लेख – प्रबुध्द भारत जयंती विशेषांक – दि. १४ एप्रिल, १९५८)

६. गायकवाड दादासाहेब: **सत्याग्रहापासून धर्मांतराकडे,** (लेख – प्रबुध्द भारत, दि. ६-१०-१९६२)

७. गायकवाड भाऊराव कृष्णराव: **माझे स्फूर्तिस्थान,** (लेख – महाड कॉलेज मॅगेझीन – मार्च, १९६३)

८. गायकवाड भाऊराव कृष्णराव: **खऱ्या मुक्तीसाठी लढा अटळ!** (दादासाहेब गायकवाड यांचे लखनौ, उत्तरप्रदेश येथील मार्गदर्शक भाषण), प्रबुध्द भारत – रिपब्लिकन पक्ष स्थापना विशेषांक – १९५७, पुनर्मुद्रण – कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद.

९. गायकवाड भाऊराव कृष्णराव: **टीकाकारांच्या आरोपांचे खंडन,** (भीम चौपाटीच्या विराट सभेत कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी दि. १५ मे, १९६० रोजी केलेले भाषण – प्रबुध्द भारत – दि. २१ मे, १९६०)

१०. गायकवाड भाऊराव कृष्णराव: **संयुक्त महाराष्ट्र समिती राहिली पाहिजे!** (संयुक्त

महाराष्ट्र समितीच्या दुसऱ्या अधिवेशनात अध्यक्षपदावरून भाषण – प्रबुध्द भारत – दि. १५-१०-१९६०)

११. लोखंडे भाऊ (सं.): **कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची भाषणे – खंड-१,** (प्रबुध्द भारत, जनता या वृत्तपत्रातील भाषणे संकलन) कर्मवीर दादासाहेब गायकवाड मेमोरियल फौंडेशन, उल्हासनगर-०५, प्रथमावृत्ती – दि. २९ डिसेंबर, १९९३

१२. Narke Hari (Ed.): **Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches, Vol.-21, CORRESPONDENCE,** Dr. Babasaheb Ambedkar, Mahatma Phule and Rajarshi Shahu Source Material Publication Committee, Govt. of Maharashtra, Mumbai-21, First Edition - 2006.

**- : अप्रकाशित प्राथमिक साधने : -**

१. गायकवाड दादासाहेब यांना बार्शी नगरपरिषदेमार्फत मानपत्र देणे संबंधीचा मा. कौन्सिल ठराव क्र.१७८ दि. १-२-१९६८.

**- : मराठी ग्रंथ : -**

१) आंबेडकर बाबासाहेब (सं.-प्रदिप गायकवाड): **बहिष्कृत भारत व मूकनायक अग्रलेख,** क्षितिज पब्लिकेशन, नागपूर-१७, चतुर्थ आवृत्ती – २००६.

२) कसबे रावसाहेब: **आंबेडकर आणि मार्क्स,** सुगावा प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती – १ ऑगस्ट १९८५.

३) कांबळे झुंबरलाल: **महाडचा मुक्तिसंग्राम आणि नानासाहेब टिपणीस,** सुगावा प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती – १४ एप्रिल २००४.

४) काळे अरूण: **ग्लोबलचं गावकूस,** लोकवाड्मय गृह, मुंबई-२५, पहिली आवृत्ती – २७ ऑगस्ट २००८.

५) कीर धनंजय: **राजर्षी शाहू महाराज,** पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई-३४, द्वितीय आवृत्ती – १९९२.

६) कीर धनंजर: **डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र,** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वितीय आवृत्ती – दि. १४ एप्रिल १९७६.

७) खरात शंकरराव: **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर,** इंद्रायणी साहित्य, पुणे, पुनर्मुद्रण – ६ डिसेंबर २००६.

८) खरात शंकरराव: **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार,** इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे-३०, प्रकाशन – दि. ६ मार्च २००८.

९) खरात शंकरराव: **अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम,** इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे-३०, द्वितीय आवृत्ती – ३ मे २००४.

१०) खोब्रागडे फुलचंद्र: **सूर्याचे सांगाती,** संकेत प्रकाशन, नागपूर-१०, प्रथम आवृत्ती – २६ जानेवारी २००९.

११) खैरमोडे चां.भ.: **डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, खंड-२,** सुगावा प्रकाशन, पुणे – ३०. द्वितीय आवृत्ती – दि. १४ ऑक्टोबर, १९९१.

१२) खैरमोडे चां.भ.: **भिमराव रामजी आंबेडकर चरित्र,** खंड-३, सुगावा प्रकाशन, पुणे-३०, द्वितीय आवृत्ती – डिसेंबर १९९०.

१३) गणवीर रत्नाकर (सं.): **बहिष्कृत भारतातील डॉ. आंबेडकरांचे स्फूटलेख,** रत्नाकर प्रकाशन, भुसावळ, प्रथम आवृत्ती – १८ मे १९८१.

१४) गणवीर रत्नाकर (सं.): **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारतातील अग्रलेख,** रत्नमित्रा प्रकाशन, भुसावळ, दि. ६ डिसेंबर १९७६.

१५) गायकवाड प्रदिप (सं.): **जनता (पाक्षिक),** दि. १९ डिसेंबर १९३१, समता प्रकाशन, नागपूर-१७, द्वितीय आवृत्ती – २६ जानेवारी २००९.

१६) गायकवाड प्रदिप (सं.): **महाडचा सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन,** क्षितिज पब्लिकेशन, नागपूर-१७, द्वितीय आवृत्ती – २१ ऑक्टोबर २००७.

१७) जंजाळ प्रकाश: **भूमिहीनांचा सत्याग्रह,** प्रचार प्रकाशन, कोल्हापूर – १९९६.

१८) जंजाळ प्रकाश: **आंबेडकरी महायोध्दा एन. शिवराज,** कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद-०३, प्रथम आवृत्ती – १५ ऑगस्ट २००७.

१९) जाधव दिलिप (सं.): **कर्मवीर दादासाहब गायकवाड अभिवादन ग्रंथ,** ड्रॅगन प्रकाशन, बुलढाणा, प्रथम आवृत्ती – १४ मे २००५.

२०) पंडित नलिनी: **जातिवाद आणि वर्गवाद,** लोकवाड़मय गृह, मुंबई-२५, तिसरी आवृत्ती –

१ जानेवारी १९९६.

२१) पगारे हरिभाऊ: **दादासाहेब गायकवाड: जीवन व कार्य,** अनिल प्रकाशन, नाशिक-०६, प्रकाशन – दि. ६ डिसेंबर, १९८७.

२२) पतंगे रमेश: **संघर्ष महामानवाचा,** साप्ताहिक विवेक हिंदुस्थान प्रकाशन संस्था, मुंबई-२५, जुलै २००६.

२३) परदेशी प्रतिमा: **योध्दा जनसत्याग्रही दादासाहेब गायकवाड,** दिग्नाग प्रकाशन, पुणे-११, प्रकाशन – २८ नोव्हेंबर, २००२.

२४) पवार ज.वि.: **आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, खंड-२,** (जानेवारी-१९६० ते जानेवारी-१९६५), अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई-०३, प्रकाशन – दि. १४ ऑक्टोबर, २००६.

२५) पाटणकर भारत: **महाराष्ट्राचे शिल्पकार नाना पाटील,** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रकाशन – नोव्हेंबर, २००१.

२६) पानतावणे गंगाधर: **दलितांचे प्रबोधन,** विचार ग्रंथमाला प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती – ६ डिसेंबर, १९७८.

२७) पेंडसे लालजी: **महाराष्ट्राचे महामंथन,** लोकवाङ्मय गृह, मुंबई-२५, दुसरी आवृत्ती – ५ मे, २०१०.

२८) फडके य.दि.: **विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड-२,** केसागर पब्लिकेशन, पुणे-३०, द्वितीय आवृत्ती – १५ नोव्हेंबर, २००५.

२९) फडके य.दि.: **आंबेडकरी चळवळ,** श्री विद्या प्रकाशन, पुणे-३०, द्वितीय आवृत्ती – १५ जुलै, १९९८.

३०) फडके य.दि.: **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि काळाराम मंदिर सत्याग्रह,** सुगावा प्रकाशन, पुणे-३०, द्वितीय आवृत्ती – १४ एप्रिल, २००८.

३१) फडकुले निर्मलकुमार, कसबे रावसाहेब व इतर (सं.): **कर्मवीर दादासाहेब गायकवाड: काल आणि कर्तृत्व,** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-१४, प्रथमावृत्ती – १५ ऑक्टोबर, २००१.

३२) डोळस रंगनाथ (सं.): **पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड,** युगांतर प्रकाशन, नाशिक

रोड-०१, प्रथमावृत्ती – डिसेंबर, २००२.

३३) नरके हरी (सं.): **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, द्वितीय आवृत्ती – २००८.

३४) निकुंभे सी.एच.: **समाजप्रबोधनकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर,** सुगावा प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती – १४ एप्रिल, २००५.

३५) निकुंभे सी.एच.: **आंबेडकराचे सत्याग्रह आणि ब्रिटिश सरकार,** पायल पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती –१५ ऑगस्ट, २००९.

३६) भार्गवि भावना: **पद्मश्री दादासाहेब गायकवाड,** पद्मश्री दादासाहेब गायकवाड सत्कार समिती, नाशिक-१, प्रथमावृत्ती – १९६८.

३७) भार्गवि भावना (सं. महेश भारतीय): **लोकाग्रणी दादासाहेब गायकवाड,** (समग्र चरित्र वाड्मय), भाष्य प्रकाशन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१, द्वितीय आवृत्ती – १४ एप्रिल, २००७.

३८) मेणसे कृष्णा: **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळी,** लोकवाड्मय गृह, मुंबई-०२५, पाचवी आवृत्ती (I) – एप्रिल, २००६.

३९) मेश्राम योगेंद्र: **दलित साहित्य उद्गम आणि विकास,** श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती – ११ मे, १९९८.

४०) मून वसंत, नरके हरी व इतर (सं.): **डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-१८, भाग-१, १९२० ते १९३६,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई-२१, प्रथमावृत्ती – १५ ऑक्टोबर, २००२.

४१) मून वसंत, नरके हरी व इतर (सं.): **डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-१८, भाग-२, १९३७ ते १९४५,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई-२१, प्रथमावृत्ती – १५ ऑक्टोबर, २००२.

४२) लिंबाळे शरणकुमार (सं.): **रिपब्लिकन पक्ष वास्तव आणि वाटचाल,** दिलीपराज प्रकाशन प्रा.लि., पुणे-३०, प्रकाशन – दि. २६ जानेवारी, २००८.

४३) लोखंडे भाऊ: **डॉ. आंबेडकरी सत्याग्रह,** सुधीर प्रकाशन, वर्धा, प्रथमावृत्ती – दि. ०९-१०-२००८.

४४) वाघ एम.जी.: **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा एक शिलेदार-दादासाहेब पी.जे. रोहम,** कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रकाशन आवृत्ती – २५ सप्टेंबर, २००७.

४५) वाघ एम.जी.: **मुखेडचा सत्याग्रह,** कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, आवृत्ती – फेब्रुवारी, २००८.

४६) शिंदे रमेश (सं.): **कर्मवीर दादासाहेब गायकवाड,** सुगावा प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती – सप्टेंबर, २००२.

४७) क्षीरसागर रा.का.: **भारतीय रिपब्लिकन पक्ष,** कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपूरा, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती – दि. ६ डिसेंबर, २००६.

**- : हिंदी ग्रंथ : -**

१) ग्रामची आंतोनियो (अनु. कृष्णकांत मिश्र): **सांस्कृतिक और राजनीतिक चिंतन के बुनियादी सरोकार,** ग्रंथशिल्पी (इंडिया) प्राइवेट लि. दिल्ली – २००२.

**- : विशेषांक / स्मरणिका / मासिके / त्रैमासिके : -**

१) कद्रेकर भास्कर रघुनाथ (सं.): **जनता – खास अंक-१९३३** (मूळ अंक), प्रकाशन तिथी, १५ मे, १९३३, पुनरावृत्ती प्रकाशक – गायकवाड प्रदीप, दीक्षाभूमी संदेश – नागपूर-१७, दि. १२ ऑक्टोबर, २००५.

२) गगराणी भूषण व इतर (सं.): **लोकराज्य – कर्मवीर दादासाहेब गायकवाड विशेषांक,** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, वर्ष-५३, अंक-९, ऑक्टोबर, २००१.

३) गायकवाड प्रदीप (सं.): **जनता (पाक्षिक),** २६ जानेवारी, १९३१, समता प्रकाशन, नागपूर-१७, द्वितीय आवृत्ती – २६ जानेवारी, २००९.

४) गायकवाड प्रदीप (सं.): **जनता,** दि. ३ ऑगस्ट, १९३१, समता प्रकाशन, नागपूर-१७, द्वितीय आवृत्ती – २६ जानेवारी, २००९.

५) ढवळे अशोक (प्रकाशक): **महाराष्ट्रातील थोर शेतकरी नेते – विशेषांक,** महाराष्ट्र राज्य किसान सभा, मुंबई-१३, सप्टेंबर, २००३.

६) मराठे मालती, देशपांडे वामन (सं.): **निषाद – दिवाळी अंक,** मुद्रक प्रकाशक, सुरेश मालपेकर, वर्ष-पाचवे, १९७२.

७) वाघ विलास (सं.): **सुगावा, वर्ष-३९, अंक-१,** सुगावा प्रकाशन, पुणे-३०, सप्टेंबर, २००९.

## - : वृत्तपत्रे / नियतकालिके : -

१) **जनता,** दि. २२ ऑगस्ट, १९३६.

२) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. ०८-११-१९५८.

३) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. २८-०३-१९५९.

४) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. ०९-०५-१९५९.

५) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. ०४-०७-१९५९.

६) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. २२-०८-१९५९.

७) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. २६-०९-१९५९.

८) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. ०३-१०-१९५९.

९) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. १७-१०-१९५९.

१०) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. २४-१०-१९५९.

११) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. ३१-१०-१९५९.

१२) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. २६-१२-१९५९.

१३) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. १३-०२-१९६०.

१४) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. १२-०३-१९६०.

१५) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. १९-०३-१९६०.

१६) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. ३०-०४-१९६०.

१७) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. १८-०६-१९६०.

१८) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. २७-०८-१९६०.

१९) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. ०३-०९-१९६०.

२०) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. १५-१०-१९६०.

२१) खरात शंकरराव (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. २९-१०-१९६०.

२२) कद्रेकर भास्कर रघुनाथ (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. ०९-०९-१९६१.

२३) कद्रेकर भास्कर रघुनाथ (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. १८-११-१९६१.

२४) कद्रेकर भास्कर रघुनाथ (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. ०७-०७-१९६२.

२५) कद्रेकर भास्कर रघुनाथ (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. १४-०७-१९६२.

२६) कद्रेकर भास्कर रघुनाथ (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. ०९-०३-१९६३.

२७) कद्रेकर भास्कर रघुनाथ (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. २२-०६-१९६३.

२८) कद्रेकर भास्कर रघुनाथ (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. १५-०८-१९६४.

२९) कद्रेकर भास्कर रघुनाथ (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. २६-०९-१९६४.

३०) कद्रेकर भास्कर रघुनाथ (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. १०-१०-१९६४.

३१) कद्रेकर भास्कर रघुनाथ (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. १३-१२-१९६४.

३२) कद्रेकर भास्कर रघुनाथ (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. ३०-०१-१९६५.

३३) कद्रेकर भास्कर रघुनाथ (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. २०-०३-१९६५.

३४) कद्रेकर भास्कर रघुनाथ (सं.): **प्रबुध्द भारत,** दि. १२-०६-१९६५.

३५) महाजनी ह.रा. (सं.): **दै. लोकसत्ता,** दि. ३१-१२-१९७१.

३६) केतकर कुमार (सं.): **दै. लोकसत्ता,** दि. ०३-०५-२०१०, वर्ष-२३, अंक-४६.

३७) कांबळे बबन (सं.): **दै. वृत्तरत्न सम्राट,** दि. १९-०५-२०१०, वर्ष-१, अंक-२५६.

३८) कांबळे बबन (सं.): **दै. वृत्तरत्न सम्राट,** दि. २०-०५-२०१०, वर्ष-१, अंक-२५७.